ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३६८९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

नों. नं. ८८५१०

दुर्मिळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

क्र. क्र. ३६८८

श्री ग्रंथ संग्रहालय
क्रं. ........
ता. ........

# सुधारक

REFBK-0003689
REFBK-0003689

# प्रो. पटवर्धनकृत पुस्तकें

## फार्शी मराठी कोश

स्थूलमानानें एकनाथापासून प्रभाकरापर्यन्त होऊन गेलेल्या लेखकांच्या लिखाणांत, प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक कागदपत्रांत आणि आजच्या बोलींत जे फार्शीच्या द्वारा मराठींत आलेले इस्लामी शब्द आढळतात त्यांचा सन्दर्भ पाहून व तौलनिक दृष्टीनें अभ्यास करून हा कोश तयार केलेला आहे. स्पष्टीकरणार्थ जुन्या लिखाणांतील उदाहरणें दिलेलीं आहेत. उपोद्घातांत फार्शीचे मराठीवर जे जे संस्कार झालेले आहेत त्यांची चर्चा केलेली आहे. पृष्ठसङ्ख्या (३०+२८०+३६); प्रकाशक, भारत-इतिहाससंशोधक मण्डळ; किम्मत रुपये ४. हें पुस्तक मुम्बई शाळाखात्यानें व मध्यप्रान्त व वऱ्हाड शाळाखात्यानें मन्जूर केलेलें आहे.

## छन्दोरचना

### संशोधकदृष्ट्या सर्व वृत्तांचा शास्त्रीय परामर्श घेणारें एकच पुस्तक

"या आणि खुद्द प्रो. पटवर्धनांच्याही स्वकृत उदाहरणामुळेंच छन्दःशास्त्रावरील या रुक्ष ग्रन्थाला पराकाष्ठेची रञ्जकता आली आहे." (महाराष्ट्र)

" केवळ अनुवादात्मक नसून त्यांत विचारस्वातन्त्र्य पुष्कळच दिसून येतें... पटवर्धन यांनीं या ग्रन्थांत चिकित्सक बुद्धि कसून चालविली आहे इतकेंच नव्हे तर छन्दःशास्त्राचा विषय अत्यन्त परिश्रमपूर्वक तळापासून ढवळून काढला आहे...पद्यांतील व्याकरणविशेष व पद्यभाषा हीं जीं दोन प्रकरणें लिहिलीं आहेत तीं तर आपल्या दृष्टीनें फारच मौल्यवान् आहेत. ... या दोन प्रकरणांत जे नियम किंवा सिद्धांत दिले आहेत ते आम्हांला एकन्दरीनें फारच पसन्त वाटतात ... साहित्यशास्त्रासम्बन्धानें मराठींत जें काही ग्रन्थ उपलब्ध आहेत त्यांत या ग्रन्थानें मौल्यवान भर घातलेली असून, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत चालू करण्यासारखें पुस्तक मराठींत नाही असें म्हणणाऱ्यांना पटवर्धन यांनीं या ग्रन्थानें सक्रिय असें उत्तर दिलें आहे." (केसरी.)

## विरहतरङ्ग

( लेखकः--**माधव जूलियन्, सदस्य,** रविकिरणमण्डळ )

ही एक आधुनिक प्रेमकहाणी आहे. इङ्ग्रजी व संस्कृत वाचनानें सुसंस्कृत झालेल्या मनांत यौवनाच्या पहिल्या बहरांत आणि महाविद्यालयाच्या खुल्या निर्विशङ्क भावपोषक वातावरणांत उद्भूत होणारें प्रेम त्याची स्थिति आणि रूपान्तर यांचें प्रस्तुत काव्यांत वर्णन केलेलें आहे. किम्मत ८ आणे.

रविकिरणमण्डळाचें ११ वें पुस्तक

श्री ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ८७८
ता. ७/१०/२०

# सुधारक

माधव जूलियन्
(सदस्य, रविकिरणमण्डळ)

पुणें
आर्यसंस्कृतिमुद्रणालय

१९२८

किंमत दीड रुपया

## रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| किरण (गद्य)- मण्डळ | | ८४ |
| काव्यविचार (गद्य) -मण्डळ | | १ |
| उषा (पद्य) - मण्डळ | ... | ८१२ |
| मधुमाधव (") घाटे-जूलियन् | | ८१२ |
| शलाका (गद्यपद्य)- मण्डळ | | १ |
| विरहतरङ्ग (पद्य)- मा. जूलियन् | | ८८ |
| कला (पद्य)-गिरीश | | ८६ |
| नाट्यरूप महाराष्ट्र (गद्य)-घाटे | | १ |
| छन्दोरचना (गद्य)-प्रो. पटवर्धन | | २ |
| प्रभा (गद्यपद्य)-मण्डळ | | ८८ |
| सुधारक (पद्य) - मा. जूलियन् | | १८८ |

मण्डळाचें पुढील पुस्तक

आम्बराई (पद्य) - गिरीश

रविकिरणमण्डळ

४६१ शनवार, पुणें शहर.

मुद्रक व प्रकाशकः-
वासुदेव गोपाळ परांजपे,
आर्यसंस्कृति-मुद्रणालय
चिमणबाग, टिळकरस्ता,
पुणें शहर

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

रा. रा. श्रीधर रामजी शिन्दे, बी. ए., एलूएलू. बी., बडोदें

यांस

(पाठविलेल्या पत्रांतील उतारा)

"...तेव्हा अशा अनेक सुखस्मृति आहेत की एकान्तांतच त्यांचें चिन्तन करण्यांत मौज वाटते. जाहीर करायची झाल्यास एकच गोष्ट करितां येईल. कवीशी परिचय झाल्यानें वेळीं अवेळीं त्याच्या गरमागरम कविता वाचून त्यांच्यावर न्याय्य पण प्रोत्साहक अभिप्राय देण्याची नाजूक कामगिरी आपण किती चतुराईनें पार पाडीत होतां याची आठवण होऊन मनाला अजून कौतुक वाटतें. परन्तु तो काळ वदलूनही बारा वर्षें झालीं. प्रस्तुत काव्यच पहा. आपण आतां तें मुद्रित स्वरूपांतच प्रथम ( व लहरीप्रमाणें ) वाचाल. ...आपली स्नेहाळ कृपा अविकृत राहिली असली तरी माझ्या प्रकृतींत अन्तर पडलेलें आहे. हट्ट चालवून घेण्यांतच स्नेहाची प्रतीति पाहणारी मधुवयाची नव्हाळी आतां राहिलेली नाही. हट्टच करायचा तर बापूराव, हें काव्य आपणांस सादर समर्पण करून माझाच मी सन्मान करून घेणें मला रुचेल. बाकी यांत औचित्यही आहे. सुधारक काव्य एखाद्या, केवळ आश्रयदाता म्हणून सर्वगुणसम्पन्न अशा धनिकाला, किंवा राजमान्य तऱ्हेदार व्याख्यानबाज सुधारकब्रुवाला अर्पण करण्यापेक्षां एखाद्या अज्ञात, पण तत्त्वनिष्ठ व हृदयानें उदार, सहिष्णु, प्रेमळ व गैरसमज करून घेणार नाही अशा सुधारकास अर्पण केलें तर..."



...ग्रंथ स...
.........नं.....
ता.......
...ठा...

[library stamps]

# प्रवाहपतितांचें तरङ्गरेक्षण

अप्रियस्यच पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः । ह. गी.

प्रस्तावना ही ग्रन्थाची इतिश्रीच होय. परन्तु या प्रसङ्गीं, जीवावर बेतलेलें शेपटीवरच निभावल्याचें समाधान वाटतें. प्रस्तावनेकडे जरी बहुधा दुर्लक्ष्य होत असलें तरी स्थानदृष्ट्या तिला अग्रपूजेचा मान असतो व तिच्यावाचून ग्रन्थाची साङ्गता सिद्ध होत नाही. अलीकडे तीस एकच-वाक्य, मुके-कढ, प्रवेशद्वार, परडी इत्यादि चटकदार नांवानें सम्बोधण्याची जी नवी टूम निघाली आहे तिच्या प्रवाहांत स्वाभाविक अनुकरणप्रियतेमुळें आम्हीही सापडलों आहों. प्रस्तावनेंत ग्रन्थलेखकाचा वाचकाशी परिचय करून देण्याची कामगिरी प्रत्ययोपसर्गाकुल नामाङ्कित वाग्भटांकडून होऊं लागल्यामुळें प्रस्तावना हें एक वाङ्मयकलाङ्ग होऊं पहात आहे. प्रस्तावनालेखन हा एक प्रतिष्ठित, तेजीचा पण निरर्थक धन्दा होत असून त्यांत चढाओढ सुरू झाली आहे. प्रस्तावनालेखकाच्या प्रतिष्ठेमुळें ग्रन्थारम्भीं त्याचें छायाचित्र व जाहिरातींत त्याचें नांव ग्रन्थकर्त्याच्या बरोबरीनें झळकतें; इतकेंच नव्हे तर कित्येकदा (प्रसिद्धीकाराच्या निष्काळजीपणामुळें वा सावधपणामुळें) ग्रन्थकर्त्याचेंच नांव लुप्त होतें. अशा सुप्रसिद्ध प्रस्तावनाकारापर्यन्त आमचा वशिला लागण्यासारखा नाही; तथापि स्वतःच्या छायाचित्राबरोबर स्वतःच लिहिलेली स्तुतिपर प्रस्तावना प्रकाशकाच्या नांवावर प्रसिद्ध करण्याची जी टूम एका साहित्याचार्यानें पाडिली तिचें अनुकरण न करितां ज्यानें करावें त्यानेंच भरावें या न्यायानें आह्मीच जें सुचेल तें स्वतःच्या नांवानें लिहून हा प्रसङ्ग साजरा करणार आहों.

प्रस्तावनेंत टीकाकारास प्रथम वन्दन करणें म्हणजे एका दृष्टीनें मङ्गलाचरणाच्या रूढीचा जीर्णोद्धार करण्यासारखें आहे. स्वतन्त्रपणें विचार करण्यास बहु-

जनसमाजाजवळ पात्रता, साक्षेप व फुरसत यांचा समुच्चय क्वचितच असतो; शिवाय, पक्क्या मताच्या आयातनिर्यातीनें मिळणाऱ्या अडतींत विशेष किफायत असते. तेव्हा कार्यसमाप्तीनन्तरही ग्रन्थाचें चीज होणें ज्या तज्ज्ञांच्या मर्जीवर अवलम्बून आहे त्यांची, 'तत्सत्। टीकाकारार्पणमस्तु। शुभम्भवतु।' म्हणून योग्य सम्भावना करणें जरूर आहे. आतां 'मेघदूत'कारासारख्या रूढिभञ्जकास यश मिळून 'कादम्बरी'कारासारख्या रूढिपूजकाचा बाण लक्ष्यापर्यन्त पोंचूं शकला नाही हा दैवयोग होय. हा आम्हालाही टळत नाही. तथापि स्तुति प्रभावानें विघ्नकर्ता ज्याप्रमाणें विघ्नहर्ताच काय पण केवळ मङ्गलमूर्ति झाला त्याप्रमाणें सविनय सम्भावनेनें वाङ्मयांतील छट्टू सुद्धा प्रतिशिवाजी होईल अशी आशा आहे.

गरीब बिचारा टीकाकार! त्याला लेखक भितात, त्याची खुशामत करितात पण त्यास न्यायानें वागवीत नाहीत. खुनी मनुष्याला सुद्धा आपलें योग्य समर्थन करितां यावें म्हणून ऐपत नसली तर सर्कारी खर्चानें वकील मिळतो; परन्तु शारदेच्या मन्दिरांत टीकाकाराला विनाचौकशी सुळी देण्यासाठीं, खुशामतीचें अस्त्र वाया गेलेल्या होतकरू लेखकांची धडपड चालूं असते. चाटुस्तुतीच्या करवण्टींत एक प्रतीचा आवळा देऊन लेखी दस्तैवजी स्तुतीचा कोहळा टीकाकाराकडून काढावयाचा असल्यामुळें तो केवळ निःपक्षपाती, सत्यान्वेषी व सहानुभवी असून भागत नाही. मी स्तुतिनिन्दातीत आहे ही लेखकाची फुशारकीच शङ्का उपस्थित करिते. भक्ताची प्रार्थना मान्य करणारा देव सुद्धा जिथें स्तुतिप्रिय आहे तिथें मानवाची काय कथा? स्तुतिप्रियता क्षम्य ठरेल परन्तु निर्भेळ स्तुतीची हाव क्षम्य ठरणार नाही. योग्य स्तुतीबरोबर योग्य दोषदिग्दर्शन झाल्यास लेखक आपण होऊन केलेली विनन्ति व टीकाकारावर घातलेलें सङ्कट विसरून, चिडून काहीतरी खळखळ घालीत वितण्डवाद करू लागतो. टीकाकारावर नीच हेतूंचे आरोप करितांना सन्तापानें अन्ध झाल्यामुळें टीकाकाराचें म्हणणेंच न समजून लेखकाची स्थिति वाऱ्याला झोडपीत रहाणाऱ्या वेड्या कोपिष्टासारखी हास्यास्पद व अनुकम्पनीय होते.

त्यांतून लेखक जर का वाङ्मयिक चोर असला तर स्वकृत्याची जाणीव झाली म्हणून शरमेनें नव्हे, तर आपली लबाडी टीकाकारानें चव्हाट्यावर आणली म्हणून रागानें, तो लाल होऊन शिवराळपणाच्या रङ्गणांत बेफाम धावूं लागतो.

बरें, टीकाकारानें केलेली टीका अनुकूल उतरून लेखक सन्तुष्ट झाला तर जणूं काय प्रतिकूल नव्हे ती टीकाच नव्हे वा लेखक-टीकाकारांचें नातें आहिनकुलवत् असलें पाहिजे अशा मताचे शिष्ट, कदाचित् एरव्ही आपला वडेजाव वाढत नाही म्हणूनही, कुचेष्टेस प्रवर्तून टीकाकार व लेखक हे एकाच 'परस्परंप्रशंसन्ति'-च्या तत्त्वावर उभारलेल्या परोत्कर्षासहिष्णु मण्डळाचे प्रच्छन्न सदस्य असावेत असा गिल्ला करूं लागतात. एकूण काय टीका वाचून लेखक सन्तुष्ट झाला तर इतर कुणीतरी अदेखाईनें सुस्कारतात; आणि टीकेनें इतरांना आनन्दाच्या गुदगुल्या झाल्या तर तिकडे लेखकाचा प्राण कासाविस होतो.

टीकाकारही स्खलनशील अशा मनुष्यप्राण्यांपैकीच एक आहे. परन्तु टीका लिहिण्यापूर्वी त्याची अजीजी करणारा लेखक प्रतिकूल टीकेतील अज्ञानमूलक दोष शोधून काढण्यासाठीं टपून बसलेला असतो. टीकाकाराच्या बिकट परिस्थितीकडे कुणीच लक्ष्य देत नाही. टीकाकारांची सङ्ख्या अत्यल्प असल्यामुळें त्यांच्यावर चौदा विद्या व चौसष्ट कला यांचा आरोप करण्यांत येतो; आणि या सार्वत्रिक आरोपामुळें टीकाकाराचीही थोडी आत्मवञ्चना होते. परीक्षणार्थ व अभिप्रायार्थ येणाऱ्या पुस्तकांची सङ्ख्या मोठी असते; आणि वाचनलेखना-व्यतिरिक्त इतर गोष्टी त्याला संव्सारांत करावयाच्या नसतात असेंही नव्हे. त्यामुळें कृतज्ञभावानें व सार्वजनिक कर्तव्य म्हणून नाना विषयांवरील पुस्तकांचा त्याला अविलम्बें परामर्श घ्यावा लागतो. पुस्तक वाचलेलें आहे हें कळण्यासाठींच त्याच्या निरनिराळ्या भागांतील तीन चार वरवर दिसणारे दोष दाखवून परीक्षणाचा मोठा भाग त्याला सारांशानेंच व्यापावा लागतो. 'ग्रन्थ लेखकाच्या लौकिकास साजेसा असून सहृदयानन्दायी आहे' याप्रमाणें मोघम, किंवा 'अमूक असें असलें तर तमूक तसें आहे हें म्हणायला प्रत्यवाय नाही' अशीं सोपाधिक सावधगिरीचीं विधानें करावीं लागतात. इतकी

काळजी घेऊनही अज्ञानमूलक परस्परविरोधी विधानें आढळलीं की टीकेची क्किम्मत कमी होते; पण तिची रञ्जकता वाढते हें विसरतां कामा नये. टीकाकाराचे हाल इथेंच सम्पत नाहीत. प्रतिष्ठित लेखकांपैकींही कुणी अभिप्रायच प्रस्तावना म्हणून छापतो; किंव्वा अभिप्राय छापतांना स्थलसङ्कोचास्तव (?) दोषदिग्दर्शक भाग गाळून त्याऐवजी निरुपद्रवी आखूड बिन्दुमाला घालतो!

कित्येकदा टीका निर्घृण व जालीम असते अशी हाकाटी असते. तशी टीका परिणामीं हितकारकच असते; आणि कदाचित् ती तशी नसली तर ती ग्रहण न करणें लेखकाच्या स्वाधीनची गोष्ट आहे. स्तुतीच्या अजीर्णावर व गर्वाच्या ज्वरावर लेखनकलारुक्कुठाराचे वळसे नकोत असें कोण म्हणेल? भेषजालयांत सारींच औषधें गुलकन्द-बदामपाकाप्रमाणें स्वादिष्ठ व पौष्टिक कशी असणार? अमृताचें विष व विषाचें अमृत करणाऱ्या विद्यावैद्यूची गोष्ट सोडून द्या, पण एखाद्या गङ्गाविष्णूला प्रसङ्गविशेषीं एरण्डेल, डिकेमाली, काडेचिराईतच काय पण कालकूटाचीही योजना करावी लागते. टीकाकार केव्हां केव्हां चीरफाडही करितो, पण ती तो खाटीक म्हणून नव्हे; तर शस्त्रवैद्य म्हणून. वाङ्मयांतील चरक रोग्याचा मेद झडावा म्हणून त्यास साहित्यशास्त्राच्या चरकांतून पिळूनही काढतील. त्यामुळें कदाचित् कोणाला अन्तिम गति प्राप्त झाली तर रस व चिपाडें वेगळीं झालीं आणि ही गति एरण्डाला मिळत नाही, इक्षुदण्डालाच मिळते या विचारांतही समाधानास जागा आहे. अव्यय राहून व केव्हा केव्हा उत्क्रान्ति झाल्याशिवाय आत्मविकास कसा होणार? सुवर्ण गुळाची भेली वा रौप्यशुभ्र शर्करा होणें म्हणजे ब्रह्मपदाच्या निरनिराळ्या पायऱ्या गांठणें होय. तेव्हा टीका विषदिग्ध, निष्कर्षक वा दाहक आहे एवढ्याच गोष्टीवरून टीकाकारास दोष लावणें अन्यायाचे होईल.

परन्तु टीका हेत्वाभासमूलक, अतिशयोक्तीनें दूषित व विपर्यास करणारी असली तर तिचें समर्थन कसें होऊं शकणार? तें कदाचित् होऊं शकणार नाही, पण तिची उपयुक्तता खास पटवून देतां येईल. आपल्या हातांत ब्रह्मा विष्णुमहेशांचें तिहेरी सामर्थ्य आहे अशा भ्रामक समजुतीनें, आपल्या लब्ध

प्रतिष्ठेस मान्यता न देणाऱ्या धाडशी लेखकावर फूत्कार सोडून त्याचा चावा घण्यास धजणारा एखादा टीकाशास्त्री नसतो असें नाही; परन्तु प्रथमदर्शनी थोडीशी पळापळ झाली तरी अखेर या भग्नदन्त कद्रूसुताची लीला कुतूहलच उत्पन्न करिते. टीकाकार हा बहुधा, सत्यनिर्णयासाठीं मुद्दाम विरुद्ध बाजूचें समर्थन करूं पाहणाऱ्या शङ्केखोर तत्त्वजिज्ञासूप्रमाणें, विरोधी भक्तीच प्रगट करीत असतो. त्याची टीका तर्कशुद्ध नाही हें अजमावून पाहण्यांतच मूळकृति कसोटीस लागते; व त्याच्या टीकेचा निर्विकार व काटेतोल बुद्धीनें विचार करण्यांत तितिक्षा व आत्मज्ञान हीं वाढतात.

या आत्मप्रसिद्धीच्या युगांत प्रतिकूल टीका म्हणजे अगदी थोड्या खर्चानें एक प्रतीच्या किंमतींत मिळणारी विस्तृत जाहिरात होय. पैका वेचून देवविलेल्या उघड जाहिरातीकडे, बातम्या, अग्रलेख व स्फुटें वाचून उरलेला काळ कसा कण्ठावा या विवञ्चनेंत असलेल्या आगगाडींतील प्रवाशांखेरीज क्वचितच कुणी दृष्टि फेकतो; परन्तु ही ग्रन्थाची प्रच्छन्न जाहिरात जितकी जहाल व खमङ्ग तितकी लोकांची मूळ ग्रन्थाविषयीं जिज्ञासा अधिक होते. टीका वाचल्यामुळेंच मूळ ग्रन्थाविषयीं जिज्ञासा अनावर होऊन तो विकत घेण्यांत आल्याचीं उदाहरणें 'विरहतरङ्गा'च्या बाबतींत आम्हांस प्रत्यक्ष माहीत आहेत. पुन्हा, या जाहिरातीच्या सुधारून काढलेल्या आवृत्तीस पैका पडत नाही. टीकेंतून उत्तरप्रत्युत्तराचें द्वन्द्व जन्म पावून त्याचे पडसाद इतरत्र मोफत उमटतात.

परन्तु ही टीका चटकदार न वठली तर टीकाकारास लोक भाकड जाहिरातवाला म्हणतील ही भीति असते. टीका जात्याच परोपजीवी, विधातृत्वाचें श्रेय आपल्याला मिळणार नाही, व विषयस्वातन्त्र्याची आकर्षता आपल्यांत येऊं शकत नाही याची टीकाकारास जाणीव असते. कवीचें असेल कीं नसेल, परन्तु टीकाकाराचें तरी 'कौशल्य सारें रचनेंत आहे.' अर्थात् मूळ पदार्थास रुचि नसल्यामुळें ती उणीव त्याला हेत्वाभासविपर्यासांचें हिङ्गजिरें, अतिशयोक्तीची लसूण व इतर चमचमीत मसाला घालून दूर करावी लागते. तेव्हां टीका मनोरञ्जक व मूळ ग्रन्थाविषयीं कुतूहलजनक झाल्यास हेत्वाभासविपर्यासांचे दोष क्षम्य ठरतात.

सुधारक काव्य ही एक प्रकारची टीका आहे ह्मणूनच आह्मी टीकाकाराकडे निराळ्या दृष्टीनें पहायला लागून सहानुभूतीचे उद्गार काढीत आहों असा कुणी आरोप केला तर तो अगदींच खोटा आहे असें नाही. जावें त्याच्या वंशा तेव्हाच कळे. परन्तु टीकाकाराची ही सम्भावना म्हणजे पुढें त्यांचें तोण्ड बन्द करण्यासाठी दिलेली लाच मात्र नव्हे. लाच देणें वा घेणें हा फौजदारी गुन्हा आहे. शिवाय हा काल वाक्स्वातन्त्र्याचा आहे. 'निन्दक अमुचा सखा । अमुचीं वस्त्रें धुतो फुका' अशा परोपकारी टीकाकारांचीं तोण्डें बन्द होण्यांत व्यक्तीचें व पर्यायानें समाजाचेंही नुक्सानच आहे. टीकाकारांची टीका व वृद्धांचा आशीर्वाद–मग तो गान्धारीच्या आशीर्वादाप्रमाणें असला तरी–त्यांचा आह्मी साभार स्वीकार करितों. ज्यांना वृद्ध व्हावयाचें नाही त्यांनींच 'वृद्धास्ते न विचारणीय-चरिताः' असें ह्मणावें. बाकी, टीकाकार नसतांना टीका कशी असावी याविषयीं केलेल्या विचारांत आणि टीकाकाराची भूमिका घेतल्यावर घडलेल्या आचारांत अन्तर पडलेलें दिसल्यास नवल नाही. नवीन माहिती उपलब्ध होऊन शहाणपणा वाढल्याचेंच हें लक्षण असतें असें ह्मणतात.

टीकेच्या दोन पद्धति आहेत. आदर्शभूत मानण्यांत आलेल्या ग्रन्थांच्या तौलनिक अभ्यासानें शोधून काढलेल्या, रूढ झालेल्या व अव्यय मानण्यांत आलेल्या नियमांस जें धरून असेल तें ग्राह्य व स्तुत्य; आणि तसें नसेल तें त्याज्य व निन्द्य ठरविणें ही एक पद्धति; आणि विविध ग्रन्थांच्या परिशीलनानें ज्याची बुद्धि उदार व परिणत झाली आहे अशा रसिकानें एखाद्या ग्रन्थाचा स्वतन्त्रपणें व बारकाईनें अभ्यास करून ग्रन्थकाराच्याही दृष्टीनें निरीक्षण करून त्याची गर्भित प्रतिज्ञा कोणती व ती कितपत यशस्वी झाली आहे हें ठरवून अन्तर्बाह्य गुणदोषांचें विवेचन करणें ही दुसरी पद्धति. सामाजिक टीकाही या दोन पद्धतींनीं होत असते. कित्येकांची भित्री दृष्टि आशाळभूतपणानें सदैव मागें लागलेली असते; व काळ वक्री झालेला दिसला तरी वस्तुतः त्याची पिछेहाट कधीं होत नाही व होऊं शकत नाही हें ते विसरतात. प्राचीन समाजशास्त्र्यांनीं घालून दिलेले व नन्तर रूढ झालेले नियम अनादि नसल्यामुळें

केव्हातरी रूढीस विरोध करूनच घालून दिलेले असतात. परन्तु रूढ दण्डक पाळण्यांतच समाजाची धारणा व अभ्युन्नति आहे अशा मताचे लोक समाजाच्या बदललेल्या परिस्थितीस योग्य असे नवे दण्डक शोधून काढून स्थापण्याच्या योजनेस विरोध करून, पूर्वस्थितीप्रत जा असा कळकळीनें उपदेश करितात; तर उलट कित्येक गतिनिष्ठ लोक वरील उपदेश अशक्य व अनिष्ट आहे हें जाणून, वर्तमानस्थितीचें बारकाईनें निरीक्षण करून आणि आलों कुठून, आहों कुठें व जावयाचें आहे कुठें, इत्यादि गोष्टींची साखळी जमवून नवीन सुधारणा तितक्याच कळकळीनें सुचवितात. याप्रमाणें समाजांत स्थितिनिष्ठ नवविद्वेषी व गतिनिष्ठ नवाभिनिवेशी असे दोन प्रकारचे प्रामाणिक टीकाकार असूं शकतात.

या मतभेदाला प्रकृतिभेद व स्थितिभेद हीं कारणें असूं शकतील. प्रकृतिभेदही कालमानानुसार होत जातो. नव्याविषयीं कौतुक व नव्याशीं समरस व्हायला लागणारें चापल्य हे गुण एकाच व्यक्तींत उत्तरोत्तर कमी कमी होत जातात. यामुळें वृद्ध व तरुण यांच्या दृष्टिकोनांत नेहमीच अन्तर पडतें. जगाचे भले बुरे अनुभव येऊन गेल्यामुळें वृद्धाला व्यक्तिसामर्थ्याची मर्यादा कळून चुकलेली असते; आणि बहिरन्तरङ्गभेद पाहून तो साशङ्क, उदासीन व शान्तिप्रिय झालेला असतो. त्याची ध्येयात्मता विझायला आलेली असते. उलट पक्षीं, तरुण आत्मविश्वासी, ध्येयवादी व क्रान्तिप्रिय असतो. वृद्धतरुणांची परस्परांवर क्रियाप्रतिक्रिया होऊन कुटुम्बाची व समाजाची कमीअधिक वेगानें पण सारखी प्रगतीच होत रहाते. सर्वस्वीं वृद्धांच्या उपदेशाप्रमाणें जग चालतें तर लौकरच त्याला प्रेताची स्थिरता येती; आणि सर्वस्वी तरुणांच्या छन्दाप्रमाणें क्रान्ति होत राहती तर फूलपाखरासारखी गति होऊन सामुदायिक जीवनाची उत्क्रान्ति (विकास नव्हे) होती. त्यामुळें नव्याजुन्यांत प्रामाणिक मतभेद रहाणें यांतच प्रगतीचें बीज आहे; आणि प्रगति आहे तोंवरच शाश्वतीची आशा आहे.

स्थितिभेदामुळेंही मतभेद सम्भवून क्रान्तिकारक चळवळ चालू होते. व्यक्ति व समष्टि यांचे हितसम्बन्ध निगडित खरे परन्तु ते नेहमी अभिन्न नसतात,

सामाजिक श्रेय या नांवावर बऱ्याच गोष्टी, अखिल समाजाला नव्हे, तर समाजाच्या मर्यादित (आणि अनेकदा) अल्पसङ्ख्याक भागालाच श्रेयस्कर असतात. अशी कोणतीही घटना नाही की जी व्यक्तीस व समष्टीस सदैव सारखीच हितावह राहील. शिवाय, समाजस्थिति ही बदलतच रहाते; आणि अशी कोणतीही घटना नाही की जी अविकार्य राहून उपयुक्त राहूं शकेल. प्रचलित स्थिति ज्यांना हितावह असते ते ती अबाधित रहावी म्हणून रूढि व समाजधारणा यांच्या झेण्डयाखालीं बळ जमवूं लागतात. ज्यांना प्रचलित स्थिति जाचते ते दुर्बळ असल्यास मनांत चरफडत दैववादाचें रडगाणें गात स्वस्थ बसतात; पण ते मनानें खम्बीर कट्टर असल्यास आशावादानें व्यक्तिस्वातन्त्र्याची भेरी ठोकून क्रान्तीचें निशाण फडकावितात. स्वातन्त्र्य व शिस्त, क्रान्ति व समाजधारणा हे शब्द सापेक्ष आहेत. परन्तु शब्दाचेच गुलाम जगांत पुष्कळ असल्याकारणानें माणूस–भरणीच्या कामांत या शब्दांचाच फार उपयोग होतो.

कवि हा समाजाचाच एक घटक व जीविताचा टीकाकार असल्यानें स्थितिप्रकृतिभेदामुळें कवींतही स्थितिनिष्ठ व गतिनिष्ठ असे दोन प्रकार आढळतात. जुन्या आदर्शांविषयीं वाटणाऱ्या पूज्यभावामुळें त्यांच्याशीं समरसून सहज स्फूर्ति पावून स्वतन्त्र, परन्तु नकळत तत्समही, अशी रचना करणारा स्थितिनिष्ठ कवि, नव्याविषयीं साशङ्कता असली तरी, फाजील आत्मश्रद्धेच्या अभावीं, नव्याविषयीं निदान सहानुभूति तरी ठेवितो. नव्याविषयीं जिवन्त व अमर्याद कुतूहल वाटून स्वयम्प्रेरणेनें श्रद्धापूर्वक नवीन नवीन प्रयोग करून पहाणारा व तें केवळ जुनें नव्हे म्हणून नव्हे, तर त्याची इष्टता पटते म्हणून नव्याचा पुरस्कार करणारा गतिनिष्ठ कवि, फाजील आत्मश्रद्धेच्या अभावीं, अनुभवानें उत्तरोत्तर सुसंस्कृत होत जातो आणि त्याचा जुन्याविषयींचा योग्य आदर कधींही नष्ट होत नाही. जातिवन्त कवींविषयीं हें बोलणें झालें. परन्तु नकली कवींचाही बराच मोठा वर्ग असतो त्यांत ही नव्याजुन्यांची मारामारी चालू असते.

काहीतरी कृति तर केलीच पाहिजे, जुन्याला मान मिळतो आहे, नवीन काही लिहिण्याची तर आपल्या अङ्गीं कुवत नाही, इत्यादि विचारांनीं अनुकरण

करून जुन्याच्या पङ्क्तीस बसण्याची प्रतिष्ठा मिळवूं पाहणारा 'पाठ कवि'[१] नव्याचा चिडखोर परन्तु वायफळ टीकाकार बनतो. उलट पक्षीं काही तरी नवीनच पाहिजे, मग तें कसेंही असो, या विचारानें खुळावलेला पद्यकार थोडे दिवस लोटल्यावर निवळून चारचौघांसारखा शहाणा झाला नाही तर 'धीट'[१] होऊन गूढगुञ्जनाची तरी कीर्ति मिळविण्यासाठी 'काही विनशब्दाचे चाळे आभाळावर लिहीत' बसतो.

तेव्हा कवि, की ज्याच्या दृष्टींत व वृत्तींत पुष्कळ प्रकारचा भेद असूं शकतो, तो संस्कृतिटीका करितो कशी व ती आहे तरी कितपत विश्वसनीय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्राचीन मताप्रमाणें कवि हा अधिकारी उपदेष्टा होय. तपस्या करून दैवताच्या प्रसादानें स्फूर्ति पावून तत्त्वविवेचन मनोरञ्जक करण्यासाठींच अलङ्कारिक पद्धतीनें कथानिरूपण करणारा आणि केव्हा केव्हा व्यावहारिक परन्तु मुख्यत्वें पारमार्थिक बोध करून निःश्रेयसाचा मार्ग दाखविणारा तो कवि; त्या शब्दसृष्टीश्वराची सहजस्फूर्त अमोघ शब्दरचना, ती 'प्रासादिक'[२] कविता आणि त्याचा अस्खलित उपदेश म्हणजे त्रिकालाबाधित सत्य होय. ही व्याख्या प्राचीन काळीं कवींस कितपत लागूं पडली असेल तें असो, परन्तु अर्वाचीन काळीं या माहात्म्यावर वारसाहक्क साङ्गण्याचें धाडस कुणी कवि करील असें वाटत नाही. समाजाचें निर्विकार व चिकित्सक बुद्धीनें निरीक्षण आणि तौलनिक पद्धतीनें परिशीलन करून योग्य उपचार शोधून काढून त्याची उपयुक्तता कार्यकर्त्यांच्या बुद्धीस पटेल अशा रीतीनें तर्कशुद्ध विवेचन करणें हें कार्य वस्तुतः समाजशास्त्रज्ञांचें आहे. हें काम मूलतः कवींचें नव्हे, आणि त्याला लागणारे विविध गुण कवींच्या अङ्गीं असतात असेंही नाही. तत्त्वज्ञान्याप्रमाणें कवींचें ज्ञान विस्तृत व बुद्धि आविकृत नसल्याकारणानें शुद्धज्ञानाच्या बाबतींत कवि तत्त्वज्ञा-

---

१. " पाठ म्हणिजे पाठान्तर। बहुत पाहिलें ग्रन्थान्तर। तयासारखा उतार। आपणही केला ॥" (दासबोध) " धीट म्हणिजे धीटपणें केलें। जें जे आपुल्या मनास स्फुलें। बळेंचि कवित्व रचिलें। यां नांव धीट बोलिजे" (दासबोध).

२. " देवाचेन प्रसन्नपणें। जें जें घडे बोलणें तें तें अत्यन्त श्लाघ्यवाणें। या नांव प्रासादिक" (दासबोध).

न्याइतका विश्वसनीय नाहीं; कवीला गौरवून द्रष्टा, तत्त्वज्ञ ह्मणण्याचा सङ्केत आहे ती गोष्ट अलाहिदा. श्रीयुत, राजमान्य, राजश्री, सौभाग्यवती इत्यादि शिष्टसम्मत सामान्य पदव्यांत जितका अर्थ तितकाच उपर्युक्त पदवींत; किंव्हा प्रत्येक मनुष्याला कवितारसास्वाद घेतां येतो ह्मणून तो कवि असतो हें ज्या दृष्टीनें खरें त्याच दृष्टीनें तो तत्त्वज्ञानीही असतो हें खरें ठरेल.

कवि हा मूलतः पौराणिक, ऐतिहासिक वा काल्पनिक, प्राचीन वा स्वकालीन, कथा साङ्गणारा आणि स्वतःचीं वा इतरांचीं सुखदुःखें सहानुभूतीनें वर्णून मनोरञ्जन करणारा, ह्मणजे एका दृष्टीनें प्रतिष्ठित तमाशेकारच होय. मोरोपन्ताच्या कृतींत तत्कालीन सामाजिक घडामोडींचें प्रतिबिम्ब नाही, त्या धामधुमीच्या काळांत तो अचल पुराण=परायण राहिला, यावरून काही जण त्याच्या कवित्वाचाच इन्कार करितात. परन्तु अन्तःसृष्टीचेंच निरीक्षण करून भावनाप्रधान गीतें लिहिणारे स्वयङ्केन्द्रित कवि नसतात असें नाही; आणि त्यांची पद्यरचना वाचकांच्या मनांत सहानुकम्प उपजवूं शकतेच. मनोरञ्जन व भावनेचें सङ्क्रामण (विशेषतः संस्कृतिपर) कवीकडून होत असतांना त्यानें अमूक एक क्षेत्रांतच सञ्चार करावा असा हट्ट धरणें ह्मणजे शुद्ध दुराग्रह होय. समाजाचें निरीक्षण करून 'हूड'च्या 'उसाशांचा पूल', 'खर्मासाचें गाणें' या सारख्या उद्बोधक कविता कवि लिहीत नाही असें नाही. परन्तु प्रत्येक कवीनें सामाजिक सुधारणेचा पुकार केला पाहिजे असा अट्टाहास, कविता भक्तिपर व परमार्थदर्शकच असली पाहिजे या प्रतिपक्षाच्या दुराग्रहाइतकाच वेडगळ व हास्यास्पद होय. कवि टीकेचे कोरडे ओढील, प्रगतिपर व बण्डखोर स्वातन्त्र्याचे पवाडे गाईल व उद्बोधक सिद्धान्तही माण्डील; परन्तु त्याचे विचार ऊर्जस्वल भावनेच्या सङ्कुचित अनुभवावर व कल्पनेच्या विलासावर स्थापित असल्याकारणानें, माण्डणीमुळें अधिक परिणामकारक ठरले तरी तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्ताहून कमी विश्वसनीय होत. कविता ही तात्विक चर्चेहून अधिक परिणामकारक होण्याचें कारण ती सावेश असून इन्द्रियगोचर वर्णनानें प्रत्यक्ष अनुभूतीचा भास करून देते हें होय; आणि अनुभूतीहून अधिक परिणामकारक काहीच नाही. कविता ही

 ग्रन्थ ८८८

मूलतः तर्कबुद्धीस उद्देशून नसली तरी कवीचें म्हणणें वरळ असून भागणार नाही; तो तार्किक नसला तरी शहाणा असावा लागतो; वेड्याचें सोङ्ग घेण्यास मात्र त्याला मुभा आहे. मनोरञ्जन करून कवीला आपलें म्हणणें पटवून द्याव-याचें असतें. नीतिविचार तो सुचवितो, तो त्यांचें विवेचन करीत नाही. बोध-वचनांची माला पद्यांत गुम्फल्यानें ती बरोबर वाळगण्यास सोयीची स्मरणी होईल; पण ती कविता नव्हे. भृङ्ग सुरङ्गाच्या माळेवर तुटून पडतात; ते सुवर्णमोहनमाळेवर लुब्ध होत नाहीत.

परन्तु अशी मनोरञ्जक व उद्बोधक संस्कृतिटीका सुधारककाव्यांत आहे की नाहीं व असल्यास ती कितपत न्याय्य आहे हें अखेर वाचकांनींच ठर-वावयाचें आहे. आम्ही तें साङ्गणें अनुचित व चुकीचेंही असण्याचा संभव आहे. डोळ्याला अगदी जवळ असलेली वस्तु दिसत नाही आणि स्वकृतीची जवळीक तर जनकाला जिवाच्या कलिजाइतकी वाटते. तिचे गुणदोष दिसण्या-इतकी दूर तिला करणें साधारणपणें जिवावर येतें; आणि शिवाय, तिचें वर्णन जरी यथातथ्य केलें तरी इतरांना तें पक्षपातीपणाचें वाटणार नाही असें नाही.

केशवसुतांनीं 'तुतारीं'त[1] व गोविन्दाग्रजांनीं 'स्मशानगीतां'त सामाजिक अन्यायांवर जशा प्रकारची टीका केली आहे तशाच प्रकारची टीका सुधारक काव्यांत निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांवर व कल्पनांवर केलेली आहे. पण ही टीका एका कल्पित कथेच्या निरूपणाच्या ओघांत विखुरलेली असून कित्येकदा उपरोधिक आहे. शिवाय निरनिराळ्या विचारसरणींचेंही दिग्दर्शन व्हावें अशी व्यवस्था पुरोगामी व प्रतिगामी श्रोत्यांचे उद्गार अनुक्रमें चौकटीच्या व अर्धचन्द्राकृति कंसांत छापून केलेली आहे. विनोदाचा उपयोग अधम

१. केशवसुतांनीं 'तुतारीं'त ज्या पङ्क्तिबन्धाची योजना केली आहे त्याच पङ्क्ति-बन्धांत औचित्यपूर्वक हें काव्य रचिलें आहें. कित्येक ठिकाणीं विचार पङ्क्तिब-न्धान्तीं सम्पत नसून पुढील पङ्क्तिबन्धांत वाहता ठेविला आहे. पङ्क्तिमध्यावर सूक्ष्मविराम असला तरि यति नसल्यानें पदसमाप्ति झालीच पाहिजे असें नाहीं. या पद्यरचनेंत ताल व यमक हीं दोन्हीं असलीं तरी ही पद्यरचना गेय नाहीं. गद्या-प्रमाणें हिचें अर्थानुरोधानें वाचन करण्यांत काही विशेष मौज प्रतीत होईल.

भावना उद्दीपित करण्यासाठीं नसून उद्बोधक मनोरञ्जनासाठीं आहे. यांत सहृदय उपहास आहे, पण चावटपणा नाही. धर्माचा व्यापार करणाऱ्या दाम्भिकतेचें यांत वस्त्रहरण असेल, पण कोणत्याही उदात्त नीतितत्त्वाची यांत कुत्सित हेटाळणी नाहीं. काही प्रसिद्ध व्यक्तींची यांत स्पष्ट स्तुति असली तरी कुणाही व्यक्तीची यांत नालस्ती करण्याचा प्रयत्न नाहीं. व्याजोक्तीनें नालस्ती करणें हें भ्याडपणाचें लक्षण होय. वैयक्तिक हास्यास्पद पण क्षम्य अशा दोषांची गम्मत म्हणजे व्यक्तीची नालस्ती नव्हे हें ध्यानांत धरिलें पाहिजे. तथापि काही भाग स्वतःस अनुलक्षून आहे अशा गैरसमजानें दुखावण्याइतकें कुणाचें मन हळवें असलें तर त्यानें आमच्या हेतूकडे लक्ष्य देऊन क्षमा करावी. हेतूकडे लक्ष्य दिल्यास शिक्षा सर्वस्वीं टळली नाही तरी गुन्ह्याच्या स्वरूपांत सौम्यता दिसूं लागते. प्रचलित रूढि व संस्था यांत योग्य क्रान्ति घडून खऱ्या महाराष्ट्रधर्माची प्राणप्रतिष्ठा व्हावयास मदत व्हावी या हेतूनेंच प्रस्तुत कथानक रचण्यांत आलें आहे. जातिभेद बीमोड केल्यावाचून, धर्मदृष्ट्या पूर्णसमता स्थापिल्याविना आणि स्त्रियांच्या बाबतींत स्वयन्निर्णयाचे हक्क मान्य होण्याइतका त्यांचा स्वतन्त्र दर्जा कबूल केल्याशिवाय प्रगति अशक्य आहे असा आमचा सिद्धान्त आहे. याविषयीं सविस्तर चर्चा पुढें कुठें तरी करूं ; ती करण्यास हें स्थल योग्य नव्हे.

प्रस्तुत काव्यांत कथानुषङ्गानें इतर सामाजिक विषय आलेले असले तरी व्यक्तिमाहात्म्य व विवाहसुधारणा हे दोन प्रामुख्यानें ठेविले आहेत. स्वातन्त्र्य म्हणजे अमर्याद स्वैराचार बिल्कूल नव्हे; परन्तु सामाजिक शिस्त म्हणजे तरी इतरांनीं निमूटपणें सोसावयाचा व शिवाय धर्म्य मानावयाचा असा अल्पसङ्ख्याक लोकांचा जुलूमही नव्हे. स्वतःच्या स्वातन्त्र्याला जपणाऱ्यानें दुसऱ्याच्या स्वातन्त्र्याला तितकाच मान द्यावयाचा असतो ही एकच स्वातन्त्र्याची मर्यादा होय; आणि या मर्यादित व्यक्तिस्वातन्त्र्याचेच पवाडेकार होण्यांत आशावादी कवींना भूषण वाटतें. इतर कोणत्याही व्यक्तीला बाध न आणतां शक्य तें ऐहिक व पारलौकिक सुख भोगण्याचा व स्वतःची उन्नति करून घेण्याचा प्रत्येकाचा हक्क जन्मसिद्ध आहे. या हक्काला काही अंशा

व्यक्ति आपखुशीनें समष्टीच्या हितासाठी सोडील; तसें करणें कर्तव्यही आहे; पण तें तीस पटलें पाहिजे, समष्टीनें पटवून दिलें पाहिजे; नाहीतर जुलूम होईल. स्वतःच्या सुखसोयीसाठी दुसऱ्याला कमीअधिक असह्य गुलामगिरींत राववण्याचा प्रयत्न करणें हा मनुष्याचा स्वभावधर्म असला तरी तो रानटीपणाचा द्योतक आहे. त्याचें समर्थन स्वार्थी सुल्तानांनीं व नादान गुलामांनींच करावें. अर्थात् स्वातन्त्र्याचा दुरुपयोग होईल या भीतीनें स्त्रियांस मानसिक व कायदेशीर सामाजिक दास्यांत ठेवणें सुधारकास कधींही मान्य होणार नाही.

प्रस्तुत काव्यांत प्रेम आणि विवाह यांच्या निरनिराळ्या बाजू दाखविण्याचा प्रयत्न आहे. या विषयाच्या सार्वत्रिक पिष्टपेषणांत आम्ही सामील झालों आहों हें पाहून आमची, व आमचा सुधारणावाद प्रेम आणि विवाह या विषयावरच केन्द्रीभूत झालेला पाहून आमच्या सुधारणेची काही लोक कींवच करितील! तथापि सूक्ष्म नजरेनें खोल व दूरवर पाहणाऱ्यास या प्रश्नांत मानवजातीस शाश्वत महत्त्वाची व जिव्हाळ्याची अशी नवता आढळेलच आढळेल. मुलाच्या हातांतून तें पुस्तक प्रामाणिक सन्तापानें ओढून घेऊन एकान्तांत 'प्रभाकराच्या लावण्या' वाचणारे आणि खासगी मण्डळींत बीभत्स कोट्यांनीं ग्राम्यतेची हौस पुरवून घेऊन बाहेर अश्लील वाङ्मयाच्या प्रसाराचा निषेध करणारे जगांत काय थोडे आहेत? " नको नको त्रासून म्हणावें, परन्तु घ्यावें, द्यावें। हें प्रेमाचें लक्षण नाहीं कुणा प्रेमला ठावें ? " प्रेमाला नाकें मुरडणारे लोक प्रेमाचे प्रच्छन्न प्रेमीच असतात. रूढीच्या चण्डिकेपुढें सामाजिक समारम्भानें एखाद्या स्वातन्त्र्यवादी मनुष्याचा बळी दिला की तिच्या भक्तांना धर्माच्या पडद्याआड, दृष्टीआड सृष्टी या न्यायानें नङ्गा नाच उजळ माथ्यानें घालण्याची मुभा मिळते. अन्धारांतील व्यवहार म्हणजेच संसारांतील सार अशा मताच्या लोकांना आदरयुक्त स्वार्थत्यागी प्रेमाचें महत्त्व कसें कळणार? बर्नार्ड शॉ यांच्या मताचा मुलामा लेऊन समतास्वातन्त्र्याची तुतारी वाजविणाऱ्यांना सुद्धा आधुनिक प्रेमगीतांत उदात्तता दिसत नाहीं, तर संस्कृतांतील शृङ्गारविलासास सुखितललितोदात्त सङ्केत वा बौद्धिक प्रणय (का व्यभिचार ?).

ऱ्या शब्दसमुच्चयानें गौरवून त्याच्या वर्णनतीर्थांत अवगाहन करण्यांत दोष न मानणाऱ्यास प्रेमाच्या धवलगिरीवरील विरल हवेंत गुदमरल्यासारखें होऊन इतरांसही त्या ठिकाणीं वेड लागेल अशी भीति कां वाटूं नये ?

अशा लोकांना प्रेमाचें व लैङ्गवृत्तिविषयक[1] चर्चेचें वावडें असलें तरी विवाहाविषयीं व फलशोभनादि संस्काराविषयीं कुतूहल वाटतेंच वाटतें. विवाहाविषयींचें हें कुतूहल आबालवृद्धांना वाटतें म्हणूनच, ज्याप्रमाणें गप्पांचें मोठें क्षेत्र स्त्रीपुरुषविषयक कण्डयांनीं, त्याप्रमाणें वाङ्मयाचें बरेंच मोठें क्षेत्र विवाहाच्या विषयानें व्यापिलें आहे. बाळपणीं भातुकलीच्या खेळांत कुतूहलानें पुढील संसाराची नक्कल होत असते. खरोखरीच्या संसारांत अनुभूतीच्या धगीनें मुग्ध काव्यात्मता आहाळून जाऊन बहुधा काही तरी हरपल्या श्रेयासाठी जरी हळहळावें लागलें तरी कित्येकदा तारुण्याचें उधाण ओसरल्यावर स्त्रीपुरुषसम्बन्धाच्या शाश्वत आनन्द देणाऱ्या बाजू दिसूं लागतात. म्हातारपणींही मृत्यूच्या जबड्यांत हळूहळू खेचलें जात असल्याची भावना होत राहून 'का ते कान्ता कस्ते पुत्रः' असे उद्गार वार्धक्यसहज वैराग्यानें बाहेर पडत असतांना देखील मनुष्यजातीची परम्परा विधिपूर्वक कायम ठेवणाऱ्या या स्त्रीपुरुषसम्बन्धाविषयीं कौतुक कमी होत तर नाहींच, उलट सूनमुख ह्मणजे पुढील पिढीचे सुखसोहाळे पाहण्याची जिज्ञासा तीव्रतर झालेली दिसते. विवाह होईपर्यन्त व्यक्तींविषयीं भिन्न भिन्न व्यक्तींशी विवाह ठरल्याच्या भुमका उठण्याइतकेंही सामाजिक कुतूहल वाटलें तरी त्यांच्या विवाहोत्तर स्थितीविषयीं समाज पूर्ण उदासीन रहातो. त्यामुळें विवाह हा एक प्रकारचा मृत्यूच होय असें हिन्दुस्थानांत निदान स्त्रियांविषयीं तरी ह्मणायला हरकत नाही.

क्वचित् प्रसङ्गींच सन्धि मिळून प्रौढ व सुशिक्षित वधूवरांनीं एकमेकांस मनानें वरावें, वराचें दारिद्र्य पाहून दुहितृहितैषी पित्यानें विवाहास सम्मति देऊं नये, मुलीवर जरूर पडल्यास सामभेदादि प्रयोग करून अखेर तिचें लग्न

---

१ लैङ्गवृत्ति=( 'सेक्स इन्स्टिङ्क्ट्' ) हा शब्द आम्हास फारसा रुचत नाहीं, आणि स्त्रीपुरुषांतील बौद्धिक व शारीरिक क्रान्ति घडवून आणणाऱ्या प्रवृत्तिभेदाला नवीन नांव कुणी सुचविल्यास आनन्दानें स्वीकार करूं.

एकाद्या राजमान्य श्रीयुतांशीं – विशेषेंकरून वडया हपीसरांशीं – लावून द्यावें हीं नेहमीचीच कथा आहे. परन्तु अशाच तऱ्हेचा प्रसङ्ग एका स्नेह्यावर कोसळल्यामुळें प्रस्तुत काव्यास १९२४ सालीं स्फूर्ति होऊन त्याबरोबर ४–५ अध्याय लिहून झाले; व पुढें काम थाम्बलें तरी कथानक वर्षभर तसेंच डोक्यांत घोळून अखेर, १९२६ च्या आरम्भीं काव्यास पुन्हा चालना मिळून एप्रीलच्या आंत अमळनेर येथेंच हें काव्य पुरें झालें.

सुधारक काव्यांतील पात्रें ह्मणजे खरोखरीच्या व्यक्तींच्या हुबेहूब वा सुसंस्कृत छाया नव्हत, तीं शुद्ध काल्पनिक आहेत, हें आह्मी कल्पकतेचें स्वातन्त्र्य सिद्ध करण्याकरितां साङ्गत नाही. कथानक कल्पित व स्वतन्त्र आहे याचा अर्थ असा नाही कीं पात्रांचे गुणदोष, त्यांच्या संवयी, जीवितांतील विविध प्रसङ्ग हीं अदृष्टपूर्व वा अभूतपूर्व आहेत. या बहुतेक गोष्टी वाचकांनीं सुद्धा भिन्नभिन्न ठिकाणीं पाहिलेल्या वा ऐकिलेल्या असतात ह्मणूनच त्यांना कथावाचनांत एक प्रकारची आपुलीक वाटते. (उत्कृष्ट वाङ्मय हें अनुभूताचें स्मारक व अननुभूताचें सूचक असतें.) परन्तु पात्रांचा आरोप खरोखरीच्या व्यक्तींवर करण्याचा मोह वाचकांस झाला तर तो त्यांच्या सूक्ष्म जिज्ञासेचा दोष नसून त्यांच्या परिस्थितीचा आहे. खरोखरीच्या व्यक्तींची नांवें आकर्षक ह्मणून तीं घेऊन त्यांच्या जीविताशीं बादरायणसम्बन्धही जोडतां येणार नाही असें कल्पित कथानक रचण्याकडे किंव्वा खरोखरीच्या व्यक्तींचीं नांवें दुर्बोध होणार नाहीत अशा रीतीनें तीं विकृत करून त्यांच्या सन्बधींच्या गटारगप्पांचा गाथा प्रसिद्ध करण्याकडे लेखकांची, पोट भरण्याकरितां वा खासगी सूड उगाविण्याकरितां, दुष्ट प्रवृत्ति असल्यामुळें वाचकांची जिज्ञासा विशेष साशङ्क होते.[१]

---

१ वृद्ध कवि ही कविता रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर वा रा. भास्कर रामचन्द्र ताम्बे यांस अनुलक्षून आहे असें पुष्कळांनीं बोलून दाखविलें. यांत या दोघांचा गौरव होतो हें पाहून आम्हांस आनन्दही वाटतो. परन्तु चित्रमय जगतांत रा. अनन्ततनय यांचे ‘ अन्तर्मनींचे उमाळे’ प्रसिद्ध झाल्यावर कवींच्या असहिष्णु दर्पावर खासगी टीका झाली. त्यावेळीं खरी कविवृत्ति कशी असावी हें दाखवण्याकरितां वृद्ध कवि हें गीत रचिलें गेलें.

जें पद्यात्मक तें काव्य या व्याख्येप्रमाणें, या ग्रन्थास 'धीटपाठ' काव्य[१] मानिलें तरी त्यांत काव्यकला अत्यल्प आहे असा कुणी आक्षेप घेईल. त्याला, प्रीतीच्या बाजारांत ज्याप्रमाणें गुणापेक्षां काञ्चनाची शक्ति अधिक त्याप्रमाणें बुद्धीच्या व्यवहारांत तरल काव्यगुणापेक्षां विद्वज्जडतेचीच प्रतिष्ठा अधिक असते असें उलट विधान करून समाधान करून घेण्याचें आह्मांस कारण नाही. कलासृष्टि ही अगदी अहेतुक असते आणि प्रस्तुत काव्य तर तुतारीच्या सुरावर सुधारणेच्या दसरा– मोहिमेसाठींच लिहिलेलें आहे. शिवाय आह्मी 'कवि' आहों असें आह्मांस आजपर्यन्त कधींही वाटलें नाही; कारण ज्याची सहजस्फूर्त पद्यरचना जन्मसिद्ध सौन्दर्यानें व वैभवानें युक्त असते तोच खरा कवि होय. तथापि इतरांनीं नन्तर फाशी फर्मावण्याच्या हेतूनें आमच्यावर कवित्वाचा अवस्त्वारोप केला तर त्याचा दोष आमच्याकडे नाही. हौशी पद्यकार होऊन कधीं काळीं एखादी कविता मासिकांत झळकून मागें कवि ही सवङ्ग पदवी लाभावी, इतकाच आमचा आवाका. आता या हौशी पोरखेळांनीं हौस पुरून चुकेल इतकें उण्दड-मत्सरातीत यश आम्हास मिळवून दिलें आहे याबद्दल आम्ही जनतेचे ऋणी आहोंत. तथापि आह्मांस मेरी कॉरेलीच्या गॉड्स गुड मॅन या कादम्बरींतील जूलियन् ॲडर्लेप्रमाणें वाटतेंच. तो ह्मणतो, "मी काव्यच लिहितों अशी माझी खात्री नाही. सताल सयमक भाषेंत मी माझें वैशिष्ट्य (मूळांत identity आहे) व्यक्त करण्याचा प्रयत्न करितों. परन्तु तसें करूनही ही माझी अभिव्यक्ति गद्य व बहुजनसमाजास अकुतूहलजनक अशीही असूं शकेल".

या काव्यांत कल्पनेच्या भराऱ्या, अदृष्टपूर्व साम्यभेदाचें प्रदर्शन, अलङ्काराची नजरबन्दी जडण, नादमधुरशब्दांची घडण वा एखादा अव्यक्तांतील सन्देश काहीएक नाही, हाच या काव्याचा गुण आहे. काव्याला चटकदार आधुनिकता येण्यासाठीं कित्येक विषयांचा थोडाफार परामर्श घेतल्यामुळें सुदैवानें अप्रस्तुतप्रशंसा हा एक तरी अलङ्कार यांत सापडेल. तथापि या धीटपाठ काव्यानें काही लोकांस तरी आनन्द वाटेल या आशेनेंच आह्मी प्रसिद्धीकर-

१ "धीत्राचि कवित्व जोडिलें। दृष्टी पडिलें तेंचि वर्णिलें। भक्तिवांचून जें केलें। त्या नांव धीटपाठ" ( दासबोध ).

णास प्रवर्तलों आहों. काव्याच्या मयसभेंत गाङ्गरलेल्यांना व गूढगुञ्जनाच्या गुहेंत कण्टाळलेल्यांना या खुल्या माळरानावरील सहल सुखकर होईल. शृङ्गाराला व्यभिचार समजून भिऊन पळणाऱ्यांना विनोदाच्या सोवळ्या मन्दिरांत बसून चार घटिका चकाट्या पिटतां येतील. विद्वत्तेचें जड जुम्बाड प्रिय असलेले तळटीपांच्या सङ्ख्येंत समाधान मानतील. दाढीच्या लाम्बीवरून ज्ञानानुभवाची थोरवी वा पद्यसङ्ख्येवरून प्रतिभेची महती मोजणाऱ्यांना या काव्याची अष्टादशाध्यायी लाम्बी गार करील. विचारपूर्वक वाचन करण्याची संवय नसल्यामुळें कुणास हें दुर्बोध भारूड वाटेल. पण प्रसाद ह्मणजे सरळ शुद्ध सुबोधता नव्हे असें मानून शब्दच्छलाच्या चलाखीनें अनेकार्थाचें गारुड दाखविणाऱ्यांना येथें वाव मिळेल. मूर्खांचीं लक्षणें, व्यवहाराचातुर्याच्या खुणा वगैरे शोधणाऱ्यांना अर्धवट खरीं प्रमेयें विखुरलेलीं पाहून चुकल्याचुकल्यासारखें होणार नाही. केवळ गोष्ट प्रिय असलेल्यांना कथानक थकेल; आणि तात्पर्यसंशोधकाला काहीतरी तात्पर्य सापडेलच सापडेल. निरनिराळ्या लोकांना विरुद्ध पक्षाची कुचेष्टा वाचून गुदगुल्या होतील. पण एकाचें अमृत तें दुसऱ्याचें विष या न्यायानें, स्वप्रत्ययनेयबुद्धि असलेल्यांना स्वतांचीं प्रतिबिम्बें दिसायला लागून खाजकुइल्या लागतील! ते ग्रन्थकर्त्यावर (समूळ ग्रन्थ पाहिल्यावीण, बहुधा) टीका करून स्वाभाविक निन्दनप्रियतेचा कण्डू शमवून घेतील. समाजस्थिति बदलणारी असल्यामुळें उल्लेखांच्या परिणामकारकपणाबरोबरच उत्तरोत्तर काव्याचा गहिरेपणा कमी होत जाईल हा विचारही कुणाला समाधान देईल.

असो, प्रस्तावना बरीच लाम्बली. धारेला लागलेला मनुष्य पोहूनही कडेला बऱ्याच अन्तरावर लागतो. सहानुभूतिपूर्वक आमचा शोध घेत घेत येथपर्यन्त एखादा दुसराच आलेला दिसेल. तेव्हा आभारप्रदर्शनाची रूढि पाळावयाची झाल्यास त्याचेच आभार मानून ह्मणावें, "आह्मी जातों आमुच्या गांवा! अमुचा रामराम घ्यावा."

ता. २१ जानेवारी १९२८ इसवी
डेक्कन जिमखाना, पुणें.

**माधव जूलियन्**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रस्ताव, काव्यशास्त्रविनोद | ४ |
| १ ला अध्याय | रावबहादुर ठोसर | ९ |
| २ रा | रावबहादुरीण | १८ |
| ३ रा | सावधान | २५ |
| ४ था | सुशीला देवी | ३४ |
| ५ वा | महाविद्यालय | ४४ |
| ६ वा | वासूचे विचार | ५३ |
| ७ वा | रङ्गराव | ६१ |
| ८ वा | हतभागिनी | ७१ |
| ९ वा | मेजर गोखले | ७८ |
| १० वा | डाक्तर ॐकार | ८५ |
| ११ वा | तरला | ९७ |
| १२ वा | ध्येय का व्यवहार? | १०६ |
| १३ वा | श्यामा वेङ्गुर्लेकर | ११८ |
| १४ वा | पुं-स्त्रीमैत्री | १३० |
| १५ वा | सगुणा | १३९ |
| १६ वा | हलकल्लोळ | १५० |
| १७ वा | संव्सार | १५६ |
| १८ वा | पुढें? | १६५ |
| | उपसंव्हार–सम्भावना | १७१ |


# शुद्धिपत्र

पृष्ठ ११६, कडवें ५२ ‘उच्छृङ्खल’ ऐवजीं ‘चोखन्दळ’ वाचावें.

पृष्ठ १७३, कडवें १३, ‘संव्स्कृति’ ऐवजी ‘संसृति’ही चालेल.

# सुधारक

## उपोद्घात

### काव्यशास्त्रविनोद

—" कां काळाची महती गातां ?
काळास पुढें कोटी व्यक्ती
अनिवार जिची ध्येयासक्ती;
अवतार गणी मग तिज भक्ती,
परिस्थितीच्या खाउन लाथा १
जाल पुढें घालित लोटाङ्गण.
त्यांत तूमची काय शहामत ?
डोङ्गररानांतून नवा पथ
काढी त्याची खरी करामत !"
"एकानें परि करून भाण्डण, २
अवमानूनी स्वधर्मनिष्ठा,
क्रान्ति कराया जावें पुढतीं
आणि मरावें नाहक जगतीं,
यांत समाज न पावे प्रगती.
धर्म सनातन जगत्प्रतिष्ठा"—३
" धर्म खरोखर काय परन्तू ?
तत्त्व जाणुनी कार्य करावें,
फळीं फोडुनी पुढें सरावें,

२ शहामत = धैर्य, शौर्य. करामत = अलौकिक कृति. ३ जगत्प्रतिष्ठा, पहा—'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा'.

काव्य सं. ८८०
ता. ९।१२
क्र. सं. ३६८

झुन्जत मरुनी पुन्हा उरावें,
हो नारायण मग नरजन्तू !" ४
तुम्बळ यापरि चाले तर्कट.
खेळाडू ईर्ष्येनें लढती
तेही माण्डुन कडोविकड ती,
वादविवादीं सहजच पडती,–
कुणी सुधारक कोणी कर्मठ. ५
स्निग्ध मधुर वस्तूंची चङ्गळ.
जादा बैठक, आज दिवाळी;
हवेंत माजे धूम-धुमाळी,
सुमङ्ग गप्पा, गीत, टवाळी–
असें परीक्षा दूर अमङ्गळ. ६
कर्मठ तो यज्ञेश्वर दाणी,
तरुण सुधारक नेने बाबू,
गुलाब पै तर उदार खाबू,
खेळांत बने हटकुन झब्बू
वीर कोण ? पीताम्बर वाणी. ७
करित भज्यांचा धोण्डू स्वाहा
तैसे तुकवित नुसत्या माना,
शब्द न बोले तोच शहाणा,
मधु स्वतांशी घे हळु ताना,
म्हणे मधूनच, 'हूं हूं ! हां हां !' ८

४ 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' (रामदास). ५ कडोविकड माण्डून = निकरानें, नाना तऱ्हांनीं ६ धूम-धुमाळी = धूर व कडकडाट; धुमश्चक्री. परीक्षा.– सन १९१४पर्यन्त विश्वविद्यालयाच्या वार्षिक परीक्षा हिंवाळ्यांत दिवाळीच्या आसपास होत असत. ७ झब्बू.- पत्त्याच्या एका डावांत अखेर ज्याच्या हातांत पत्ते उरतात त्यास व त्या खेळास झब्बू म्हणतात. वृथाभिमानी लब्धप्रतिष्ठित या अर्थानें झब्बू या शब्दाला प्रो. नारायण केशव वेहरे यांनीं काही वर्षांपूर्वी सन्देशांत लेखमाला लिहून पुढें आणिलें.

तों ‘ मर्दानी झांशीवाली ! ’
खडे शब्द कानावर पडले,
बडे वीर तत्क्षणिं खडबडले,
एक म्हणे “ हे कवि कुणिकडले ?
हाक मारुं या ? आज दिवाळी. ” ९
ठरलें, गेलें त्यास निमन्त्रण.
तरुण ये वरी, दिसला नादी,
अङ्गावरती सफेत साधी
हातसुताची जाडी खादी,
जमले भंवतीं रसिक मित्रगण. १०
सहजच गेला हात गळ्याशी
गळपट्टीचें बटण निघालें,
वीरश्रीचें म्हणणें झालें,
मज्लशीतले खुशीत आले,
आणि म्हणाले, “ वा! वा ! खाशी ! ” ११
अखेर शमतां तें धूम्धडडड
“कोण ? कोठले ? ” पुशिलें कोणी,
तो दे उत्तर हें हांसोनी,
“नांवगांव अप्रस्तुत दोन्ही,
खादीस्तव ही बडबड, धडपड. १२
न ‘ काव्यकुञ्जर ’, ‘ काव्यकदम्ब ’ न !
कालपरत्वें केलें धाडस,

९ ‘ मर्दानी झांशीवाली. ’ कविवर्य तिवारी यांच्या लोकप्रिय सङ्ग्रामगीतांपैकीं उत्कृष्ट पवाडा. १२ ‘ धूम्धडडडधडडड नादें आकाश भरोनी गेलें’ (तिवारी) १३ ‘कविपञ्चानना’सारख्या पदव्या काही कवि इच्छितात व त्या मिळूंही शकतात. काही कवि आपली पदवी अभिमानपूर्वक मिरवतात; परन्तु कुणाकुणाला पदवी मिळू-नही ते तिचा वास आपल्या खेड्यांसही लागूं देत नाहीत !

विटाळ्यांत परि नच जमला रस,
प्रसिद्ध व्हाया हवी शिफारस,
प्रसिद्ध करुनहि होय विडम्बन. १३
कीर्ति कोठली ? सार वाया !
अतां दुज्यार्चीं म्हणतों गाणीं,
खिशांत गोळा होतीं नाणीं,
जो तो श्राव्यासच वाखाणी,
स्त्रियाहि जमती तें ऐकाया. १४
नव कवितेचा गाजावाजा
केला कोणी ? आनन्दानें
महाराष्ट्रभर साधें गाणें
गाउन हलवुन परिषत्स्थानें
गर्जेत ' हा हिन्द देश माझा !' " १५
बाबू सुचवी, "काही गा हो
ज्यांत खुमारी, तऱ्हा नवी तें,
रसाळ गज्जल, टन्च सुनीतें-"
-" नकोत छे ! तीं कृत्रिम गीतें !"
—" आणि शाहिरी कर्कश टाहो ? १६
विविधालङ्कृतिमय वा झङ्कृति ?
चमत्कृतींची अनन्त माला,
वात्र सापडे श्लेषतमाला.
प्रकाश न मिळे, नसे जिव्हाळा,

१३ मासिकांतून प्रसिद्ध होणारी कविता म्हणजे कवितेचें विडम्बन असतें, वा पुढें तिचें विडम्बन होतें. १५ 'हा हिन्ददेश माझा ।' (आनन्दराव टेकाडे). १६टन्च = आतां फुटेल की काय अशी भीति वाटण्याइतकें रसानें भरलेलें(फळ). शाहिरी–शाइर = कवि. परन्तु हा शब्द विशेषतः लावणी–पोवाडे रचणाऱ्या कवीस लावतात. राष्ट्रीय आधुनिक कवीस या गैर-मराठी शब्दानें सम्बोधून घेणें विशेष भूषणावह वाटतें.

नकोत असल्या जरि त्या सत्कृति !" १७
"परक्यांच्या परि नकोत नकला,
वर मथळा 'रेघेस' 'फुलीला',
उद्देशुन बहुतेक मुलीला-"
"अनघ विशीची ही मधु लीला !
बहकण्यांत या परि काव्य-कला !" १८
"प्रेम नको ! तो विषयच चावट.
जरी सजविला विविधकलांनीं,
तरुण मनांची करून हानी
सुचवि सनातनधर्मग्लानी,
शून्यशोधनीं करा सजावट-" १९
" राधामाधव ? रुचतिलना तीं ?
' रतिसुखसारे गतमभिसारे-'
प्रसङ्ग अध्यात्मांतिल सारे;
भक्तिरसाचे तुटती तारे,
पुरुष-प्रकृतिचीं हीं नातीं !" २०
"हेंहि नको का ? याला आधी
हवें अविकृत जरी सत्य तर
वेदान्तच द्या मथित मथ्यतर,
सूत्र, कारिका रूक्ष पथ्यकर-

१८ रेघेस = -स; फुलील = *ला. विशी.- पञ्चविशींत गद्धपणा असतो असें म्हणतात, असेलही. परन्तु विशींत म्हणजे नवतीच्या बहरांत एक प्रकारचें अनघ काव्य-लालित्य असतें. याच वयांत, कालपरत्वें, नीरस लोक सुद्धा चुकलीमुकली कविता लिहितात. १९ शून्यशोधन = मिस्टिसिझम् ! परन्तु मिस्टिक हा शून्यसंशोधक नसून मूल तत्त्वाशीं अनुभूतीच्या योगानें समरसूं पाहणारा मुमुक्षु असतो. २० रतिसुखसारे इत्यादि (जयदेव कविकृत सुप्रसिद्ध गीतगोविन्द पहा). २१ मथ्य-मथित हे शब्द सार्थ आहेत. वेदान्ताचें कितीही मन्थन केलें तरी तें अपूर्णच रहाणार असें वेदान्ताभिमानी म्हणतात. नवनीत अनन्ताच्या अन्तींच हातीं लागावयाचें !

छे ! शब्दांतहि परि नरमादी–" २१
"गभीर नीरस काही नलगे.
चैनीच्या या चञ्चल काळीं
रुचे कथेची मधुर नव्हाळी,
कुठें गुदगुली, कुठें कुचाली,
विनोद थिल्लर जिवास बिलगे. " २२
" आहेतच मग 'फुलें झेण्डुचीं'
गळ्यांत घालुन कुणी मिरवितो !"
करी तुणतुण्यावर तुंइ कवि तो,
दसऱ्याला होरीच सुनवितो !"
"भिन्न प्रकृति भिन्न अभिरुची ! " २३
" खूश कसें करुं मी सर्वांना ?
म्हणतों आवडलेलें केका
खुशाल रुचलें तर तें ऐका,
पण द्या मागुन काही पैका,
वाचा गान्धींचा पर्वाना." २४
" काव्य कुणाचें ? " "असेल कोणी
व्यवहाराचा रस्ता चुकला,
वेडा झाला, जगास मुकला,

---

२२ थिल्लर=खाचखळग्याप्रमाणें खोल नाही असा. २३ झेण्डूचीं फुलें.–विडम्बन-काव्यसङ्ग्रह, लेखक, अध्यापक व अध्यापनशास्त्री श्री. प्रल्हाद केशव अत्रे, (केशवकुमार) बी. ए., बी. टी. पुस्तकाची पहिली आवृत्ति दोन वर्षांत खलास होण्याचा मान या पुस्तकास मिळालेला आहे. होरी–होळीच्या सणांत म्हणजे शिमग्यांत म्हणावयाचें गीत. २५ वेडा. 'मी वेडा आहे' असें अट्टाहासानें साङ्गण्याची व जगास भासविण्याची टूम केशवसुतांच्या वेळीं व त्यांच्या मागून फार होती, टिळकांची 'वेडा' ही कविता (पृ. १०६) मात्र उत्कृष्ट व अत्यन्त हृदयस्पर्शी आहे.

जीवन त्याचें कशास उकला ?
त्यास पडूं द्या विपिनीं कोनीं." २५
" पण कवितेवर जातां दृष्टी
जीवितौघ कविचा बिल्कुल तो
मार्मिकतेनें ज्याला कळतो
मोठा टीकाकार कुशल तो !
स्रष्टयावाचुन कसली सृष्टी ?" २६
" अतर्क्य तो पण धनी स्वताचा– "
"कलाकृति तरी जगताची पण– "
" तिचें हवें तें करा परीक्षण,
म्हणा मनोरम किंव्वा भीषण,
उधळा पुष्पें अथवा टांचा. २७
नांवहि सुद्धा हवें कशाला ?
पूर्वग्रह लावील उपाधी,
होइल मग सविकल्प समाधी,
तुम्ही काव्यगुण उचला आधी,
महाग कवि तो जरी पशाला." २८
काव्य म्हणे तो, काय नवाई !
गद्यच तें म्हणण्यांत बहारी.
चटक कथेंतहि काही न्यारी,

२५ ते म्हणतात 'मी बसेन विपिनीं कोनीं–यापुढें। मजपुढें विषामृत दोन्हीं–यापुढें'. २६ स्रष्टा, सृष्टि.–सृष्टीच्या ज्ञानानें स्रष्टयाचें ज्ञान होतें असें कुणी ह्मणतात तर लेखकाच्या लिखाणावरून त्याचा मनोविकास व त्याचें चरित्र यांचें संशोधन कुणीकुणी टीकाकार करूं पाहतात. २८ पशाला=पसाभर धान्याला. सविकल्प समाधि.–बडोदे येथील महाराष्ट्र साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष या नात्यानें रा. नरसोपन्त केळकर यांनीं केलेल्या भाषणांत वाङ्मयापासून होणाऱ्या आनन्दास निर्विकल्पापासून भिन्न करण्यासाठीं सविकल्प म्हटलें आहे.

आवाजाची अजब तयारी,
देखा टेकडीच सवाई ! २०
मधेंच येउन कुणा खुमखुमी
भला बुरा जर दिधला शेरा,
उलट न झाडी तो ताशेरा,
घेइ कथेचा जोडुन दोरा
पुरे शिफारस—ऐकाच तुम्ही. ३०

---

३० भलाबुरा शेरा.–हे भुले बुरे शेरे छपाईंत कंसांनीं व अवतरणचिन्हांनीं दाखविले आहेत.

अध्याय १ ला

## रावबहादुर ठोसर

बडे सुधारक कोण खरोखर ?
भव्य बङ्गला, बगिचा भंवती,
विचित्र सुमनें नव टवटवती,
ठळक अक्षरें पाटीवरती
**'रावबहादुर के० व्ही० ठोसर'** १

शहराबाहिर नवी वसाहत,
अलग बङ्गले बड्याबड्यांचे
वकील, डाक्तर, हपीसरांचे,
रङ्गाकारहि विविधतऱ्हांचे,
रमे फिरावें शोभा पाहत. २

बहादुरांची तऱ्हा आगळी !
आंत चहाच्या त्या मेजावर
उपकरणीं झळकतात सुन्दर,
प्रातराचमन करिती मन्थर
रावबहादुर आणि मण्डळी. ३

नांव न सुललित--**केरो विष्णू.**
दोष कुणाचा ? अडलें कोठें ?

---

३ प्रातराचमन=पेला तोण्डाला लावूनच प्रातःपेयाचे ह्मणजे चहाचे, हळूहळू घुटके घेणें. ४ दोष कुणाचा.— आपण ठेवलेलें व जन्मभर मुलास चिकटणारें नांव त्या मुलाला पुढें आवडेल की नाहीं याचा विचार कोण करितो ? हौस असते आई-बापांची. 'ठोसर'=दणगट, व्यावहारिक.

पदवी मिळवुन झाले मोठे,
म्हणोत कोणी काही ? खोटें !
असती ठोसर आणि सहिष्णू ४
गरीब होते, झाले गब्बर;
शोधक बुद्धी, भेदक दृष्टी;
रसवन्तीची मोहक वृष्टी
सलील अभिनव निर्मी सृष्टी;
अदालतींमधिं हे मातब्बर. ५
हटकूनी जो जिङ्की खटला
बुद्धिधनें जो खन्यास अडवी,
कशीहि बाजू छानुन पटवी,
'वकील' त्याला यथार्थ पदवी;
न्याय कायद्यापुढें लटकला. ६
यांत का बरें म्हणतां अर्थ न ?
अर्थप्राप्तीस्तव हा धन्दा;
कुणीहि निन्दा अथवा वन्दा ?
पोटोबाचा कोण न बन्दा ?
वकिली म्हणजे पक्षसमर्थन. ७
ठोसर त्यांतुन निकोप मध्यम,
वृत्ति सदोदित आशावादी,
स्वार्थ बघुन ती परार्थ साधी,
समुचित वदुनी स्वर संव्वादी,
न ढळायाचा बहुधा संय्यम. ८

---

५ अदालत=न्यायमान्दिर. मातब्बर=विश्वसनीय, थोर, प्रतिष्ठित. ६ मध्यम.— "हे तो मध्यम जे निजार्थ करुनी अन्यार्थ सम्पादिती" (भर्तृहरि–वामनी भाषान्तर). संव्वादी=गायनांत वादी स्वराशी जुळता येणारा.

म. ग्रं. सं. ठाणे.

असे कायदेबाज बिलन्दर !
सद्दींची वर कमान चढते,
विलायतेची यात्रा घडते,
परी स्वताला पैहि न पडते,
ताले त्यांचे असे शिकन्दर ९
नरम गरम माण्डघोळ डगला,
सरळ उभा, ती तऱ्हा पारशी,
पगडीची झिळमिळ पहा कशी !
सोनकडी डोळ्यांस आरशी,
स्वच्छ वेष सम्भावित सगळा. १०
नेत्रें निळसर आणि थोर तीं.
दोन आडव्या रेषा भाळीं,
ओठ मिशांच्या लपले खालीं,
मानेवरती अर्धी काळी
सज्जाबाची चन्द्रकोर ती ११
आणि पुढें तकतकीत टक्कल.
उगीच का हें दैव उगवलें ?
वदन गुलाबी हें घवघवलें,
शरीर सुखवस्तू लवथवलें,
वकिली परि तरतरीत अक्कल. १२
थकतां रात्रीं आरामास्तव
तर्र कराया मेन्दू सुकला
नेमस्त असा चषक न चुकला;
शुद्धीला कधिं जीव न मुकला,
निन्दा वा स्तव नको अवास्तव. १३

काव्य ८८

९ बिलन्दर (<बलन्द्)=उच्च, बेलाग, धूर्त. ११ सज्जाब=घेरा. १२ दैव—'खल्वाटो निर्धनः क्वचित्'. घवघवणें=सतेज होणें, तेजाळणें. लवथवणें=सैल होणें.

सुशिक्षिताचा, अन् मर्यादित,
म्हणुन, दोष हा, परन्तु वगळा;
संव्सार पहा यांचा सगळा,
धुतला तान्दुळ, सफेत बगळा.
चाले योगक्षेम अबाधित. १४
भङ्गायाचा यांचा नेम न;
अन्थरुणीं हरिनाम, भुपाळी,
सहल मागुनी दूर सकाळीं,
स्नान आणि मग गन्धहि भाळीं;
करि गीतामृतपान पुढें मन. १५
विद्यार्थ्यांची जिवन्त कळकळ;
दिवस कठिण ते कधींच सरले
न हे म्हणूनी त्यांस विसरले,
यांच्या मदतीवर बहु तरले,
पसार झाले असेहि पुष्कळ. १६
सार्वजनिक हितकारक संव्स्था,
हातभार यांचा न चुकावा,
वचनांचा वर्षाव न ठावा,
सर्काराला लव न सुगावा,
गुप्तदान हा धार्मिक रस्ता. १७
अध्यक्षाचें यांस सदा पद.
उदार यांची रसाळ वाणी
माण्डी जनतेचीं गाऱ्हाणीं;
तडजोडीची रीत शहाणी,
थोडी का जनसेवा तापद? १८

१६ **पसार**=परीक्षेंत उत्तीर्ण किंव्हा पलायमान.

नाशनिष्ठ भावनानुसारी
    बेफामीनें म्हणती 'धावा'!
    पुढील मागिल पोंच न ठावा;
    कार्यभाग तर कुणि साधावा?
नेमस्तांनीं, तेच पुढारी. १९
आपुलिकीची त्यांची भाषा
    स्पष्ट दोष दे हिन्दूंनाही;
    परी कुणाला विषाद नाहीं:
    त्यांत मिठाची मिठास राही,
सावधता अन् श्रद्धा, आशा. २०
'विलायतेमधिं असतां आम्ही'
    गायचेंच हें ध्रुवपद मधुनी,
    हसायचा परि सभेंत न कुणी
    सूक्ष्म निरीक्षण येतां दिसुनी
आणि अस्खलितपणीं न खामी. २१
घरीं अमूल्यच तो ग्रन्थाशय,
    स्पेन्सर, मोर्ले, लठ्ठ पुस्तकें,
    लेख, चरित्रें, क्वचित् नाटकें,
    परि न त्यांतलें एक फाटकें,
नीटनीटके फार महाशय. २२
न रुचायाचें काव्यरसायन;
    वस्तुस्थितिचीं ज्यांत न गमकें
    अशीं जुळविणें सताल यमकें
    श्रेयस्कर त्याहुन हे चरके,

---

१९ नाशनिष्ठ. नेमस्त म्हणजे मवाळ. हा जितका देशद्रोही तितकाच नॅ लिस्ट ह्मणजे टवाळ हा नाशनिष्ठ समजावयाचा. नेमस्त म्हणजे नियमाला सरणारा. २१ खामी=कच्चेपणा, उणीव, दोष.

देई·अंडके तरि सूत्रायण. २३
शौक बुकांचा परी न अवसर,
अशिलांची वर्दीवर वर्दी,
कामाचीही अलोट गर्दी,
कायद्यांत हे पक्के दर्दी,
अमदानीला कोठून ओसर ? २४
पथ्य राहणी शिष्ट ठराविक,
भोजन साधें साजुक नाजुक;
नेमस्तपणामधें सदा सुख,
घरीं 'डबल्टी' नव्हतें ठाउक
—तरका गुपचुप, वुजतिल भात्रिक. २५
कळपांत न कुणि खाई रन्जक
नित्रडक रत्नें जेव्हां जमती,
कांटे चमके जंव चमचमती;
उधळी मुक्ताफळें शीघ्रमति;
अनश्लील ती भाषा, व्यन्जक ! २६
कवीश तो जो ध्वनिचा जनिता,
गुह्यध्वनिविण बोल न रोचे,
वदतां त्रिद्वद्वर्य न खोंचे
वाक्स्वातन्त्र्यच तें सङ्कोचे
कळपांत नको म्हणून वनिता. २७

---

२३ सूत्रायण=सुताची कथा, गुण्डी. २५डबल् टी.– उल्लेखितांना लाज वाटूं नये म्हणून सागुती व कवट यास डबल् टी ('मटन्') व डबल जी ('एग्') हीं साङ्केतिक नांवें आहेत. पत्नी या शब्दाची सुद्धा लाज वाटून 'वाइफ्' हा शब्द रूढ होऊं पहात आहेच. २६ रन्जक खाणें=कान्यावरील दारू जळून जाऊन (तोफ) न सुटणें. २७ कळप हा शब्द इङ्ग्रजी 'क्लब' पासूनच निघाला असेल काय ? थोडेंसें ध्वनि-साम्य असलें, आणि ओढून ताणून अर्थसाम्य दाखवितां आलें तर भाषान्तरें, अर्था-

रावबहादुर हे लोकप्रिय,
नसती केवळ बोलघेवडे,
–तशीं मिरवती बहुत भेकडें;
कण्ठीरव ! बल कण्ठि तेवढें–
सुधारणा पण यांची सक्रिय. २८
मिळे म्हणूनच यांना आदर.
पहिली पत्नी जुनी पुराणी
मरतां अपुल्या बहादुरांनीं
सुन्दर विधवा केली राणी,
गाय काढिली पङ्कांतुन वर. २९
("म्हणजे ? रुतलेली का पङ्कीं ?")
छे हो ! भाषा बोलायाची
सूक्ष्मपणें का तोलायाची ?
("भीति वाटते नव ध्येयांची.
अतिस्नेह हा पापच शङ्की ?") ३०
लग्न कां पुन्हा ? काय करावें ?
एक रथाचें चाक मोडलें
जाणें का कुणि म्हणुन सोडलें ?
चाक पाहिजे नवें जोडलें;
वनितेविण का वनीं मरावें ? ३१

न्तरें व रूपान्तरें यांची नोन्द ठेवणाऱ्या किचकट ऐतिहासिक पद्धतीची चिकित्सा व्युत्पत्तिशास्त्रांत कशाला ? कल्पकतेला ऐतिहासिक छाननीचा पायबन्द कशाला ? २८ कण्ठीरव=सिंह. २९ सुन्दर विधवा.– लग्नपूर्व परिचयाच्या अभावीं मानसिक सौन्दर्याची जाणीव होणें अशक्य असल्यानें बाह्य सौन्दर्याला फाजील महत्त्व आल्यास नवल नाही. लग्नांत स्वार्थ नसतो असें आहेच कुठें ? लग्नें काही परोपकारासाठीं होत नसतात. रूढि मोडून विधवेशी विवाह करण्यांत दिसून येणारें नीतिधैर्य पत्नीच्या सौन्दर्यामुळें का कमी महत्त्वाचें व्हावें ?

लग्नच का ? कुणि ठेवी दूषण.
कान्ताराची कोण पहाणी
करील, देइल समयीं पाणी?
कान्ता सुखसोयींची खाणी,
अभिमानास्पद समाज-भूषण ! ३२
पत्नी ढालच जणुं अब्रूची;
गृहदेवीच्या कृपाप्रसादें
अर्थचतुष्टय घरांत लाधे;
बाहेरिल विष गुप्त न बाधे
आणि फजीती हो गव्हरूंची, ३३
निन्देचा जे शोधिति मोका.
'प्रेम असावें जुनेंच जडलें,
लग्न कदाचित् भागच पडलें,'
श्वान भुङ्कले जरि चहुकडले
तरी बव्यांस न पोंचे धोका ३४
निषेध परि पोंचला नभाला;
न भय, न लज्जा वाटे चित्ता,
समाजोन्नतींची नच चिन्ता;
स्वतन्त्रतेचा गिरवी कित्ता
पडतो त्यावर तुटून माला; ३५
श्रीकवचावर परि बोथाटे.
कीं वर्णोत्तम सुवर्ण निर्मळ
समन्त्र पडतां त्याच्यावर जळ
घाली आत्माराम जवें गळ,
होती गारिवांचे बोसाटे. ३६

३३ अर्थचतुष्टय. धर्म, अर्थ, काम व मोक्ष मिळून पुरुषार्थ होतो. स्त्रीचा स्वतन्त्र असा अर्थच नाही काय ? 'न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति'. ३६ श्रीकवच, श्रीमन्तीचें चिलखत.

असावयाचें ऐसेंच पुणें !
अप्रामाणिक कार्मठ्याचें
अधिष्ठान राष्ट्रिय शाठ्याचें;
दयानन्द, हितवादी यांचे
हाल पहा की, काही न उणें. ३७
परी सुधारक तेहि पुणेरी !
विधवा लग्नाचे कैवारी,
राजमान्य धनवन्त पुढारी
आले घेउन अहेर भारी
सुधारणेची ठोकित भेरी. ३८
("भटशाही ती गेली शिव शिव !
बळजोरींचीं तीं सहगमनें,
पतिमुक्तीस्तव तशींच वपनें,
इङ्ग्रजींत या कोठुन खपणें ?
धर्म नव्या संस्कृतींत निर्जिव ! ३९
काय करावें ? गेली सत्ता.
भगवा झेण्डा पडला खालीं,
शास्त्रार्थाची होय टवाळी,
धर्माला कुणि नुरला वाली
सुधारकांना धाया लत्ता.") ४०

---

३७ 'शठम्प्रति शाठ्यम्' याला गीतेंतही आधार आहेच, 'ये यथा माम् प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्'. परन्तु प्रतिपक्षास शठ ठरविणारा न्यायाधीश कोण तर खुद्द वादीच ना ? लोकहितवादींच्या दूरदर्शी मतांची खरी योग्यता टवाळकीला सोकावलेल्या महाराष्ट्राला अजून व्हावयाची आहे; पण पुढें होईलच. दयानन्द सरस्वतीच्या कार्याचे पवाडे पुण्यांत आपल्या सम्प्रदायांतील राष्ट्रीय पक्षानें गाइलेले पाहून विनोदप्रिय (टवाळ ?) विष्णुशास्त्रयांच्या आत्म्यास काय वाटत असेल बरें ?

## अध्याय २ रा

# रावबहादुरीण

पत्नी दुसरी सुशील नाजुक,
नांव ठेविलें सुललित विमला,
मुलें सद्गुणी झालीं तिजला,
जिव गेलेला पोळुन निवला,
पालवलें वठुनीहि पुन्हा सुख. १
कोपऱ्यांत किति विधवा कुढती !
कुटुम्बांत वा कष्टुन झिजती,
गुर्वी-परिचारिकाहि दिसती,
कुणि म्हणती त्या बहुधा अ-सती !
शर्थ असो या लोकांपुढतीं ! २
(" 'करुणा'मूर्ती घ्या जाणुनि या
पदर सावरुन जपुन कडेनें
जाणें, नयनीं पवित्र भेणें,
सहिष्णु वैराग्याचें लेणें,
या पुण्यावर चाले दुनिया. ")३
करुणास्पदता, ही परवशता
मोडुन टाका एकच युक्ती;
घेऊं द्या समतेची भुक्ती-
("-असुन पण्ढरी द्याया मुक्ती ?

२ गुर्वी = शिक्षकीण; परिचारिका = रुग्णालयांतील शुश्रूषा करणारी. ३ "हीच पुण्याई मला चालवीते। आभिनिवेशें जग साक्तें जगातें"(काहीतरी ९५) ४ 'मुक्तानाम परमा गतिः' (भगवद्गीता).

परमा गति ही सन्निध असतां ?" ४
विधवादुक्खा विशेष किम्मत ?
        प्रौढ कुमारी या अविवाहित
        का लग्नाला तयार नाहित"? )
        ["पुत्रापरि त्या ? कळे तयां हित." ]
(" लग्नपूर्व संन्यास असम्मत ! " )५
[" खरें, परि न त्या कन्या आतां
        ती शुभमङ्गल दानक्रीडा
        अपमानास्पद वाटे पीडा;
        स्वयम्निर्णया अडवी व्रीडा,
रूढिभङ्ग हा एक त्राता. "] ६
अखण्ड करिती विमला रोदन ;
        रूढीला उल्लङ्घूं धजली,
        प्रेमाला आलिङ्गुन भजली,
        म्हणून ही गृहलक्ष्मी सजली,
सौभाग्याचें कुणा नको धन ? ७
परि शोधावें कसें कुठें पण ?
        सहज जाहली ओळख त्यांची.
        शमली हुरहुर तिच्या जिवाची
        जी एकान्तीं सन्तत जाची.
दूर पळालें जुनें सुनेपण. ८
विधिपूर्वक ती जडली मैत्री;
        कर्तव्याला वाव मिळाला,
        जीवनांत नव हुरूप आला,
        टवटवली ती वत्सल बाला
विहरे संव्साराच्या क्षेत्रीं. ९

५ 'प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत्'. ६ 'अष्टवर्षा भवेत् कन्या'.

कपाळ मोठें, टपोर लोचन;
पौरन्ध्रिक सौन्दर्य उत्वरलें,
सौभाग्याचें सुख मानवलें,
थवथवलें वपु, विनयें लवलें,
भाषणामधें तोरा, खोंच न. १०
पदर रेशमी लाल चकाके,
पायीं जोडा लाल पुणेरी,
चोळीवर जाकिट चन्देरी,
मारी नथ भूषणीं अखेरी,
मौक्तिककान्ती वदनीं फाके. ११
नटणें व्हावें कां अस्तङ्गत ?
केवळ नटलेली न बाहुली,
जपे घराला दिव्य माउली,
सुखद हिची सर्वांस साउली,
रिझविण्यांत पतिमन पारङ्गत १२
यजमान न जरि कधि उत्कण्ठित.
समाजांत तीं दोघें फिरतां
समाधान अभिमान धन्यता
वाटुनि न ढळे हृदयास्थिरता,
प्रणय पहा लग्नोत्तर कुण्ठित. १३
कधीं बडे कुणि येतां वक्ते,
पतिसङ्गें ती सभेस जाई,
बोल न कळतां सक्त सजा ही !
मण्डपशोभिला न मनाई !
देखाव्यावर सारें धकतें. १४
तिच्या मनाची पुरती खात्री,

१४ धकणें=चालणें, निर्वाह होणें.

स्वतः केवढे विद्वान् गाढे!
काय स्त्रीमति त्यांच्या पाडें ?
आज्ञापालन कोडें वाडें
ही पतिनिष्ठा भवसुखदात्री. १५
पांच बुकांचें कितिसें शिक्षण ?
मावळलें हळुहळू इङ्ग्रजी.
गरिब कामसू अशी फार जी,
तिला वाटती सदा काळजी
घरीं गड्यांचें जरि दुर्भिक्ष न. १६
एकच असले नसले चाकर !
नसावयाचे बहुधा हुकमी,
राबविण्याचे श्रम ते न कमी;
इथें म्हणे जो तो 'उत्सुक मी.'
मिळे पोटभर आर्धी भाकर १७
आणि मिष्ट वच अवक्रगामी ;
शिवाय, त्यांचें दुखणें खुपणें
न हिच्या दृष्टीमधुनी चुकणें,
मुलांप्रमाणें त्यांना जपणें,
कृतज्ञ ते मग सदा लगामीं. १८
अभिजातांचें उदात्त सारें !
भिकारड्यांची दिसते सत्ता
राबवून मारण्यांत लत्ता
उघड कुणाची जशि विद्वत्ता
दुसऱ्यांचे देण्यांत उतारे ! १९
वेळ पुरेना, कुठलें वाचन ?
गोविन्दाग्रज वा केशवसुत

१५ गाढा=थोर. कोडें वाडें=वाडें कोडें=थोर कौतुकानें.

प्रसिद्ध नांवें इज होतीं श्रुत;
कधींमधीं ही वाची अद्भुत
शिवलीलामृत वा रामायण. २०
व्यङ्कटरमणस्तोत्र सकाळीं,
इच्या गळ्यांतच देवपुजा ती,
गन्ध, पुष्प, नैवेद्य नि वाती;
—भोळी, भाविक ही स्त्रीजाती
अनाथ देवांना साम्भाळी. २१
गाईची इज विशेष आवड
जरि दुभत्यास्तव घरांत होती
म्हैस जाफराबादी मोठी;
गाय, किफायतशीर नसो तीं,
हवी घरीं, जरि झाली भाकड. २२
चुलीत टाकी हीच आहुत्या,
आळशास उत्तेजन भारी,
परी न विन्मुख जाय भिकारी,
तोही येई मागिल दारीं.
गमती ऐशा किती साङ्गुं त्या? २३
गळा हिचा बहु सुरेल कोमळ,
कधीं घरगुती करुण कहाणी,
कधीं तुक्याची मधुर विराणी,
कधिं झोपाळ्यावरचीं गाणीं,
सुस्वर ऐकुन लाजे कोयळ. २४
कधीं 'मुद्रिके राम टाकुनी'

---

२१ व्यङ्कटरमणस्तोत्र=देवीदासकृत व्यङ्कटेशस्तोत्र. २४ विराणी=विरहिणी-गीत. कोयळ=कोकिळ. २५मुद्रिके:—'मुद्रिके राम टाकुनी आलिस तूं कशी ?' (एक जुनें पद). 'सुरेख सङ्गम किती' माधवानुजांची कविता.

कधीं 'सखे गे सुरेख सङ्गम,'
शैली म्हणण्याची हृदयङ्गम
जरी न शिकलेली सारीगम;
नलगे आग्रह कराया कुणी. २५
प्रेमळ आग्रह विशेष बाकी
करावयाची ती इतरांना
म्हणत भोजनीं 'घ्याना ! घ्याना'!
रुचिकर बनवी पदार्थ नाना,
सुगरण भारी ही सैंपाकीं. २६
सणासुदीला त्यांत पहा की !
वस्त्र रेशमी अङ्गावरतीं,
होय गोठतोड्यांची भरती,
कर्णफुलांवर भृङ्ग घसरती,
वाटे किञ्चित् रुतती वाकी. २७
साक्षात् कुलदेवी ही गृहिणी !
उषा वसन्तांतील मुखावर,
वात्सल्याचा हृदयीं सागर,
दक्ष चहुकडे ठेवी सावर,
तथापि जात्या भोळी हरिणी. २८
तीन मुलें तीं नक्षत्रोपम :
सवतसुता ती होती **सरला**,
–दुजाभाव परि हृदीं न शिरला–
**अजित** हिचा अन् मागुन **तरला**–
नांवें बङ्गाली ललितोत्तम. २९

श्री ग्रंथ संग्रह
नं. ......
ता. ......

२५ सारीगम हे षड्ज ऋषभ, गान्धार व मध्यम या स्वरांचे सङ्क्षेप आहेत.
२९ बङ्गाली नांवें बङ्गाली नव्हत. टूम माल वङ्गज कादम्बऱ्यांच्या मनोरञ्जनी रूपान्तरांच्या द्वारा बङ्गाल्यांतून आली.

असाहि येई परन्तु अनुभव,
नांव असेना अम्बू, शङ्कर ?!
प्रेम माणसावर जडलें तर
नांवरूप तें हो प्रिय सुन्दर,
प्रेमाचा हा प्रभाव अभिनव. ३४

## अध्याय ३ रा

# सावधान

दिवस सम्पले बाळपणाचें,
दिवस नाचण्याबागडण्याचे,
क्षण रडण्याचे, क्षण हसण्याचे,
भातुकलीमधिं मन रमण्याचे,
खऱ्या सुखाचे ते दिन साचे ! १
सरला झाली गृहीतागमा;
गोरा मांस्सल अटकर बान्धा,
स्वभाव वत्सल सोशिक साधा,
थोडीही 'शृंग'ची न बाधा,
अण्णांच्या भूषवी आश्रमा २
निरोप घेतां असह्य तो क्षण !
अध्ययनाचें पवित्र तें स्थळ
बिलगुन राही जिवास केवळ;
तुटेनाच सम्बन्ध प्रेमळ,
मागें वळती सबाष्प लोचन. ३
साक्ष सविस्तर अबलास्थेची
पाहुनी बुडे मन आल्हादीं,
पहा एक पण खोली साधी,
अण्णा तेथें शिकवित आधीं–

२ गृहीतागमा (G. A.)—प्रो. धोण्डो केशव कर्वे ('अण्णा') यांनीं स्थापिले हिन्दी महिला विद्यापीठाची बी. ए.च्या बरोबरीची पदवी.

मुहूर्तमेढच ती संस्थेची. ४
दूर सिंव्हगड आणि तोरणा,
मुठानदीच्या पाटाखाली
नागमळ्यांची दाटी झाली,
सदैव वस्त्रें हिरवीं ल्यालीं
अशी वनश्री खुले शोभना. ५
किती दाविती गुरु ते कळकळ!
रसज्ञ तार्किक नम्र विनोदी
कुणि शङ्कांतुन तत्त्वें शोधी,
हाय कुणी कवि! कण्ठीं गोडी;
कुणि उद्योगी सदा धावपळ. ६
कोठुन कोठुन येती बाला,
सहजच धागेदोरे जुळती,
विभक्त होतां त्या व्याकुळती,
स्मृति शाळेची चिरमञ्जुळ ती,
स्मरते थोड्यांसच जरि शाळा. ७
अन्धुक भावी स्थितिचीं स्वप्नें,
सारें सुखकर मङ्गल वाटे,
गुलाब दिसती परी न कांटे,
हिरवळींतही लपति सराटे;
पाय टाकितां म्हणून जपणें. ८
घरास आली सरला बाला;
आनन्दीआनन्द जहाला,
हिचा लळा बहु भावण्डांला,
मायपित्यांना विचार आला
की आतां सुटल्यावर शाळा ९

---

१ हे गुरु कोण कोण असावेत बरें?

क्रमप्राप्त तें विवाहबन्धन.
समाजांत त्यावीण न जागा,
परम्परेचा तगे न धागा;
म्हणति, 'चतुर्भुज व्हाया लागा'
संव्सारी जन; सारे अन्ध न. १०
शुभमङ्गल हो क्रमप्राप्त तें !
तांत गळ्याला जरी न लागे,
पोर वाढली तरीहि भागे,
*बहकायाची नच अनुरागें,*
शास्त्र साङ्गती परी आप्त ते, ११
विवाह म्हणजे कन्यामेध न,
आर्यकुमारी होतां उपवर
अविवाहितता न श्रेयस्कर,
करील भलतें कुणि हृत्तस्कर
यद्यपि कन्या परक्याचें धन. १२
घाइ करावी कां पितरांनीं ?
विशिष्ट काळीं असतां जागें
जाहिरात नच द्यावी लागे,
वधूवरांचे जीवितधागे
जुळवायाचे, पण इतरांनीं. १३
आणि मुलींची गृहीत सम्मति !
मुब्लक पैका, रूप जरासें,
मागुन सगळें जमतें खासें—
भय पत्नीसच, होइल हासें,

१२ 'अर्थो हि कन्या परकीय एव'. १३ सुशिक्षित पदवीधर स्त्रीवर 'वर पाहिजे' अशी जाहिरात देवविण्याचा प्रसङ्ग यावा ही गोष्ट अपरिहार्य असली तरी विवाह जुळविण्याच्या प्रचलित समाजपद्धतीस लाञ्छनास्पदच होय.

जगांत बहुधा सुखी दम्पती. १४
(प्रीति-चारुता कां हे बघती ?
 कालपरत्वें प्रीति उपजते,
 त्याचपरी लावण्य सहज तें,
 विवाहास मग मानस धजतें,
सहिष्णु आदर दे सुख जगतीं.) १५
सुख लाभे झिजतां सौहार्दें,
 भाज्य परिस्थिति, भाजक आशा,
 अनन्त शून्यांश्शांत दिलासा,
 अचूक देखा गणित–तमाशा,
भरलीं हीं शून्यांत परार्धें. १६
विवाहपेठच पुणें शहर हें !
 मालाची चहुकडून भरती,
 लहान मोठे सवदे ठरती,
 बाप मुलीचे त्यांतच मरती,
तरुण झुराया नकोत विरहें. १७
[–"आणि सुधारक बाप मुलीचा ?" ]
 ("म्हणजे मुलगी प्रौढ सुशिक्षित,
 बसे तो तिचा पगार लक्षित,
 आणि तिचें स्वातन्त्र्यहि रक्षित,
धर्म तिचा नच अतां चुलीचा. १८
सटवाईला हवा म्हसोबा
 हवी म्हसोबासहि सटवाई,
 थवेहि त्यांचे ठाईं ठाईं
 परी विभक्तच–काय नवाई ?
सुधारणेची होई शोभा.") १९

---

१६ $1 \div 0 = \infty$. 'शून्यांत परार्धें भरलीं' (वाग्वैजयन्ती १००).

ठोसर होते परि चिन्तातुर,
मुल्की अम्मलदार हवा वर,
लष्ठ पगारी सेनाडाक्तर,
किमान एखादा बालिष्टर,–
आले भेटीलाच बहादुर! २०

निदान परदेशीं शिकलेला
उमेद्वार पोशाखी फक्कड,
विलायती ती खर्चिक अक्कड—
["पती गवसणें कां हो अवघड
चारु सुशिक्षित त्या सरलेला ?"] २१

अहो, अशांना भलती किम्मत !
म्हणती, टाका सर्व निवारुन
झालें जें जें यात्रेमधिं ऋण,
असें पाहतां सङ्कट दारुण,
कोणाची नच खचेल हिम्मत ? २२

असावयाचा शिवाय मागें
विलायतेमधिं गोरा गोन्धळ,
सुवर्णपुष्पांची मग ओन्जळ
यात्री लागे म्हणत 'नको छळ' !
नच अनुरागें पण उपरागें. २३

हुण्डयाला जो तो साम्भाळी;
शिक्षण झालें असो स्वदेशीं,
प्रथम परिक्षेमधें अपेशी,
चारु कुमारी न त्या पुरेशी
धन-योग पहा एकच भाळीं. २४

२२ गोरा–गोन्धळ. सांवळ्या गान्धळाचाच विदेशी प्रकार. 'चन्द्रास लागति कळा उपराग येतो' (रघुनाथ पण्डित). उपराग म्हणजे ग्रहण लागल्यावर उपरति येणेंही स्वाभाविक आहे.

'कशास घेतां घातुक हुण्डा ?'
बाप मुलीचा सचिन्त सुचवी,
परी दक्षिणा देउन उजवी;
त्याच मुलाच्या लग्नीं बुजवी,
अर्थात् करुनी गडबडगुण्डा. २५
[-"सहन कां करा जुलूम असला ?
स्वतःस लावी भाव नराधम
म्हणा, तयाचा नको समागम !
करा असहकारिता-पराक्रम !"]
छे ! शिकल्या तरि पोरी अबला ! २६
तरुण विधुर परि एक गवसले,
देशमुखांचें जुनें घराणें,
हिशब चाले रुपये आण,
कर्नाटक देशांत रहाणें,
बारमधें बस्तानहि बसलें. २७
विद्वत्ता तर होती जाडी,
फेलो कॉलेजांतिल डेक्कन,
करीत काही हौशी लेखन;
[-बिज्वर ? पहिलें कार्य ?] खरें, पण
जमीनजुम्ला शेतीवाडी ! २८
करीत पद्यहि वाडें कोडें,
असोल नारळ ओबडधोबड;

२७ बार वकिलीचाही असतो व मद्यप्राशनाचाही असतो. २८ बाकी डेक्कन महाविद्यालयांत तिसऱ्या वर्गाचा उतारूही दैववशात् दक्षिणाधारी होऊं शकतो. २९ असोल नारळ. अन्वयार्थाची सक्तमजूरी करून घामाघूम झाल्यावर नारिकेलपाक म्हणजे कवितेचें खोबर अमृततुल्य वाटल्यास नवल नाही.

बिन्दुस्रावी ते कवि बोजड
तोलित गणमात्रांचें जोखड;
जोडे कीर्ती लिहून थोडें. २९
लिहित लघुकथा-उसन्या साऱ्या !
नांव मूळचें कां द्या वाया ?
रूपान्तरकौशल्य पहा या !
झेण्डा ज्ञानाचा उभवाया,
अवश्य सिन्धूपार भराऱ्या. ३०
मनोरञ्जनीं त्या हृदयङ्गम
विवाहविषयक त्यांच्या गोष्टी,
प्रीति त्यामधें सात्विक मोठी,
–लिखाण पण का हृदयकसोटी ?
कुतुके सरलाचित्तविहङ्गम. ३१
रङ्गराव येऊन पहाया
भाषण थोडें चहाबरोबर–

२९ बिन्दुस्रावी. "अगदी प्राथमिक अवस्थेंत व अल्पस्वल्प रचना करणारे होतकरू कवि, की ज्यांना त्यांच्या रचनेच्या तुटपुञ्जेपणामुळें बिन्दुस्रावी कवि असें नांव देणें अगदीच अस्थानी होणार नाही" (प्रो. श्री. नी. चापेकर, तटस्थाचे विचारतरङ्ग ४०). प्राचीन मराठी कवींच्या रचना-सिन्धूपुढें आधुनिक लिखाण खरोखरच बिन्दुवत् वाटतें ! ३० मराठीतील किती तरी नामाङ्कित लघुकथालेखक वस्तुतः रूपान्तरकारच आहेत. १०–१२ वर्षांमागें कै. कृ. के. गोखले यांनीं विविधज्ञानविस्तार व मनोरञ्जन यांत भाषान्तरित, रूपान्तारित व स्वतन्त्र या विषयावर मोठाच वाद माजविला होता. याच विषयावर अलीकडे जो वाद उपस्थित झाला आहे त्यांत प्रो. वि. स. गोगटे म्हणतात, "प्राचीन अगर प्रचलित वाङ्मयांतून कल्पना घेऊन त्या रङ्गविणें यास जर चोरी ह्मणावयाचें असेल तर जगांतील ९९ टक्के वाङ्मय चोरीवजा आहे असेंच म्हणावें लागेल...प्रतिभा ही काही आकाशांतून उतरत नसते. स्वतन्त्र बुद्धि म्हणजेही एखादी सर्वस्वी संस्कारशून्य अशी दैवी शक्ति नव्हे. रचनेंतही पुष्कळ कौशल्य अगर स्वतन्त्र बुद्धि लागत असते" (विविधवृत्त, ता. १८–१२–१९२७).

विड्या तोडणें, चुळा टाकणें,–
वरपक्षाचा वरचश्मा पण. ३७
घटि झालीची कटुतम झाली !
आईचीं नयनें डबडबलीं,
वृत्ती जनकाची गडबडली,
वरात गर्जत बाहिर पडली,
आणि शून्यता घरांत आली. ३८

---

अर्ध्या घटिकेमधें खरोखर,
कसें कळावें हृदय अगोचर ?
चहाफराळ न गेला वाया ३२
म्हणजे, तो वाङ्निश्चय झाला.
बघायला तर इष्टच तें स्थळ
मनुष्यास तर युक्तीचें बळ,
भविष्य हातीं प्रभुच्या केवळ,
श्रद्धा यास्तव हवी जिवाला. ३३
["– वाव कुठें अनुरञ्जनास तो ? "]
असे वाव, पण तो लग्नोत्तर,
प्रणयविलासच दिसे घरोघर–
भीति पुन्हा झाल्यास अगोदर,
गळ्यास घालायचा फास तो. ३४
शिवाय, आलें जरि न मोडतें,
हमी सुखाची प्रणय न घेई;
वितुष्ट मित्रांमधेंहि येई;
युरोपीय दम्पतींमधेंही
घटस्फोट का उरस्फोड ते ! ३५
इकडे घेती वडिल दक्षता :
करणीवाचुन शर्त न दुसरी,
रुसव्याला पण गोफ तिपदरी,
त्याविण बद्ध न नवरा–नवरी,
हो शुभमङ्गल पडुन अक्षता. ३६
लग्नीं न टिके सुधारणा–पण;
न रुचे जरि एकत्र नहाणं,
घेणें देतां घास उखाणे,

३४ अनुरञ्जन=प्रियाराधन, वल्लभोपासना.

विड्या तोडणें, चुळा टाकणें,-
वरपक्षाचा वरचश्मा पण. ३७
घटि झालीची कटुतम झाली !
आईचीं नयनें डबडबलीं,
वृत्ती जनकाची गडबडली,
वरात गर्जत बाहिर पडली,
आणि शून्यता घरांत आली. ३८

---

## अध्याय ४ था

# सुशीला देवी

[" देशमूख का अपुले नायक ? "]
("– परि ते धीरोदात्तच कोठें
घराण्यामुळें यद्यपि मोठे ?" )
[" नर्मदेतले परन्तु गोटे
होती ना शिव आणि विनायक ? "] १
नायक अमुचा असे सुधारक,
नांव तयाचें वासू राजे,
परिस्थितीला नांव न साजे,
छात्रगणीं हें परन्तु गाजे,
कराल पुढती तुम्हीच पारख. २
कायस्थ प्रभु–न म्हणा परभू !
–(" ब्राह्मणास परि म्हणा काय भट?")
[" कारण अपुलें ठिसूळ मनगट.
खटनट त्याशी व्हावें खटनट,
अन् शम्भूशी व्हावें शम्भू, ३
अन् झब्बूशी व्हावें झब्बू !"]
गुणरूपानें प्रभू बराबर,
कलमशूर तल्वारबहाद्दर,
कां वाटावा कुणा अनादर,

३ खटनट. 'खट्नटाशी व्हावें खटनट' (दासबोध) ४ झब्बू.– पृ.२ वरील तळटी पहा. शम्भु = भोळा साम्ब.

शिवरायी तो, परी न दब्बू. ४
राघोबाचा सखाराम हरि,
        स्वामिनिष्ठ चिटणीस पहा जी
        किंव्हा हिरडसचा प्रभु बाजी,
        खिण्डींत पडे होउन गाजी,
ऐशीं नांवें वन्द्य कितीतरि! ५
पिता वासुचा हुशार होता,
        न्यायमन्दिरीं केली दौलत,
        –खात्याला त्या असते सौलत,
        मदिरा-मदिराक्षीसह लोळत
पडतां काळें दिधला गोता. ६
कलाभिज्ञ तद्वृत्ति मधुर ती,
        स्वताहि सौन्दर्याचा पुतळा,
        कबूल, नव्हता तान्दुळ धुतला,
        परी किती तो थोडा जगला?
अखेर झाली असती उपरति! ७
अकालींच होउन निष्कांचन
        उदार तो शृङ्गारसमाहित
        मेला, गेला कुठें न माहित,

५ सखाराम हरि गुप्ते, अम्बेगांवकर. मानाजी फाकडे, धोण्डी वाघ, गोपाळ गोविन्द पटवर्धन यांच्या तोडीचा धारराव राऊत, स्वामिभक्तीचा पुतळा, राघोबाचा कैपक्षी व बारभाईंचा कट्टा वैरी. याचें चरित्र वाचून अत्यादर व विषाद यांनीं अन्तःकरण द्विधा होतें. हा एका पत्रांत म्हणतो, "निदान जें मागतील तें इङ्ग्रजास देऊं. राहील तीच दौलत करूं; परन्तु नबाबसुद्धा फितुरियांचें (बारभाईंचें) पारपत्य घडे तेच गोष्ट करावी यांत श्रीमन्तही कबूल आहेत." (राजवाडे मइसा १२।८९). ७ उपरति.—पुढील आयुष्यांतील साधुतेमुळेंच कित्येकांच्या पूर्वायुष्यांतील पापराशीवर पाङ्घरूण घालण्यांत आलेलें असतें. ८ शृङ्गार-समाहित=शृङ्गारपरायण.

मृतास मागिल कुठुन हिताऽहित?
मुक्त झालिया मागें काच न! ८
वासू तेव्हा गोजिरवाणा
होता बालक चौ वर्षांचा,
आठव तो मागिल हर्षाचा,
जामिन पुढल्या उत्कर्षाचा,
खेळाडू तितकाच शहाणा. ९
वय न आइचें अधिक विसाहुन,
अजुन कोंवळी मुखीं नव्हाळी
तों येई संन्यास कपाळीं;
श्रेष्ठ खरा, पण काय अकाळीं?
सती हरींच्छा राही साहुन. १०
जीव एकटे येती जाती,
गमे हवा सहवास उशाला
जगती असली जरि पडशाला;
नश्वर सहचर हवा कशाला
जिथें तिथें प्रभु जर साङ्गाती? ११
अनाथास हरि देई आश्रय;
सौभाग्य तिचें हो अस्तङ्गत
तर विद्येची धरून सङ्गत,
ती हो शुश्रूषापारङ्गत
मानी देवी तिज रुग्णालय. १२
कधींच न करी काही अविहित,
शुद्ध राहणी निरलस साधी,
कर्तव्याला तत्पर आधीं,

१० नव्हाळी=नवता, यौवनारम्भाची कान्ति, मृदुता व सफाई. ११ पडशाला=पान्थाचें हङ्गामी विश्रान्तीचें स्थान.

न घे कुणाची किंकत उपाधी
कार्य आणि हरि-भक्ती माहित, १३
आणि कधींतरि बाबा लेले;
वासूचे ते मुख्याध्यापक,
अड्यारीसन्देशश्रावक,
धर्मनिष्ठ अन् बुद्धि व्यापक,
भवसुखास मुकले-विटलेले. १४
मागें जो निज नांवें ठेवी
पुढें भिई तो पाहुन सुन्दर
प्रशान्त हें वैराग्य निरन्तर,
भूतदयेची सरिता मन्थर,
रुग्णालय तिज मानी देवी. १५.
रोगी हो तिजसान्निध बालक
देव जसा अनसूयेपुढतीं;
मिरे-शारदेपरि ही युवती
प्रशुभ्रवसना गौरी सुदती
दुक्खार्तांची वत्सल पालक, १६
रक्तक्रूसज्योति अहो ती !
मरणाची तिज नव्हती भीती,
युद्धक्षेत्रीं काम करी ती,
गङ्गाभागीरथी परी ती
उदासीन पतिविषयीं होती; १७
आणिक होती थोडी निर्घृण.
जरा मुलांचे लाड करावे

१४ अड्यारीसन्देशश्रावक. स्वतन्त्र बुद्धीनें ब्रम्हाविद्येचा अभ्यास करूं इच्छिणारे अनेकदा श्रद्धधान श्रावक म्हणजे केवळ श्रवणभक्ति करणारे होतात. थिऑसॉफिस्टांचे माहेर-माताजींचें घर-मद्रासजवळ अड्यार येथें आहे. १६ राजपत्नी सन्त मिराबाई. १७ रक्तक्रूस. घायाळांची शुश्रूषा करणारी 'रेड्क्रॉस'ही संस्था जगभर पसरलेली आहे.

मानस त्याचें समजुन घ्यावें,
स्निग्ध अभय तें त्यास पटावें,
तिच्यांत नव्हता तो गुण मसृण. १८
कधिं होळी, कधिं रङ्गदिवाळी,
फूलपाखरावाणी नखरा,
नटण्याच्या त्या नवनव्या तऱ्हा,
तऱ्हेदार बुचड्यावर गजरा,
अन्दरकी तर बात निराळी— १९
अशा क्रमाचा तिज तिटकारा.
करड्या शोधक नजरेखालीं,
तिच्या वासुची प्रगती झाली,
आशापूर्तीच्या सुखकालीं
बसला कालाचा फटकारा. २०
ऐकुन वासू झाला मॅट्रिक,
आणि मिळालें विद्यावेतन,
होय सुशीला शान्त अचेतन;
शून्य तत्क्षणीं मातृनिकेतन,
—हाय काळ हा कैसा खाटिक ? २१
वासूवर हा प्रसङ्ग पहिला.
कोमल नेत्रीं फेली वृष्टी,
पुढें तिच्यांतुन पाही दृष्टी
नव आशांनीं सजली सृष्टी
शोकपूर ओसरतां वहिला. २२
धरी पुण्याचा वासू रस्ता,
विद्येची तिथ अफाट पोई

---

१८ मसृण=स्निग्ध, मृदु. १९ तऱ्हेदार, टूमदार 'फॅशनेबल' या अर्थी. २२ वहिला, सत्वर, त्वरेनें; गुजराथी 'वेहला' पहा.

विविध मतांच्या बघुनी सोई
शिधा कुणाला, कुणा रसोई;
संस्कृतिची पण काय अवस्था? २३
जिकडे तिकडे मण्डळ, संस्था–
रुमाल, डगला, शिष्ट उपरणें,
काही पोपटपञ्ची करणें,
बेताबेतानें घर भरणें,
भाव हा पुन्हा–लय लय सस्ता. २४
ज्ञानसुलभता ध्येय जो गणी,
लिही तो टिपा, लठ्ठ पुस्तकें
तोल मोल तें कोण करुं शके?
विद्यार्थिश्रम होती हलके.
कुणी सफेदी-रङ्गरोगणीं, २५
रस्तेबन्दींतच अभिमानी !
परी पसरलें हें विद्यालय
सुचवी का हें विद्येचा लय
जोंवर गुरु हे थोर महाशय
कर्तव्याचे दास इमानी? २६
ज्यांना मोहीना नश्वर धन,
आवड म्हणुनी जे अध्यापक
झाले ठेवुन दृष्टि व्यापक

---

२५ सफेदी इत्यादि.—काही शिक्षणसंस्था म्हणजे संस्थानेंच होऊन बसलीं आहेत. नाना खटपटी करून स्वतःच्या वा पूर्वजांच्या पुण्याईनें पैका मिळविणें व इमारती उभ्या करणें हें काम, शिक्षणसंस्थांच्या स्थितीकडे पाहिलें, तर मानससरोवरांतून विद्यासिन्धु चालू करण्याइतकेंच जवळ जवळ महत्त्वाचें आहे. जो ज्या कामास पात्र असेल तें काम त्यानें करावें; परन्तु जगांत पैका सर्वशक्तिमान् म्हणून विद्येच्या पवित्र क्षेत्रांतही अर्थोत्पादकानें ज्ञानदानाचें पवित्र कार्य करणाऱ्यास कमी लेखून त्यावर अरेरावी गाजविणें अनर्थावह होय.

रुचे न ज्यांना बाह्य झकापक
ऐसे **रॅङ्ग्लर** अन् **पटवर्धन**, २७
नच बहुवेषी वा कलिकारक !
मूर्ति भव्य, सम उञ्ची जाडी,
दोघांचे आवाज पहाडी,
सारखीच वर्गात धडाडी,
दोघे नास्तिक आणि सुधारक. २८
मात्र सुधारक नच पोशाखी !
परिटघडीचें ध्यान शिष्ट तें,
मत्स्य, सनातन भक्ष्य इष्ट तें,
आततायिपण हृदीं तिष्टतें,
वदनीं हस्तीदन्ती झाकी, २९
बढतीसाठीं नृपप्रशस्ती,
वरतीं गोरे पाय चुरावे,
खालीं धारेवरी धरावें,
गोरवचन तें प्रमाण ध्यावें,
नच नेमस्ती ही ! ही मस्ती ! ३०
शिवाय, असती नास्तिक कच्चे,
'अन्य कोण मज परि ?' हा तोरा
न टिके पडतां सौख्यमनोरा,

---

२८ Wrangler = भाण्डकुदळ; केम्ब्रीज येथील गणिताच्या परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण होणारा. डॉ. र. पु. परांजपे हे पहिल्या वर्गात पहिले आल्यानें सीनीयर रॅङ्ग्लर झाले. बहुवेषी,–पोशाखाच्या बाबतींत प्रो. वासुदेवराव पटवर्धन कसे कट्टर उपयुक्ततावादी होते त्याचें वर्णन करण्याची जरूरी नाही. २९ ज्याप्रमाणें सारेच राष्ट्रीय ऐहिक बढतीची आशा नसल्यामुळें लोकमान्यतेसाठीच जहाल झालेले नसतात; त्याचप्रमाणें सारेच सुधारक वा नेमस्त जिव्हालौल्यासाठी वा नवी प्रतिष्ठित टूम म्हणून वा श्रीयुत राजमान्यतेसाठी उदारमतवाद्यांच्या कळपांत शिरलेले नसतात. ३१ अन्य कोण–'कोन्योऽस्ति सदृशो मया' (भगवद्गीता).

नवस पुढें मग गण्डादोरा;–
हे दोघे पण पक्के सच्चे. ३१
वरिष्ठ, कर्ता, परी न नखरा
सुल्तानीची हाव न पोटीं,
आत्मश्लाघा क्वचितच ओठीं,
कृष्णनीति कलिवन्द्य नको ती,
न पशुपाल; हा शिशु-पाल खरा! ३२
(" कृष्णच परि तो त्यास निवारी
येतां भक्तांवर किटाळ तें,
धरि गोवर्धन छत्र बाळ तें,
काय करिल मन मृदु मवाळ तें ? ")
दण्डक-शिस्तींचे कैवारी ३३
उदार नामाङ्कित **परान्जपे**,
पुरेच वर्णन जरि हृदयङ्गम.
**पटवर्धन** परि विरोधसङ्गम,
काव्यगुणाचा जिवन्त उद्गम,
वार्द्धक्यीं जो शैशवा जपे. ३४
भावबळें ज्वालामुखि पर्वत,
परी शिरावर बर्फाचा थर,
अरुण कान्ति त्या भव्य मुखावर,
हृदय कसें तें ? प्रसून, पत्थर!
आणि गिरा ? मधुधारा, कर्वत! ३५
जीवन तर 'सारेंच विलक्षण!'

---

३२ पशु-पाल—'प्रिन्सिपाल, शिशुपाल की पशुपाल' (टिळकांचे राजकीय लेख ३।४६६). ३३ दण्डक–शिस्त='लॉ अॅण्ड्‍ ऑर्डर'. ३४ 'वार्धक्यीं निज शैशवास जपणें बाणा कवींचा असे' (केशवसुत). ३६ 'सारेंच विलक्षण!' ही कादम्बरी सम्पादकाच्या मागणीप्रमाणें हप्त्याहप्त्यानें लिहिली जाउन क्रमशः मासिक मनोरञ्जनांत

आतिथ्याचा ठळक न सद्गुण,
परि न घेतलें पैचेंही ऋण
प्रसङ्ग आला कसाहि दारुण.
दृष्टि दूरवर, फार विचक्षण. ३६
म्हणायचे परि 'व्हा हो वेडे !
का होतां बाजार शहाणे ?
घ्या वर सत्राणें उड्डाणें' !
देत यापरी आवेशानें
स्वर्णमालिनीवसन्तवेढे ! ३७
लेखन लहरीवर अवलम्बित,
काहि म्हणो कुणि, त्यास अडविणें,
खिण्डारीं एल्गार चढविणें,
निशाण सत्याचेंच उभविणें,
लोक बघुन हें होत स्तम्भित. ३८
भावगीत घ्या किंवा नाटक,

प्रसिद्ध होत होती. परन्तु काही श्रीमन्त व प्रतिष्ठित म्हणून मासिककाराला वन्द्य अशा व्यक्तींची तींत गर्भित निन्दा होत आहे अशा भीतीनें मागणी थाम्बून ती कादम्बरी बन्द पडली. 'निदान पुरी तरी करून कां ठेवीत नाहीं?' असा एकदा प्रश्न विचारला असतां वासुदेवरावांनीं 'खोचदार' स्मित करून उलट सवाल टाकला, 'कादम्बरीचें नांव काय? 'सारेंच विलक्षण!' झालें तर!' ३७ 'थोडेसे वेडे व्हा वेडे!' (प्रो. पटवर्धनांचा लेख, मनोरञ्जन, जुलै १९१४; फुलांचा ताटवा, ४२). सत्राणें=जोरानें. "सत्राणें उड्डाणें हुङ्कार वदनीं" (रामदास). 'वसन्त' हें पटवर्धनांचें कवितेंतील टोपण नांव. सुवर्णमालिनीवसन्त ही एक मात्रा आहे. ३८ एल्गार=हल्ला. सत्याचेंच निशाण.– वन्दनीय विभूतींच्या चरित्रांतही सत्य या विभूतीला कमीपणा आणणारें अतएव अप्रिय असलें तरी अधिक वन्दनीय व अनुपेक्षणीय आहे. या आग्रहामुळेंच गोपाळ कृष्ण गोखले यांच्या दुसऱ्या लग्नाच्या हकीगतीविषयीं त्यांच्या बन्धूंनीं केलेला खुलासा पटवर्धनांनीं ग्राह्य मानला नाहीं आणि गोखले यांचें विस्तृत चरित्र लिहिण्याची कामगिरी मनोरञ्जनानें पटवर्धनांस साङ्गितली होती, ती विनन्ति मग रद्द करण्यांत आली.

तरुणापेक्षां तरुण होउनी
नोकझोक अभिनयें दावुनी
प्रसङ्ग देती थेट वठवुनी,
खोडसाळ मग गमतीची टक, ३९
आणिक पुनरुक्तीचा मारा.
कुणाकुणाची उडून गाळण
हसती वर्गामधिं सारेजण
घोष टिके पण तो दोन क्षण,
विद्यार्थ्यांवर फार दरारा. ४०
व्यक्ति खरी ती ! अन् ती विरळा
जी नव रुजवी हृदयीं सृष्टी !
नाहीतर मग रस्तोरस्तीं
पखाल घेऊन असतां भिस्ती
बसवायाला घडिभर धुरळा. ४१
खऱ्या गुरूंचा परी अनुग्रह
घ्याया वासू पुण्यास आला.
मर्यादा नहि तत्क्षितिजाला;
भव परि सुखदुक्खाचा काला,
उच्चीचे नच सदाकदा ग्रह. ४१

---

४१ विद्यार्थ्यांच्या मनोविकासावर व चारित्र्यावर ज्यांच्या शिक्षणपद्धतीचा, विद्वत्तेचा व चारित्र्याचा उच्च संस्कार होतो असे ज्ञानपिपासु आचार्य किती निघतील ?

# अध्याय ५ वा

## महाविद्यालय

काळ छडीचा छम छम आज न,
न बुजायाची तिची आठवण.
कोण म्हणे तें रम्य बाळपण?
अतां रम्यतम खरा काळ पण,
पोर बने जव शिष्ट सभाजन. १
आणि सुख न हें मानिव लटकें.
जातां दडपण निघुन मनाचें
बेफिकिरीचें स्वैरपणाचें
नसानसांतुन वारें नाचे
हृदयीं बसतां मधु मधु चटके. २
छात्रनिवासीं और मजा ती,
अभ्यासाची टङ्गळमङ्गळ!
सुग्रासाची पालट—चङ्गळ,
भूक वाढवी विवाद तुम्बळ.
दिन गमतीचे भुरकन जाती. ३
कुणी वाजवित बैसे अल्गुज,
न्हाणींत कुणी लकेर मारी,

---

१ 'छडी लागे छमछम। विद्या येई घम घम' (जुना आहणा). 'रम्य तें बालपण देइ देवा' (श्री.कृ.कोल्हटकर). ३ पालट='चेन्ज', छात्रभोजनालयांतील रुचिपालट म्हणून होणारी मेजवानी. पालटी दोन होतात—हलकी व जड. जड पालटींत भारी खर्चाचें पक्वान्न असतें; आणि ती सदस्यांतील बहुमतानेंच ठरते.

टेनिसची कुणि करी तयारी
वर्ग बुडवुनीं ऐन दुपारीं.
वृक्षतळीं सायन्तन कुजबुज; ४
सान कालवा नागमोड तो,
वरी दुतर्फा शीतळ छाया
कडेकडेनें तिथें फिराया
एकान्त मिळे, जाय न वाया,
पुलाजवळ हृद्योग गोड तो. ५
जवळ टेकडी पसरे धूसर,
पश्चिमवारा ये सुखदायी,
मोकावरुनी ठायीं ठायीं
बसती दृश्यांचे अनुयायी,
पुणें पसरलें दिसे दूरवर. ६
नदीजलाच्या प्रसरापाशीं
येरवड्याचा गिड्डा डोङ्गर,
वर जणुं मुक्तामन्दिर सुन्दर,
चान्दमुगुट वा भिल्लशिरावर–
'पर्णकुटी', पण इन्द्रविलासी ! ७
दौड करी कुणि वाडें कोडें;
माण्डचोळणा, सद्रा खाकी,
घामाचे वर डाग पहा की,
तालावर तो धापा टाकी,
बजरङ्ग असे परन्तु थोडे. ८
पहायचे कुणि चलत् चित्रपट;

---

६ मोक=डोंगराचें गण्डस्थळ. ७ पर्णकुटी, कै. शेठ विठ्ठलदास दामोदरदास ठाकरसी यांचें येरंडेश्वराजवळील भव्य निवासस्थान.

पाश्चात्यनटी 'मुक्ता ढवळे',
रसिक सु–वरगण तिजवर हुरळे,
पाठविती अभिनन्दन उधळे,
सही–छबी मिळवाया खटपट. ९

रङ्गभूमिचा 'राजहंव्स' तो,
उचलति रमणी ज्याचा नखरा,
पोशाखाच्या माशूक तऱ्हा;
गाय साभिनय असा न दुसरा;
झरे प्रीतिचा सकरुण रस तो. १०

लबाड लाडिक डोळे हसती,
कुन्दकळ्यांची नाजुक वेणी
ऐशी अधरीं दन्तश्रेणी,
मानलचक ती तर जिवघेणी,
भोळीं खुळीं रङ्गांत गवसती. ११

यास नको का द्याया आश्रय ?
ललित कलांचा विकास कैसा
होइल गाडुन टाकुन पैसा ?
निधिवर नागापरी न बैसा,
अर्थशास्त्र हें म्हणे, 'करा व्यय.' १२

९ मुक्ता ढवळे=पर्ल व्हाइट या विशेषनामाचें मराठीकरण शुद्धीकरणाभिनिवेशीस रुचेल अशी आशा आहे. या नटीचें एक डुकर फार लाडकें असे, त्यामुळें 'डुकरापुढें मुक्ता' या ह्मणीचा अर्थ विपर्यस्त होऊं पहात आहे. या चित्रपटनटींचें महत्त्व त्यांच्या वेतनाप्रमाणें त्यांच्या पत्रव्यवहार करणाऱ्या चाहत्यांच्या सङ्ख्येवरही अवलम्बून असतें. १० राजहंव्स=प्यारा पञ्छी; प्रिय पात्र. "कर राजहंस पाखरा छातिचा कोट' (प्रभाकर.) ११ भोळिंखुळीं गवसति जीं धनिक वणिक बाळें' (सं. संशयकल्लोळ). १२ करा व्यय.– हिन्दुस्थानांत सोन्याच्या पतीवर अर्थोत्पादक धन्दा करण्यापेक्षां दागिन्यांत वा भूमींत द्रव्य अव्यय ठेवण्याकडे लोकांची वेडगळ प्रवृत्ति आहे अशी अर्थशास्त्रज्ञांची ओरड आहे.

बेपर्वाई तितकी खात्री;
    जवळ परीक्षा येतां कामीं
    येई घोकम्पट्टी नामी,
    उसन्त पळहि न त्या हङ्गामीं,
चहा चहाची मग अपरात्रीं. १६
पहा उलटतां मध्यनिशा ती,
    दिसे तमाचा अथाङ्ग सागर,
    छात्रालय जणुं जहाज त्यावर
    प्रकाशमाला विलसे सुन्दर,
श्वासहि जणुं अवरोधी शान्ती. १४
आणि एरव्ही वाटे कैका,
    क्रीडेचा पोशाख करूनी
    जावें आयुध करीं धरूनी
    पायचाकिवर ताठ बसूनी
मिळे आयता मासिक पैका. १५
तरि कुणि जाती थकवुन बाक्या
    हवेवरी देऊन हवाला,
    आणि तळतळे घेणेवाला
    निन्दित विचेला, दैवाला;
शिष्टांचा हा खर्चिक खाक्या. १६
वासूंत न परि ही शिष्टाई.
    पोटापुरतें विद्यावेतन
    बसे त्यांत चैनीचा बेत न,
    भरीस घरभाडें वा शेत न;
नसे शिकवणीचीहि कमाई, १७

---

१६ खाक्या = बाणा.

होतकरू पण होता वास्तू;
ललितकलांची आवड मोठी,
उत्कर्षाची इच्छा पोटीं.
—हाय परी स्वातन्त्र्य सचोटी!
प्रेमळ तितका प्रेमपिपासू. १८
आईविषयीं असीम आदर,
पोटाग तिची गुप्त परी ती
बाह्य वर्तनीं कठोर रीती
सदा उपजवी पवित्र भीती,
खुल्या प्रीतिचा परी न पाझर. १९
अठराची ती उमर सुमारें,
दिसे अङ्गलट ही शेलाटी
वेताची जणुं लवचिक काठी;
भव्य कपाळीं कधीं न आठी.
टपोर डोळे सतेज घारे. २०
ठळक सरळ हें नाक जसें वच.
मुखचर्येवर कोमल राजस
स्वाभिमान सुप्रसन्न सालस
जरा हूडपण जिगीषु साहस
कृष्ण कुटिल परि एकच–ते कच ! २१
पोशाख सुती, साधा बाणा,
धोतर नेसुन मारी काचा.
धोतरावरी स्वतः धुण्याचा
रङ्ग मोतिया विलसे साचा,
पायीं कोल्हापुरी वहाणा. २२

१९पोटाग=पोटांतील आग, ममता (विशेषतः आईची). २० शेलाटा=सडपातळ.

*कींव तयाची अजब खरोखर,*
*केविलवाणा कुणी विक्रयी*
दिसतां हा कळवळून हृदयीं
घेई काहीतरि त्या समयीं,
जरि न वस्तु उपयुक्त मनोहर. २३
भिकाऱ्यास परि न दे दुगाणी,
लागे उचलूं ओझें दुर्धर,
उचली रस्त्यामधला पत्थर;
भूतदयेचा त्याचा निर्झर
कसा स्वच्छ त्या स्फटिकावाणी, २४
कुठें झुळझुळे, कुठें खळाळे,
उडे, बागडे, लोळे, नाचे
करीं धरुन कर रविकिरणांचे,
घेई चुम्बन पाणफुलांचें,
कुठें लपविती ज्यास लव्हाळे. २५
स्नान वासुचें तें हौदावर;
माहित नव्हता चहा तयाला
("कुलधर्मास्तव 'एकच प्याला'?")
छे छे ! थेम्बहि नव्हता प्याला,
तीर्थरूप ते जरी सुधाकर. २६
पाणशेङ्गही नव्हता भक्षित,–
[ "परन्तु उडवायाला जोखड
आधीं खाउन कुक्कुट बोकड
समर्थ व्हा, अशि न करी ओरड
हिन्दुसभापति दाढीदीक्षित ?"] २७
घातुक थट्टा ! अपुले मुझे

२६ सुधाकर, गडकरीकृत 'एकच प्याला' नाटकांतील मद्यपी नायक.

निदानांत हे वाग्भट सुश्रुत,
कळकळ यांची जिवन्त अद्भुत.
नाहीतर अडणीस अलङ्कृत
करिती देशीं बहु भडभुन्जे. २८
ही वासूची कथा परन्तू;
खाणावळ-भातामधिं कङ्कर,
कच्या पोळीसङ्गें साखर,
डाळ तळीं आमटींत, वरवर
कोथिम्बिरतन्तू का जन्तू? २९
हुतुतू, खोखो, आट्यापाट्या
खेळण्यामधें वासु पटाइत,
पोहण्यामधें फार सराइत,
रुचायच्या नच त्याला कुत्सित
कोट्या वा विषदिग्ध चकाट्या. ३०
अभ्यास करी नियमित थोडा,
न बसे घालुन तो अवडम्बर,
गणितामध्यें पहिला नम्बर,
शम्भरांतुनी घे गुण शम्भर,
वाङ्मयाकडे तसाच ओढा. ३१
वासू मग नाईक गुण्यांचा
होउन जाई बहु आवडता,
त्यांच्यांत न ती विद्वज्जडता,
वेळ न लागे ममता जडतां—
शिक्षणलौकिक उगीच पुण्याचा? ३२
[ "काय वाटलें त्याला पाहुन

२८ वाग्भट, सुश्रुत हे आर्यवैद्यकांतील आचार्य होत.

भगिनी अपुल्या वर्गामाजीं,
अननुभूत त्या मिश्रसमाजीं
फाके नाजुक जंव सुषमा जी"?]
होई तुलना राहुन राहुन. ३३
काव्यजीवि ते विद्यार्थि किती!
असावयाचे बहुधा गेंदी,
ग्रन्थकिडे वा उनाड ऐदी,
रुचे खुशामत वा बेकैदी,
व्यवहाराला ध्येयें विकिती. ३४
[—"दोष कसा सगळ्या वर्गाला?"]
—आणि मुलींचा साधा नखरा,
माधुर्याची ती धीट तऱ्हा,
हौशींचा तो साक्षेप खरा,
नरास नेतिल त्या स्वर्गाला, ३५
असें आपुलें वासूचें मत.
अननुभविक तो हिरवा कच्चा
जरी दिलानें उदार सच्चा
स्वप्नदर्शी नवतीचा बच्चा,
प्रेमासचं तो मानी दैवत. ३६
येत तयाला पोरी साङ्गुन
—प्रेमाविण पण लग्न नावडे,
प्रेम परिचयाविण न सापडे,
समाजास त्याचेंच वावडें.
वधूपित्याची आशा भङ्गुन ३७

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ३६६८

---

३४ बे-कैदी=अनियन्त्रित वर्तन. ३५ साक्षेप=चिकाटीची श्रमशीलता.

३७ स्वप्नदर्शि नवती. अव्यवहार्य सुन्दर कल्पनांना जन्म देणारा आयुष्याचा वसन्त-काल.

गळीं उतरवी काढा बौद्धिक;–
"प्रेम हवें मज, न लगे पैका,
जातीचा मी न धरी हेका,
कुणीहि चाले मजला ऐका,
प्रेम कुणाला कुणास लौकिक." ३८
गरजवन्त नर करी विरोध न,
परि मागें जातींत निखन्दी,
"बाप तसा सुत छन्दी फन्दी,"
मान डोलवित दुसरे नन्दी,
होइल केव्हा खरें प्रबोधन? ३९
जगांत नाही छत्र जयावर,
भाग्याचीही नाही उजरी
समाजांत तो मनुष्य उपरी,
उपेक्षणीय न पुन्हा, बहुपरी
सहजच त्यावर सुटती वाक्शर. ४०

---

३८ "प्रेम कीं लौकिक" (प्रि. भाटे). ४० उजरी = उदय.

अध्याय ६ वा

## वासूचे विचार

वासू वर्गामाजीं स्नातक
मिळवित आला वृत्ति, बक्षिसें;
दोषास्पद तर काही न दिसे,
कुणी हेरिती परि लव पिसें
बिघडवलि जें त्याचें जातक. १
अभिनव वाङ्मय वाचुन मेन्दू
त्याचा म्हणती कुणी बिघडला,
पोंच मागला नच वा पुढला,
कुणी सुचविती विकार जडला
असेल बाधुन कुणि पूर्णेन्दु ! २
बाकी कित्येकदा सड्यावर
आवशीस तो पडून राही,
नजर नभाला खिळून पाही,
जणुं भूमीवर कोणी नाही
तारा त्याला धाया सांवर. ३
कुणाशीच परि ओळख नव्हती;
वर्षांमागुन गेलीं वर्षे,
मूढ न झाला प्रेमस्पर्शें,

१ स्नातक = गुरुकुलाची बी. ए. च्या दर्जाची पदवी. जातक = भवितव्य. २ पूर्णेन्दु = स्त्रीवदन. चन्द्र हा वेड लावतो असें म्हणतात. ३ सडा = डोङ्गरावरील पाठार. आवस = पूर्वरात्र.

आन्दोलित नच हर्षविमर्षें,
परि आशेला, होती नवती, ४
जरी प्रौढताही अभिनव ती.
शेजाऱ्यांचीं गोरीं भुरकीं
बाळें, सुमनें मुग्ध मधुर की !
खेळत याशी जेशीं उदकीं.
यास न माहित तथापि युवती. ५
मिशाबरोबर मतें उगवती,
कोण म्हणालें असें ? ["गडकरी ?"]
("मतें वासुची बघूं झोडकरी.")
विचार यद्यपि न तो धड करी
श्रद्धा होती दृढ अभिनव ती. ६
वेळोवेळीं ग्रन्थ वाचले,
प्रतिध्वनि त्यांतील उमटती,
नकळत त्या त्या शब्दीं नटती,
विचार ते नव गर्भ प्रगटती,
झरा न तो, परि उदक सांचलें.
खरे सुधारक जे आगरकर, ७
स्वतन्त्रतासमताकैवारी,
फण्डगुण्ड नच वा पेण्ढारी,
पात्र पहा व्हायास पुढारी,
तत्त्वनिष्ठ निस्वार्थी कट्टर. ८
वासु त्यांचा सच्चा चेला.
वादविवादोत्तेजक मण्डळ,

---

४ हर्ष-विमर्ष=सुखदुःख. ८ फण्डगुण्ड. या शब्दाचें जनकत्व, एका काळीं 'फण्डगुण्डांचें काण्डात' काढण्यास सरसावलेले सन्देशकार रा. अच्युत बळवन्त कोल्हटकर यांच्याकडे आहे.

त्यांत करी तो विवाद तुम्बळ,
उडवुन टाकी मोहक खळबळ,
ओजभावना तद्वाचेला. ९
परन्तु जमती सभागृहीं जे
अपेक्षिती ते बहुधा गम्मत,
तात्त्विकचर्चा त्यांस असम्मत,
टवाळकीमधिं जे पारङ्गत,
खमङ्ग ओशट त्यास पाहिजे. १०
परि वासू स्वातन्त्र्यभुकेला
सुल्तानीशी माण्डी दावा,
वदे निषेधुन पुरुषी कावा,
‘स्त्रीपुरुषांमधिं भेद नसावा—’
("भेद विधीनें असतां केला ११
शक्य नसे व्यवहारीं समता !
कुणी कुणाचें असतें अङ्कित,
म्हणुन मिळे गृहसुख अकलङ्कित,")
परी करी वासूला शाङ्कित
कायद्यांतली तीव्र विषमता. १२
सती बटीकच पतिदिमतीला,
हवी कशाला तिजला सत्ता ?
हवी कशाला स्वतन्त्र मत्ता ?
कशास आश्रय मिळता लत्ता ?
सहिष्णुता हा धर्म सतीला. १३
("उगाच कां पण हा बोभाटा ?
पत्नीच्या पापानें अत्रचित
दग्ध पतीचें होई सञ्चित

पत्नीस मिळे परी अयाचित
त्याच्या पुण्यांतीलच वांटा, १४
सतीस म्हणुन न देव पतीविण.
अन्य कशाला प्राणविसावा ?
जन्मोजन्मीं तोच असावा
म्हणुन व्रत, वैकल्य, वसा वा;
स्वातन्त्र्य नसे स्त्रीला धार्जिण ! १५
जरब, पतीची तीच लायकी !
कृतान्त किंवा कान्त यापरी
मोह उपजवी स्त्रीच्या अन्तरिं
स्वराज्य गाजवि तोच तिच्यावरि.
स्त्रीस नावडे पुरुष बायकी.") १६
किति शिक्षा नरहत्येबद्दल ?
फाशी दुस्सह परि पांच क्षण,
काळें पाणी मर्यादित पण,
जन्मठेप परि लग्नीं खितपण,
चुकी पित्याची मुलीस अद्दल ! १७
("परी कायद्याचीही भाषा
कां वापरतां तुम्ही विवाहीं ?
आध्यात्मिक हें मीलन काही
कर्म विपाकानुसार राही.")
["खरी तुझी ही जर मीमांसा १८
पुरूष कां मग करितीं धडपड ?

---

१५ वसा = आपण होऊन अङ्गीकारलेला नेम. 'न स्त्रीस्वातन्त्र्यमर्हति' (मनु) १६ 'कृतान्तो वा कान्तः समजनि न भेदः प्रथमतः' १७ काळें पाणी, याची मर्यादा हल्ली १६ वर्षांची आहे.

असते ना स्वोन्नतिची आशा ?
अतृप्त ना सौख्यपिपासा ?
स्त्रीसच कां हा दैवदिलासा ?
गुलामगिरिची नुसती बडबड ! १९
पुरेच त्या धर्माच्या बाता !
स्वार्थी वैषम्याचा गाथा
निर्लज्जपणें घेती माथा,
खाती मग परक्याच्या लाथा–
काय अशांना करिल विधाता ?" ] २०
जातिभेद जर असे नकोसा,
तर समतेचा घ्या कडु घुटका,
स्वतन्त्रता द्या युवती-युवकां,
एक पिढींतच पहाल सुटका,
शक्त व्हाल द्यायाला ठोसा. २१
वासु म्हणे "मी हिन्दु मराठा !
सोडुन दे मी ज्ञातीला निज,
उपनयनानें कुणीहि हो द्विज,"
वासु होय नव यागीं ऋत्विज
धरुन देशभाषेचा ताठा. २२
हवा चतुर्भुज मराठा गडी;
अवश्य नाङ्गर एक्या हातीं,
दुज्या करीं तल्वार पहा ती,
श्रुतिपोत हवा काळ्या रातीं,
आणिक चौथ्या करीं तागडी; २३
ऐसें मानी पुरुषसूक्त तो.

---

२३ श्रुतिपोत=वेदांतील अनर्घ्य तत्त्वांची मशाल.

धर्मसंस्कृती थोर सनातन,
अन्धश्रद्धा युक्त मनांत न,
इतिहासदृष्टीनें पहा पण,
मार्ग पुढिल, दावील युक्त तो. २४
विचारसरणी तिखट त्या रुचे,
नेमस्तांस न पण हेटाळी
श्रोत्यांची मिळवाया टाळी.
जीभ न ऐसें म्हणुन विटाळी,
" गुरूच की हे नव्हत आमुचे." २५
ह्मणे ब्राह्मणेतरास रोखत

२५ गुरूच की हे नव्हत आमुचे. टिळकांच्या राजकीय लेखांच्या तिसऱ्या खण्डांतील 'हे आमुचे गुरूच नव्हत' ही लेखमाला पहा. त्यांतील लेखांत ते म्हणतात, "फर्ग्युसन कॉलेजांतील एक विद्यार्थी (रा. सावरकर ?) स्वदेशी चळवळी सम्बधानें भरलेल्या विद्यार्थ्यांच्या सभेंत बोलला म्हणून सदर कॉलेजांतील प्रिन्सिपालांनीं त्यास दहा रुपये दण्ड करून सदर शाळेच्या बोर्डिङ्गांतून त्यांस काढून टाकिलें" (३।३५) "डिसिप्लिनच्या (शिस्तीच्या) छत्राखालीं हा जुलूम चाललेला आहे. आणि हा जितका कमी होईल तितका करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे." (३।३७). "विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळींत पडूं न देण्याचा नियम करणें म्हणजे एकप्रकारें राष्ट्राचें नुकसान, राष्ट्राचा घात करणें होय. असें करण्यास जे गुरु सर्कारचे नोकर म्हणून किंव्वा अन्य तऱ्हेनें बान्धले गेल्यामुळें त्यांस सवड देणार नाहींत ते त्यांचे गुरु नव्हेत, शत्रू होत. [३-४३]". परन्तु ही सार्वजनिक गुरूची विद्या गुरूसच पुढें फळली. शिक्षण मुलींसही सक्तीचें असावें या प्रश्नावर पुण्याचें जाहीर मत प्रदर्शित करण्यासाठीं प्रो. भागवत यांच्या अध्यक्षतेखालीं किर्लोस्कर नाटकगृहांत भरलेल्या सभेंत इतरांची अनुकूल प्रतिकूल भाषणें होऊं शकली; परन्तु सार्वजानिक चळवळींत भाग घेऊं इच्छिणाऱ्या (परन्तु बेजबाबदार) विद्यार्थ्यांनींच आरडाओरड करून लोकमान्य टिळकांना बोलूं दिलें नाही. अखेर नामोहरम होऊन त्यांना बरोबर रक्षक घेऊन घरीं जावें लागलें. पटेलबिलाला पाठिम्बा देणारी पहिली सभा उधळून लावल्याचा व बन्दोबस्तांत यशस्वी झालेल्या दुसऱ्या सभेस बुरख्यांतील म्हणुन हेटाळल्याचा नाशनिष्ठांचा आनन्द फार दिवस टिकला नाही ! २६ रोखणें=अडविणें, टाकणें. खरोखर महाराष्ट्राची म्हणून जी थोडी फार सम्पत्ति आहे तींतील, ज्यांची मायभाषा मराठी आहे अशांच्या हातीं किती आहे ही चौकशी फार उद्बोधक होईल.

राव, डाव हा कां उफराटा?
गोड रसाचा सगळा साठा
रिचवी पचवी गैर-मराठा,
तुम्ही चिपाडें बैसा चोखत. २६
ह्मणे, सदा शिर घ्या तळहातीं
वन्य जनांच्या धाडी येती,
संस्कृति नाजुक उधळुन देती,
सुखसोयींचा ताबा घेती,
काळाची हितनीति पहा ती. २७
दीन शान्तिला तो धिक्कारी;
या मुद्याला बरवा मुद्दा,
पण गुद्याला लगवा गुद्दा,
भगव्या झेण्डयाचा हा हुद्दा,
वासू प्रतियोगी सहकारी. २८
अजब करी तो कधीं विधानें;
स्त्रैणपणाचें अपुल्या खापर
फोडीना सर्कारशिरावर,
अजुन बघा बेरड जोरावर—
("शौर्य दाविलें कां कधिं यानें?") २९
हो? ऐका, धरणाशेजारीं
वासु फिराया असतां गेला.
दिसे धटिङ्गण कुणि अल्बेला
सतावतां हिन्दू अबलेला,
आणि जुम्पली मारामारी. ३०

---

२९ जोरावर=बलाढ्य. तेज प्रकृतीवर मूलतः अवलम्बून आहे, सशस्त्रतेवर नाही. ३० अल्बेला=विलासी.

ना. ग्रं. सं. ठाणे

भय न वाटलें चुरेल इस्त्री,
चाचरला नच 'क-क-क-कायदा
विवेक कुठला, काय फायदा?
शक्ति यशाचा देइ वायदा,
पुरे सङ्कटामधिं दिसली स्त्री ३१
अन् गुण्डाला केला लम्बा!
दिसला नन्तर फरासखाना
भरला पत्रांतून रकाना
उठला शहरामधें खकाणा,
शिष्टांना वाटला अचम्बा. ३२
["भले भले स्त्रीदक्षिण खन्दे!
पडतां दृष्टीला दुश्शासन
करितिल जे तद्रक्तप्राशन
त्यांना जनहृदयीं सिंहासन—
खड्गबहादुर, शशिमोहन दे!"] ३३

---

३२ फरासखाना. जुन्या पेशवाईतील फरासखान्यांत हल्ली पुण्याचें शहरपोलीस ठाणें आहे. खकाणा=धुळोरा. खड्गबहादुर सिङ्ग– मॉडर्नरिव्ह्यू एप्रील १९२७, पान ५१६—५१८ पहा. शशिमोहन दे. मॉडर्नरिव्ह्यू जुलै १९२७ पृ० ११८ पहा. या विषयावर रा. यादवराव पाठक यांनीं एक सुन्दर दीर्घ काव्य लिहिलें असून तें अद्यापि अमुद्रित आहे.

## अध्याय ७ था

## रङ्गराव

जुळतां जर लक्ष्मीनारायण
        कटु सत्य पहा कुणि बोलावें ?
        अपेश नाहक माथां घ्यावें ?
        प्रारब्धाचे योग टळावे
अशक्य हें ! व्हा यत्नपरायण. १
हळूहळू मग कळते कुणकुण,
        रङ्गराव तर वैभवशाली
        होते जात्या बावनख्याली,
        सरला पत्रीं लिही खुशाली,
आर्या वर्णिल का पतिदुर्गुण ? २
अवचित आली परत एक दिन;
        न बोलवे तिज गोष्ट तिकडली,
        आईच्या ती पुढ्यांत पडली,
        आणि स्फुन्दस्फुन्दुन रडली.
सरायला जों आला आश्विन, ३
आणि टेकली प्रथम दिवाळी,
        तों प्रणयाचें निघुन दिवाळें
        दुर्दैवाचे पहात चाळे
        विर्णात उकलित चिन्ताजाळें
बसावयाची आली पाळी. ४

लक्ष्मीनारायण = वधूवर.

बदली आईलाच पुढें मग,
"माणुस कसलें ? शुद्ध जनावर !
नाद किती तरि आणि अनावर–"
"घ्यावें स्त्रीनें परि न मनावर,
पुरुष असायाचेच असे बघ." ५
अनु नराची जाय जनांत न;
मिठ्ठापाणी नार टक्याची,
असो हिडिम्बा, रमे घृताची;
परी मिठवणी स्त्री हक्काची !
सहिष्णुता स्त्री-धर्म सनातन ! ६
[ "बसा घरीं वाचित रामायण !" ]
("रम बाहेरच सदा कल्पने,
सौख्य अशक्यच घरीं राहणें,
कोण करी हें सरस जल्पणें ?")
["आङ्ग्ल कवी सौन्दर्यपरायण."] ७
पत्नी गृहिणी, तीस न किम्मत,
त्यांतुन सरला प्राच्य किशोरी,
बाहिर पडण्याची तिज चोरी;
पतिस मान्यता ये सामोरी,
कारण त्याची टवाळ हिम्मत. ८
करा हवें तें, जग सदा भुले,

५ या शेऱ्याचा सम्बध स्वानुभवाशी आहे काय ? ६ "घरचीचें मिठवणी व दारचीचें मिठ्ठापाणी" (संशयकल्लोळ). घृताची, एक अप्सरा. ७ आदर्शभूत अशा रामानें रावणाच्या धरून सीतेची सुटका केल्यावर तिला घरांत घेण्यापूर्वी अग्निदिव्य करण्यास भाग पाडलें आणि पुढें एका क्षुद्र मनुष्याच्या अपरवादास मान्यता देऊन तिला अग्निवासास धाडिलें. त्या रामाचें चरित्र पतिव्रता आर्य स्त्रियांनीं वाचण्याजोगेंच आहे. आङ्ग्लकवि कीट्सची 'कल्पनेचें राज्य' ही कविता पहा. ८ मवाळ हा शब्द नेमस्तांस जितका लागू तितकाच 'टवाळ' हा शब्द

धनिक यशस्वी, तो नर 'उत्तम;'
तटस्थ निजहितपर तो 'मध्यम,'
'कनिष्ट' मूर्खच ! करि पुण्यश्रम,
होई परि खल-करीं बाहुलें ! ९
लोकनियोजित राव सभासद,
होतें स्थानिकशिक्षणमण्डळ
त्यांत मुख्य हे, न व्हावयाचा खळ.
सार्वजनिक बहु करीत चळवळ,
सम्पत्तीचा लव न पुन्हा मद. १०
स्थापित सहकारी पतपेढ्या,
करीत अर्थोत्पादक धन्दे,
कोश भरित सौवर्णमरन्दें,
आणि अटकतां दे.भ.प. खन्दे
निखळायाला त्यांच्या बेड्या ११
समयाला कामास यायचे,
सार्वजनिक जणु दुसरे काका !
मुद्दा काढुन कांही बाका
उडवायाचे धुमधडाका;
पुढें व्हायचें तेंच व्हायचें. १२
कोम्बड्यापरी झुन्जत तुम्बळ,
छिद्रान्वेषी जरी कावळा
आणि अन्तरीं बहुत त्या कळा,

---

१० दे. भ. प. ह. भ. प. प्रमाणें. देशभक्षण-परायण असा याचा अर्थ करूं नये
१२ वासुदेव बळवन्त फडके याच्यावर बण्डखोरीचा खटला सुरू झाला. तेव्ह त्याचें वकीलपत्र घ्यायला कुणी घेईना. न्याय मिळायला कुणालाही मदत झालीच पाहिजे या तत्त्वाप्रमाणें 'सार्वजनिक काकां'नीं त्याचें वकीलपत्र घेण्याचें धाडस केलें

जरी वरूनी वेष बावळा
रुमाल माथां म्हणजे चुम्बळ, १३
तसाच पोकळ तो कासोटा;
परन्तु सैल न ते व्यवहारीं,
जबर पडे फी जशी हुशारी,
मुक्त करुन तीं कुळांस मारी;
प्रवाद हा परि असेल खोटा; १४
कारण, नव्हते कवडीचुम्बक.
खर्चायास न मिळती रुपये
मिळविल्यविना निष्ठुर हृदयें
श्रीला येथें पूर बहुत ये,
वृत्ति तरी वसुधैवकुटुम्बक. १५
दणदणीत ते करीत भाषण,
हो प्रतिपक्षी दीन बिचारा,
मौनावीण न त्यास निवारा,
वक्तृत्वाचा ग्राम्य फवारा,
'शब्दबम्ब' मग म्हणत तयां जन! १६
शब्दहि त्यांचे प्रशस्त पीवर
जशीं दिलेलीं निधीस वचनें;
श्रीमन्तांचीं, मग कां बुडणें?
पदोपदीं त्यांवाचुन नडणें.
हिरहिरीत नोकरशाहीवर, १७
करुन देत पूर्वजस्मृती ती;
हिन्दुनीतिचा करीत गौरव,
आत्मघातकी जे निन्दारव
करित, त्यांस ते दावित रौरव,

बावळा.(दासबोध१३।१।३). १६नि.धि= 'फण्ड'. १७हिराइरणें=हिरिरीनें हल्ला

दोष बघे ती कसली प्रीती? १७
लिहीत टीका येतां लहरी;
    जुन्या कवींचे ते कैवारी,
    नव्या तऱ्हांची त्यांस शिसारी,
    कविशीलावर कटाक्ष भारी,
शिन्तोडे मग उडवित जहरी. १८
भाषान्तरुनी काही वङ्गज
    लेखकवर्गी लाभे महती,
    झब्बूशाही थोर अहह ती!
    लाभे पदवी द्रव्यासह ती,
'लोकपूज्य साहित्यमतज्ञज.' १९
राव वपुःश्रीमान् सुखवस्तू,
    पङ्क्तीस घरीं जमती स्नेही,
    घृतकुल्या मधुकुल्या गेहीं,
    येइ गोलता यांच्या देहीं,
उन्च असूनी बान्धा–अस्तू! २०
भजनें नियमित फार अहो तीं!
    श्राद्धपक्षसणवार न चुकले,
    पिण्डांना कधिं पितर न मुकले;
    पावक कीं प्रभुनाम चिमुकलें,
निशिपापें मग भस्मच होतीं! २१
गुरूवरीही भक्ति इमानी.
    मिळवाया निःश्रेयस-ठेवा,

१७ या न्यायानेंच विष्णु कृष्ण चिपळूणकर हे लोकहितवादींहून अधिक देशभक्त व श्रेष्ठ! १८ या बांबतींत लेलेशास्त्री व अनन्ततनय आणि लेलेशास्त्री व सत्याभिलाषी यांच्यांतील ज्ञानप्रकाशांतील वादाविवाद मोठे मनोरञ्जक आहेत. २० "अजित नाम वदो भलत्या मिसें। सकल पातक भस्म करीतसे". "प्रातःकाले शिवं दृष्ट्वा निशिपापं विनश्यति".

वलीबुवांची करीत सेवा,
["पण हे मुस्लिम, हिन्दु ते! वा !"]
–धर्मभेद गुरुमार्ग न मानी. २२
["माहात्म्य तसें भूरम्भेचें,
धर्मभेद वेश्येस न लागू,
असो ह्मीदा, सान्हा, भागू,
माशुक मैना, आशक राघू !
विवाह तो परि धर्म्य न–छे छे ! "] २३
रावांची परि हिन्दु रखेली
सदाकुमारी कुणि 'मिस्' राधा
करी अद्यानें मोहनबाधा,
गाण्यानन्तर दौलतजादा,
म्हणजे खाशांमधील केली. २४
बडीं बडीं तिथ जमतीं धेण्डें,
न्यायमूर्तिंही ते वाड्गीकर
आणि मामेलदार कवीश्वर
कदम पोलिसांतील हपीसर,
सामाजिक संस्कृतिचे झेण्डे ! २५
("कटिशूलाची अशी व्यथा का ?")
["कोळिणीवरी फिदा पराशर,
पळवी गुरुपत्नीस सुधाकर,
आणि गोकुळीं गिरिधरनागर–"]
("पुराणांतल्या परी कथा कां ? २६

२२वली=साधु. २३राघूमैना हें काव्यसृष्टींतील प्रणयी युग्म असलें तरी वस्तुतः दोन्ही पक्षी भिन्नजातीय आहेत. २३ सदाकुमारी. ज्या पूर्वी अखण्ड सौभाग्यवती असत त्या आतां सदाकुमारी (मिस्) असतात. अदा=गाणारणीचा हावभाव. २६ मत्स्यगन्धेच्या पोटीं व्यास कसा जन्मला ही कथा पहा. २७ अणिमा, महिमा इत्यादि सिद्धि आहेत. दुर्दैवानें हिन्दुस्थानांत खरी खोटी सिद्धि वा पिसाटपणा हें साधुत्वाचें लक्षण समजलें

अवतारी ते! काय करामत!
        अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा,–
        साक्ष दाखवा काहींतरि, मा
        खुशाल ठेवा भिमा वा चिमा!
बना देव, गुरु!–कुठें शहामत?") २७

सिद्धि तपस्येवीण न साधे,
        लोहपिष्ट वा वायु खाउनी
        झिजवी वर्षे किती तनु मुनी
        धावे तेव्हा मेनका कुणी–
राजयोग तो फुकट न लाधे, २८

पुण्य तेवढें कोठें गांठीं?
        प्राप्त सुदैवें अमिरी, ज्वानी;
        सुकुन मरावें कां वैराणीं?
        भोग न घेणें जर अमिरांनीं,
तर का तो फकिरांच्यासाठीं? २९

'मजा लुटा जोबनवाली का!'
        लहर स्वाभाविक ऐशाची
        टन्चाईही नच पैशाची
        घेत काळजी ते देशाची,
मग कां रावावरती टीका? ३०

---

जातें; व देव आणि गुरु यांना सामान्य मर्त्य जनांचे नियम लागूं नसतात. मा=मग.
३० 'जोबनवाली का मजा लुटा' हें एक हिन्दुस्थानी लोकप्रिय(?) पद आहे. एका कॉलेजांत सम्मेलनकालीं अध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यापुढें हें सरस पद्धतीनें गातांना व्यत्यय न होतां गाणाऱ्या विद्यार्थ्यास पदक मिळतें तर त्याच शहरांत एका मुलींच्या महाविद्यालयांत तशाच समारम्भाच्या वेळीं म्हणायच्या पदाला 'राधे कृष्ण बोल' ही पिलू रागांतील भजनाची चाल, गज्जल किंवा लावणी यांच्या सारखी असावी या भ्रामक समजुतीनें आक्षिप्त ठरून तिचा सम्बन्ध चाल लावणाऱ्याच्या शीलाशी जोडण्यांत येतो! भिन्नरुचिर्हि लोकः हेंच खरें. ऐश=सुखविलास.

खासगीमधें घाला हात न.
सार्वजनिक हें चरित्र मोहक,
धनकीर्तीला समान पोषक,
वर्णगुरुच तो जणुं गङ्गोदक,
शास्त्र पहा वा रूढि सनातन. ३१
जग हसणारच, सुखें हसेना?
नाहीं अनुरञ्जनीं चातुरी,
पाकनिपुणता पतीस अपुरी,
कोण सखी मानील अन्तुरी?
प्रिय धूतेहुन वसन्तसेना! ३२
कसाहि पति तो वन्द्य अगोदर,
सोडुन जाणें माहेराला
काय म्हणावें या थेराला?
राग किती येता येराला?
महोदार पति जसा महोदर ३३
पत्नीचा नच मागे ताबा.
धर्माची तर त्याची बाजू
तिकडेच झुके न्यायतराजू,
पत्नीस न ये झुगारतां जूं,
पण पति वैराग्याचा गाभा. ३४
सर्व तऱ्हेची घरांत चङ्गळ :
झालीं असतीं दोन दिसांनीं,
मुलें हळुहळु गोजिरवाणीं;
सुखी मुलांतच सती शहाणी,

३१ "वर्णानाम् ब्राह्मणो गुरुः" ३२ बाहेरख्यालीचें खरें कारण घरीं अनुरञ्जनचातुर्यांचा वा ललितकलाविलासाचा अभाव हें, का ग्राम्य शृङ्गारस्वातन्त्र्याचा अभाव हें? "सखी मानिली अन्तुरी तो एक मूर्ख' (दासबोध) अन्तुरी=पत्नी. धूता हें चारुदत्ताच्या पत्नीचें नांव.

परी सुधारक बुद्धि अमङ्गळ. ३५
("समतास्वातन्त्र्याचा हा भ्रम :
पत्नी म्हणजे या संव्सारीं
तत्पर दासी अन्नावारी ;
हवी त्र्यींमधिं तिची हुशारी–
शुश्रूषा, सैंपाक, समागम. ३६
नारीपूजा समुचित कधिं कधिं"–)
[" नउ नवसांनीं गांठ पडावी,
क्षण एकाङ्गी हौस फिटावी,
कुणी तयाची महती गावी ?
हिन्दु देवतांनीं कोट्यावधि ! " ] ३७
सुवासिनींविण गेह न मण्डित,
त्यांत थोर हें जुनें घराणें,
हिशेब चाले रुपये आणे,
हितैषींस मग भय ओघानें
वंव्शवेल का होइल खण्डित. ३८
वलीबुवावर होती निष्ठा,
ते वदले, 'कर दुसरी शादी,
घरांत त्याविण न आबादी,
सन्ततिचीहि न मग मोतादी,
पत्नी म्हणजे गृहप्रतिष्ठा. ३९
खुलें समाजीं विवाहसत्रच !
क्षेत्र मनोहर पुरुषार्थांचें,
साधन भावी वैराग्याचें,

---

३६ अन्नावारी हें ऑनररी (=सन्मान्य) याचें अपभ्रष्ट रूप आहे असें म्हणतात. ३७ 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' (मनुस्मृति) ३९ शादी=लग्न. आबादी = समृद्धि. मोतादी=कमतरता, उणीव.

आणि निरन्तर शिष्टपणाचें
कलत्र म्हणजे प्रमाणपत्रच ! ४०
वृद्ध कपींची बहु पडतां गळ
रङ्गराव ते तयार झाले
बाप मुलींचे धावत आले,
पुनश्च जमले गुणगुण ताले,
राव बान्धिती मग मुण्डावळ ४१
नव्या नाटकाची ती नान्दी;
होय शपथविधि अग्नीपुढतें,
कोमल बाला, अवजड धुड तें,
विवाहमङ्गलसूत्र दृढ तें
अखण्डसौभाग्यवती (?) बान्धी. ४२
( " हिन्दु गडी स्त्रीबण्डें रगडी !
पुरुषार्थाची करित टवाळी
पाश्चात्य स्त्री हो मतवाली,
हिन्दु वहाण न माथीं आली,
शीर सलामत पचास पगडी !" ) ४३
[" पत्नीचा पण हक्क तुडविला
जाय म्हणुन हें वर्तन पापी–"]
(" शास्त्र काय पण हे आज्ञापी ?
पत्नीला न च हक्क कदापी !
स्वातन्त्र्यानें धर्म बुडविला ! " )

---

४१ महाराष्ट्रांत काही ठिकाणीं मङ्गलसूत्र बान्धण्याचा मान वेश्येकडे असतो.
४२ मतवाली = मस्तवाल किंवा मताधिकार मागणारी.

## अध्याय ८ वा

# हतभागिनी

छाया ठोसरघरीं पसरली;
बघुन सुखाचे तुटले झोले,
पुशीत आई अपुले डोळे
'प्रारब्ध कसें टळेल ?' बोले—
स्वतास अगदी कशी विसरली ? १
झाला ना तद्दैवीं पालट ?
तुटलें मङ्गळसूत्र पुन्हा तें
जुळलें जमलें नवीन नातें,
सफल सुखावह झालेंना तें !
पतिमरणाची हवीच कां अट ? २
( " स्त्रीसच हक्क न परि व्हाया च्युत
पत्नीस न ये होतां अनृण
धर्म, कायदा पडला निर्घृण,
भूतदयेनें नच तो मसृण,
व्यक्ति समष्टीस्तव होवो हुत· ") ३
पावित्र्यतेचा जुलूम सन्तत
स्त्रियांचवरती दिसतो, तो कां ?
("क्षेत्र असे ती ? महिमा मोठा !

४ क्षेत्र. सुप्रजाजननदृष्ट्या स्त्री ही शुद्ध व पवित्र असावी असें शोपेन्हौअर सुद्धा म्हणतो· परन्तु स्त्रीचें हें माहात्म्य लक्ष्यांत घेऊन व तिला कौटुम्बिक व सामाजिक महत्त्व कायदेशीरपणें देण्याला मात्र कुणी प्रवृत्त होत नाही·

पवित्रतेला येतां धोका
जाति होउनी जाई अवनत.") ४
टोसर वदले, "ही न मला जड,
निसर्गकर्मे विसरुन जाइल,
सुखांत खाउन पिऊन राहिल,
भात्रण्डांचें शिक्षण पाहिल,
हिजसाठीं मी ठेविन रगड. ५
विविध चमत्कृतिमयी धरा ही;
करील हौशी ही बागाइत,
बसेल नाना 'माला' वाचित,
लिहीत गोष्टी, यमकें जुळवित,
काव्यबीज यमकांतच राही. ६
फिरावयाला भुण्डा डोङ्गर,
उदात्त तत्वीं लागाया लय
पवित्र तें स्थळ शान्त निरामय,
भवदुक्खाची पळे पहा सय.
घरांत अथवा विणीत लोंकर ७
कार्य करिल तें ललित दिखाऊ;
घरांत आहे वाजा पेटी,
गन्धर्वाच्या फोनो प्लेटी,
आहे सेवासदन कमेटी,
करिल तिच्यावर कार्य टिकाऊ. ८
स्त्रिया चळवळींमधिं न फारशा,
कुणी करावें अबलोद्धारण
सङ्कटकालीं दुक्खनिवारण ?

---

६ वाचनाची हौस वाढल्यामुळें कथात्मक वाङ्मय स्वस्त भावानें पुरविणाऱ्या १ भाण्यापासून माला निघाल्या आहेत. ७ भुण्डा=निर्वृक्ष.

इथें स्त्रियांची चाले दारुण
काय कायदेशीर दुर्दशा ? ९
गभीर काटक रावबहादुर !
सुखमय त्यांचें मर्यादित जग,
विरहाची कधिं माहीत न धग
कशी कळावी त्याना तर मग
मुक्या जिवाची झरणी आतुर ? १०
परि घरच्यांच्या जीवाखातर
तोण्डदेखलें विषण्ण हासें
सरलेच्या मधुवदनीं भासे;
एकान्तींचे दीर्घ निसासे
प्रभु जाणे अन् तिचेंच अन्तर. ११
घेउन नाजुक करीं हजारा
दे झुडपांना जीवनधारा,
फुलवी तत्संव्सारपसारा,
मोहुन जडपद होई वारा,
जीव कोळपे हिचा बिचारा. १२
कार्य करा मग काळजी नुरे
असे साङ्गती स्वस्थ विचारी.
कार्य जाणवे जिवास भारी,
ध्येय-हुरूप न जर संव्सारीं
तमिस्र भंवतीं दिसें वा मुन्हें. १३
प्रफुल्ल होई हृद्राजीव न :
कुठें जिवाचा पतङ्ग दिल्भर

---

१ 'हिन्दु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' हें कृ. के. गोखले यांचें जिव्हाळ्यानें लिहिलेलें पुस्तक अत्यन्त महत्त्वाचें आहे. १३ मुन्हें=धुकें. १४ पतङ्ग=सूर्य. 'विकसति हि पतङ्गस्योदये पुण्डरीकम्' (भवभूति).

पुरुषोत्तम तो अनङ्गसुन्दर !
अनामिकास्तव झुरतें अन्तर
निष्प्रेमच हें वाटे जीवन, १४
किंवा जीवन मधु न जीवितीं.
क्षारोदधिला अथाङ्ग दुस्तर
लाटा उठती फुटती भूवर,
रङ्ग चहुकडे कोन्दे धूसर,
साङ्गाड कोठें प्रेमाची ती? १५
विशिष्ट काही असें प्रेम तें!
भाऊ, तरला, बाबा, आई,
सर्वांची आवडती ताई,
काळ हिचा एकान्तीं जाई;
अतर्क्य असती हृदयनेम ते! १६
विचार एकच चित्तीं घोळे,
संव्साराच्या आटाआटी
सद्य खऱ्या पण कोणासाठीं?
कोण ऐकतो ही हाकाटी?
अबलांवर तो प्रभुहि न वोळे. १७
उत्साहाच्या लहरी येउन
मागुन अधिकच जीव गळावा,
हुरूप अगदीं पार पळावा,
रोग विलक्षण कुणा कळावा?
भस्म कोणतें यावर दे गुण? १८
सौभाग्याचा कलङ्क भाळीं;
शान्त खिन्नता रम्यच बाकी
जणूं स्फटिकवत् स्वच्छ तटाकीं

१७ वोळणें=प्रसन्न होणें.

गगनश्रीप्रतिबिम्ब पहा कीं
कृश शशि यदा सित आभाळीं. १९

किंवा भूषित जरि विनयें ती
दिसे उन्च कृश किञ्चित् मानी
सरूपरी, जो स्थित उद्यानीं,
एक्या पायीं प्रभुच्या ध्यानीं
रङ्ग विविध ज्यावरी न येती. २०

भक्तिशान्ति परि तीस न जोडे,
सन्त तुक्याचे अभङ्ग वाची,
परी शमेना सन्तत जाची
हुरहूर तिच्या भग्न जिवाची;
सुटेनाच हें जीवितकोडें. २१

दुर्बोध किती ते निगमागम !
हवा भवीं या काही टेका,
नवसाला पावे तें देखा,
भजा खेचरासमान शेखा,
इलाज एकच सन्तसमागम; २२

अनुग्रहाविण वृथा प्रतीक्षा.
सन्तचरित्रें परम पवित्रें–
परि ही अबला, मानस मित्रें,
तयार केलें न कुणी मित्रें
शिष्यत्वाची घ्याया दीक्षा २३

२० "माझ्या लावण्याचा सरू' (परशुराम १६८). २ 'या जीवाला जीवितकोडें जन्मान्तरिं तरि सुटेल का?' (श्री. कमलाबाई देशपाण्डे) २२ निगमागम =वेद-शास्त्र. विसोबा खेचर व शेख महम्मद हे दोन्ही सन्त भागवतधर्मसम्प्रदायांत होऊन गेले. नवसाला पावतें त्यास भजावें मग तें स्वाभिमानास पोषक नसलें तरी चालेल, या भावनेनेंच हिन्दु व ब्राम्हणही फकिरी घेतात, उरूस–कन्दुरी करितात व अजमीर येथील शेख मुईनुद्दीन चिश्तीच्या दर्ग्यांत नवस फेडावयाला जातात.

आणि जरि न तिज वाटे हेवा,
शोक उधाणे तिचिया हृदयीं
पडतां दृष्टीं युग्में प्रणयी;
म्हणे निसासुन ती त्या समयीं
आस न का कधिं पुढती देवा? २४
आशा वेडी भोळी असते;
भूवरतीं आधार जों नुरे,
हवेंत बान्धी उन्च गोपुरें,
विवेक यद्यपि म्हणे तो 'पुरे'!
पुनः पुन्हा मन अधिकच फसतें. २५
कुढत यापरी सरला राही;
करुणमूर्ति वासन्तवयाची
दिनानुदिन ती पहावयाची
सवय होय इतरांना साची,
मग वाटेना विशेष काही; २६
आणि काळ तर उदासीन तो,
फुलोत वा करपोत मानसें,
बारावें वा असो बारसें,
सर्प घे गळां पुष्पहारसे
स्थिर गतिवेगें, कधीं न शिणतो. २७
अन् सरलेचें मन हुरहुरतें;
सहानुभूतीचें मधु गुञ्जन
दुर्मिळ तें, परि वरवर अञ्जन;
हृद्रोगाचें न करी भञ्जन
अन् झुरणारें माणुस झुरतें. २८
परि घरिं येतां पहीपाहुणे,
करितां दङ्गा घरांमधिं मुलें

पाहुन त्यांचे खेळ चिमुकले
सरलेची हृत्कलिका उकले,
कुठें न त्यांचें पडूं दे उणें. २९
घाली त्यांना न्हाऊं खाऊं.
खेळांतहि ती सोशिक मोठी
रचून साङ्गे अद्भुत गोष्टी;
अपशब्द न ये कधींच ओठीं,
म्हणायची नच, 'तो बघ बाऊ !' ३०

---

## अध्याय ९ वा

# मेजर गोखले

असे एकदा आले डाक्तर,
त्यांना होतीं दोन चिमुकलीं
मातृसुखाला असून मुकलीं,
पिता असा कीं मुलें न सुकलीं,
हिचा अडकला जिव बाळांवर. १
लबाड तींही हिला चिकटलीं,
दिलीप पहिला, दुसरी सोनी
लळा लावितिल ऐशीं दोन्हीं
सरळ हृदय कां नये भरोनी ?
अननुभूत भावना प्रकटली. २
निष्प्रेम तिचें होतें जीवन,
वात्सल्य परी त्या विधुराचे
ठोके वाढवि इच्या उराचे,
सङ्गीत घुमे नव्या सुरांचें
हृदयीं भरतां नव सञ्जीवन. ३
शस्त्रवैद्य ते लश्करपेशा !
पद्मापरि ते नाजुक तळवे,
मायमनापरि अन्तर हळवें,
कसे खाटिकांमधें मिसळवे ?
नच काळाची निटिलीं रेषा, ४

खेळकर स्मित सदा मुखावर,
तरुण विधुर परि विषाद नाही,
प्रसादासवें खेळत राही,
शान्त विचारी गभीरता ही
हिमाद्रीपरी उच्च स्थावर. ५
धन्य पुरुष हा गोरा गोरा !
आरोग्याची कान्ति गुलाबी,
साहेबी पोशाख रुबाबी,
कार्यपरायण कधि न कुणा भी,
वागण्यामधें परी न तोरा. ६
असत शिकारी धाडशी स्वतः !
मांसाहारी परि न अधार्मिक,
प्रमाण माण्डित सस्मित तात्त्विक,
'सत्त्वापासुन जें तें सात्त्विक,
सत्त्वगुणाला युक्त तत्त्वतः'. ७
वैशाखाचे दिवस रजेचे
जरी उपरणीं–शाल्ल यांचे,
चौघडियांचे अन् सनयांचे,
भुईनळ्यांचे अन् हवयांचे,
रात्रन्दिन ते ऐन मजेचे ! ८
वसन्तांतलीं व्याख्यानें तीं,
कुठले कुठले येती वक्ते,
जेथें पिकतें तिथें न विकतें,
बहुधा नांवावरीच थकतें,
श्रोतृजनांच्या झुण्डी येती ; ९

५ 'स्थावराणाम् हिमालयः' (भगवद्गीता). ७ सत्त्व = जनावर. सात्विक अन्न = 'ॲनिमल फूड्'.

दिनान्त रम्यच वसन्तांतला,
    जवळच लाभे हवा मोकळी,
    एकान्त मिळे असुन मण्डळी,
    उपवक्त्यांची मौज आगळी,
जमाव का हा वृथा थाटला? १०
मित्र पाङ्गले त्या मधुसमयीं
    नाना सम्मेलनांत जमती,
    जुन्या स्मृतींना जिववित रमती,
    होय बहुश्रुत जो मन्दमती,
मिळे मनाला नवीन जिल्हई. ११
सहल सकाळीं रोज दूरवर,
    झोप दुपारीं, वाचन, आळस,
    सन्ध्याकाळीं खेळ निखालस,
    चलत् चित्रपट कधीं निरागस,
गन्धर्वांचें कधीं 'स्वयंवर';—१२
दैनिक ऐसा मधु-कार्यक्रम,
    जुन्या ओळखीचे ते डाक्तर
    स्त्रीदक्षिण, सेवेला तत्पर,
    खुल्या भाषणीं विनोद सादर,
ऐकुन हरती अखिल दिनश्रम. १३
त्यांस आवडे काव्य आधुनिक,
    वाजविण्यामधिं 'फिडल' सफाई,
    स्वभाव माणुसघाणा नाही,

---

१२ खाडिलकरांच्या 'स्वयंवर' या लोकप्रिय नाटकांत रुक्मिणीची भूमिका बालगन्धर्व म्हणजे रा. नारायणराव राजहंस हे घेत असतात. १३ स्त्रीदाक्षिण्य-मण्डळीत. स्त्रियांच्या गरजांकडे व त्यांच्या भावना यत्किञ्चितही न दुखविण्याकडे लक्ष्य देण्याचा शिष्टाचार पाळणारा.

दिनान्त रम्यच वसन्तांतला,
जवळच लाभे हवा मोकळी,
एकान्त मिळे असुन मण्डळी,
उपवक्त्यांची मौज आगळी,
जमाव का हा वृथा थाटला ? १०

मित्र पाङ्गले त्या मधुसमयीं
नाना सम्मेलनांत जमती,
जुन्या स्मृतींना जित्रवित रमती,
होय बहुश्रुत जो मन्दमती,
मिळे मनाला नवीन जिल्हई. ११

सहल सकाळीं रोज दूरवर,
झोप दुपारीं, वाचन, आळस,
सन्ध्याकाळीं खेळ निखालस,
चलत् चित्रपट कधीं निरागस,
गन्धर्वांचें कधीं 'स्वयंवर';—१२

दैनिक ऐसा मधु-कार्यक्रम,
जुन्या ओळखीचे ते डाक्तर
स्त्रीदक्षिण, सेवेला तत्पर,
खुल्या भाषणीं विनोद सादर,
ऐकुन हरती अखिल दिनश्रम. १३

त्यांस आवडे काव्य आधुनिक,
वाजविण्यामधिं 'फिडल' सफाई,
स्वभाव माणुसघाणा नाही,

---

१२ खाडिलकरांच्या 'स्वयंवर' या लोकप्रिय नाटकांत रुक्मिणीची भूमिका बालगन्धर्व म्हणजे रा. नारायणराव राजहंस हे घेत असतात. १३ स्त्रीदाक्षिण-मण्डलीत. स्त्रियांच्या गरजांकडे व त्यांच्या भावना यत्किञ्चितही न दुखाविण्याकडे लक्ष्य देण्याचा शिष्टाचार पाळणारा.

"पुनर्विवाहाविण कां राही ?
अनुकूल श्री, यौवन आणिक ! १४
रामापरि हे असतिल का पण ?"
पुसते झाले नाना खोटे
पुनर्विवाहोत्तेजक मोठे,
घोडशर्यती, शौकी होते--
नये शिरूं गतकालीं आपण ? १५
पहा सुधारक आतां निधडे;
वदले, किञ्चित हासत गालीं
"अहो मुलांना जी साम्भाळी
ती प्रियपात्रच असेल झाली,--
सोय, मौज बन्धनापलिकडे ! १६
परन्तु जाई वय वाया हें ?
सामाजिक कर्तव्य नसे का ?
ध्येयाचा कां भलता हेका ?
प्रेम खरें कधिं तरी मरे का ?
स्मृति नासे का पुनर्विवाहें ?" १७
परन्तु चोरुन पहाच रातीं;
डाक्तर भगवद्गीता पढती,
गूढ चिन्तनामाजीं गढती,
छबी पहा पत्नीची पुढतीं,
एकान्तीं गडबड न करा ती. १८
कस्तूरीच्या उदबत्तीचा,
खोलीमध्यें गन्ध दरवळे,
दीपहि तेव्हां मिणमीण जळे,

१५ घोड-शर्यती.-घोडदौडीच्या शर्यतीचा शौकी.

पुजेस वातावरण आगळें,
भाव कसा निवळे चित्तींचा! १९
ध्येय मूर्त हो इथें आपुलें,
भास असा हो नित सरलेला,
प्रेमास्तव तज्जीव भुकेला,—
("प्रणयमधूचा, 'एकच पेला !
प्रळय होउनी जाय त्यामुळें.") २०
"मी तर डाक्तर, माझें ऐका;
या खेळा माझियाबरोबर,
घरांत बसणें रोग खरोखर,"
जिम्खान्यावर दृश्य मनोहर
बघुन म्हणे कुणि, "अरे असें का ?" २१
अशी जायची परी क्वचित् ती ;
घरांत होती दिलीप, सोनी,
लळा लावितिल ऐशी दोन्ही,
फिरावया त्यांना घेवोनी
जाणें वाटे प्रियतर चित्तीं. २२
तिची धाकटी बहीण माई,
खेळायाची हौस अनावर,
हट्टुन जायची जिम्खान्यावर,
खेळ तिच्याशी खेळत डाक्तर,
खाऊची वर होय कमाई, २३
पोर अजुन ती तरला, अल्लड !
योग्य व्हावया जी गृहदेवी,
वनवास तिच्या येई दैवीं,
सन्थ मरण ही शेळी सेवी,

२४ शेळींचें मांस खरोखरींच वातड असतें.

अन् खाणारा म्हणेल वातड. २४
"मेजर!" त्यांचें नांव गोखले,
"मुलांस ठेउन इथेंच जाना,
पुण्यांत शिक्षणसोयी नाना,
वळणहि घरचें हवें मुलांना,
तुम्ही रहा निश्चिन्त मोकळे," २५
वदल्या विमलाबाई आधीं:
दिलीप पुसतां त्यास, म्हणाला,
"हवी मला ही इथली शाळा,"
सरलेचा सोनीस जिव्हाळा,
मिळुन गुङ्गलीं पोरें नादी. २६
फार दूरवर विचार करुनी,
गेले डाक्तर मुलांस ठेवुन,
विरङ्गुळा सरलेला देउन,
सुनेपणा सङ्गतीस घेउन,
वियोग दुस्सह तो पत्करुनी. २७
सरलाच लिही त्यांस सविस्तर
पत्रें महिन्यांतून दोनदा,
मुलांच्याच त्या गोष्टी बहुधा,
इहलोकीं त्या गोड जणुं सुधा,
धाडित डाक्तर नियमित उत्तर. २८
वाचुन कां तिज व्हावा मोद न?
गमती गमती लिहित मुलांला,
रुचे तिला त्यांतील जिव्हाळा,
दुक्ख चोरटें दे जीवाला,
'सौ० सरलाताई' सम्बोधन. २९
("हरहर शङ्कर! काय भयङ्कर!

सुवासिनीचें मन कां चळलें?
पवित्र पातिव्रत्यच ढळलें!
धर्मतेज शिव शिव! मावळलें!
दुष्ट कुलस्त्री म्हणजे सङ्कर! ३०
दृष्टि फिरे क्षण परपुरुषावर
–व्यवहार नसो, व्यभिचार घडे,
धर्मतत्त्व हें पहा चहुकडे
सुधारकांचे नेत्र न उघडे,
सुधारणेची हाव अनावर! ३१
—"अन् पुरुषाची?"–बातच सोडा;
जातशुद्ध धातूचा पेला,
घासुन चाले देवपुजेला;
पुरुषमानसीं सदा तजेला;
अशुद्ध मडकें, अर्थात् फोडा." ) ३२

---

३० "स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसङ्करः" (भगवद्गीता). ३१ व्यभिचार.— "जो कोणी स्त्रीकडे कामदृष्टीनें पाहतो त्यानें आपल्या अन्तःकरणानें तिच्याशीं व्यभिचार केलाच आहे." [ नैबल–मत्तय ५।२८ ]

अध्याय १० वा

## डाक्तर ॐकार

होते पेशावरास मेजर,
इकडे मानसरोग बळावे,
निदान कैसें कुणा कळावें ?
अखेर सद्‌गुरुपद कवळावें
रोग कशानेंही न शमे जर; १
भवबन्ध जवें जातिल तुटुनी.
हिन्दुस्थानीं पूर्वी, हल्ली
असती पडले गल्लोगल्लीं
स्वामी, बावा, चिल्ली, वल्ली,
परन्तु बुद्धी सुचेल कुठुनी ? २
["साधूंचीं मग असून पथकें,
कां स्वातन्त्र्यज्योति विझाली ?
परकीयांच्या अमलाखालीं,
कां ही अवरत अवनति झाली ?
हीच पहा स्थिति सोळा शतकें" ] ३
(" 'पतनावांचुन नच उत्थापन !'
विकसन विश्वीं थाम्बत नाही,
न हो एकदम दिशांत दाही,
कशास 'बोम्बाबोम्ब' वदा ही,

२ चिल्ली=चाळीस दिवसांचें उपोषण करणारा साधु. ४ "कां मग बोम्बाबोम्ब ?" (टिळकांची कविता १।२८)

विकासवादी आहों आपण ४
आणि पातळीवर आध्यात्मिक,
गूढकार्य ते करीत असतीं,
हिमालयावर ज्यांची वसती,
संव्शयात्म नर अखेर फसती,
ठेवा श्रद्धा ती आत्यन्तिक.") ५
चला पहा ॐकार स्वामी,
न करा कुत्सित परी परीक्षा;
ते न मागती काही भिक्षा,
खुशाल घ्या वा नच घ्या दीक्षा
दर्शनामधें कोठें खामी ? ६
वेड्या चाळ्यावरती भिस्त न;
कुणी भावडा ये भेटाया
तों गुरु देती शिव्याच वाया,
शिष्यमतें तो प्रसाद- घ्या या
ओङ्कारांची ऐशी शिस्त न. ७
कुणी म्हणत की हे धन्वन्तरि
बहुविध संव्साराचे चालक,
देती वन्ध्या स्त्रीला बालक,
कुमारिकांचे होती पालक,
["परी न दावित त्यास पण्ढरी ! ८
मुमुक्षु कळपाचा कीं नेता,
दिसुन निरुद्यम बहु उद्योगी,
श्रीकृष्णापरि विरक्त भोगी,
तो जो पूर्णावतार योगी,

७ वेडेचाळे.—साधूच्या विक्षिप्तणामुळेंच वह्लीचा साधु हा अर्थ जाऊन विक्षिप्त व्यक्ति [illegible]मा अर्थ झाला ८ पण्ढरीच्या माहात्म्यांत कालप्रभावानें वैविध्य आलें आहे.

इतर त्यापरी न ऊर्ध्वरेता."] ९
निन्दक नास्तिक नसती थोडे,
थोर कोण पण होउन गेला
बळी न पडला जो निन्देला ?
निन्दक मागुन होतो चेला,
उडति तुक्यावरही शिन्तोडे. १०
कण्ठीं धरुनी सर्प, हलाहल,
अर्धचन्द्र शिरसाच सेवतो
म्हणून हो शिव महा-देव तो ,
निन्दक निन्दो सुखेनैव तो,
उपजवि निन्दा थोर कुतूहल. ११
'काय, बघूं तरि !' वाटे कौतुक,
दर्शनामधें न जाय चव्वल,
दृष्टिपरीक्षा हवीच अव्वल,
["वेश्यावस्तींमधुनी अम्मळ
फक्त फिराया जैसे उत्सुक !"] १२
जटाजूट ऋषि न धरी माथां
मिशी साफ तो अनुदिन काढी;
राहिल तेव्हा कोठुन दाढी ?
तऱ्हेंत मारी ऋषि आघाडी,
नवयुगीन तो स्वामी आतां. १३
विभागलेले केस मधोमध
वळणदार ते पडत स्कन्धीं
कृष्ण तुळतुळित आणि सुगन्धी,
श्यामगोल मुख तें आनन्दी,

१ ऊर्ध्वरेता.–पुढें ५१ वज्रोलीवरील टीप पहा.

सर्व बोध ज्यांतून जणों मध, १४
म्हणजे भाषण सान्द्र चकाकित.
दिसे नासिका जणुं तम्बोरी,
अथाङ्ग नेत्रें आणि टपोरीं,
मारी किञ्चित् झाक छचोरी,
न वर्तवा त्यावरुनी भाकित; १५
वेष पहा ! चन्दनी खडावा,
कफनी भगवी मऊ रेशमी,
वेषतऱ्हा ही पूज्य नेहमी,
साधुत्वाची खचित घे हमी,
असो हिरा मग काचखडा वा; १६
काषायाम्बर अभेद्य बक्तर.
स्वामी लावित समाधि नेमें,
तत्त्वज्ञानी हिन्दी एम्० ए०
कला-नाथ पाश्चात्य-प्रेमें,
कन्यासंस्था-प्राङ्मुख डाक्तर– १७
म्हणजे ? भम्पक त्रिद्यावेदू !
चोरुन भाषान्तरुन मराठी
स्वतन्त्र हो लेखन कामाठी
विलायती त्या पदवीसाठीं.
विलायती ती, नये निषेधूं. १८
पाणी पिउनी बावन देशीं
हिन्दुस्थानीं परत पातले
–कार्य न सरलें युरोपांतलें –

---

१७ बक्तर=चिलखत. कन्यासंस्थाप्राङ्मुख डॉक्तर=अमेरिकेतील व्हर्जिनिया संस्थानांतील ओरिएण्टलच्या योग्यतेची विद्यापीठांतील शास्त्री ही पदवी मिळविलेला.
१८ भम्पक=पोकळ, दिखाऊ; 'बोगस'.

बघुनी दुष्कृत इथें मातलें,
स्वामी हिन्दुस्थानहितैषी. १९
देव म्हणे, 'घे' जातां मीपण;
निमित्तमात्रच होते शेटी,
देत धाडुनी सर्वेंच भेटी,
आणि दिसे भरलेली पेटी,
चालवि योगक्षेम हरी पण. २०
म्हणायचे हे मांव्सलवधु ऋषि,
"त्रिपुटीस करा सर्वस्वार्पण
कृष्ण मीच, मी राधा गौळण,
प्रेम मीच, मी गुणातीत पण.
भेद न मानी मी स्त्रीपुरुषीं. २१
या, व्हा माझे स्नेही सारे —
शिष्यधर्म तर असिधाराव्रत,
न कुणा साधे कलींत साम्प्रत,
कृष्णार्जुन सम्बन्धच शाश्वत,
मैत्रीचा प्रभु भुका पहा रे! २२
योगेश्वर तो हाकी घोडे!
निजमित्राचे धनञ्जयाचे,
मार्ग दाखवी श्रीविजयाचे,
साह्य यापरी थोर जयाचें,
तो मैत्रीनें अचूक जोडे. २३
पवित्र त्यांच्या मैत्रसमाजीं
जमत सुशिक्षित तरूण-तरुणी
– कोणी कोणी चोरुन घरुनी –

---

२१ त्रिपुटी = ट्रिनिटी (ख्रिस्ती) २३ 'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥' भगवद्गीता.

उच्च हेतु हा की भय तरुनीं,
विलीन व्हावें प्रेमासार्जी. २४
व्यवहाराचें ज्ञान न कोतें,
हेरिति जिकडे तिकडे टक्के,
धनिक वणिक ते सात्विक पक्के,
मुक्तिद्वारीं मारित धक्के,
वकिलासङ्गें तयांत होते. २५
असाच वासू गेला तेथं,
पोर पोरका, न होय सान्त्वन,
**रामतीर्थ** वा **विवेक** वाचुन,
न ठरे निर्गुण तत्त्वावर मन,
न पत्करी प्रतिमापूजेतें. २६
अन् वासू समताकैपक्षी !
म्हणे "प्रभूची एका बाळें,
भेद अनन्वित कोठुन आले ?
अचिन्त्य का हें लीलाजाळें
त्रिणतांना प्रभु न्याय न लक्षी ? २७
अथवा, असतां कर्म तसें फळ
राहे प्रभुची कोठें जरुरी ?
निर्गुण म्हणतां आस्तित्व दुरी,
भुकी भावना राहे अपुरी,
प्रभु नसतां, वा नसतां प्रेमळ." २८
वदले स्वामी, "न भी भवाला,
या विश्वाला आहे स्वामी,
नेह मित्र तो प्रसादधामीं,
वडील साङ्गाती तुजला मी,

२६ विवेक = रामकृष्ण परमहंसांचे शिष्य स्वामी विवेकानन्द. २७ कैपक्षी = कैवारी

टाक हरीवर सर्व हवाला. २९
सन्ध्याविधि तुज येइल कामीं."
    वासू 'साङ्गे ,मज "पटवुन द्या,
    क्रिया गमे ती मजला वन्ध्या".
    "वादङ्ग नको, कर तूं सन्ध्या
अन् घे प्रत्यय" वदले स्वामी. ३०
तेथें येई मुमुक्षु सरला
    काय करावें ? कोठें जावें ?
    नुमजे अथवा कीं विष घ्यावें ?
    निदान सद्गुरुचरण धरावे,
("बाकी जर का पाय घसरला-") ३१
तर होइल साष्टाङ्ग नमन तें—
    "मागुन बघ तूं ! मिळेल सारें,
    मिळेल, शोधुन बघ निर्धारें,
    ठोठावुन बघ, खुलतिल दारें",
स्वामी यापरि झाले म्हणते. ३२
आणि पुढें मन करुन मोकळें
    हासत गोन्जारीत म्हणाले.
    "ऊठ ऊठ दुर्दैवी बाळे,
    टाक तोडुनी चिन्ताजाळें,
पहा तत्त्वतः मीच गोखले." ३३
कसें दुज्याचें कळतें हृद्गत ?

---

३१ "पाय घसरला तर!" (वीणाझङ्कार, व झेण्डुचीं फुलें.). ३२मिळेल—"मागा म्हणजे तुम्हांस दिलें जाईल, शोधा म्हणजे तुम्हांस सापडेल, ठोका म्हणजे तुम्हांस उघडलें जाईल" [बैबल मत्तय ७।७,]. ३३ दर्शनास आलेली स्त्री सुन्दर असल्यास गुरुवर्यांना गत जन्मींची पत्नी वाटते. हें पाहून एका कट्टर भक्तानें आपला जोडा गुरुवर्यांच्या शिरीं ठेवून तो पिता असल्याचें त्याचें पौर्वदेहिक नातें साङ्गितल्याची मौज श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीं वर्णन केलेलीच आहे.

जो परकाया प्रवेश जाणे
अगम्य त्याला काय रहाणें ?
स्वामी त्यांतुन धूर्त शहाणे,
सहज करित ते श्रद्धा उद्गत. ३४
चमत्कार हा मोठा अल्बत् !
वासु म्हणे, "कां सन्ध्या न हिला ?"
स्वामी म्हणती, "रे ही महिला,
सेवा स्त्रीला स्वधर्म पहिला,
शास्त्र पहा, स्त्री असे शुद्रवत्." ३५
प्रसाद देउन मग दुग्धाचा,
इतर चौकशी केली पुष्कळ,
गुरु स्वभावें तैसे प्रेमळ.
अन् शिष्यांचीं हृदयें निर्मळ,
होता कळपच तो मुग्धांचा. ३६
पडतां केव्हा केव्हा अन्तर
अन्तर्ज्ञानी ते काश्मीरीं
विहरत असतां झेलमतीरीं,
मित्रांची ते करित फिकीरी,
लिहीत पत्रें स्निग्ध सविस्तर. ३७
बोध करीत ते दोघांना वा
"प्रणवाच्या सख्यत्वासाठी
पडाव्यात जिवलगांशीं तुटी,
अर्पावें सर्वस्व शेवटीं–"

---

३४ धूर्त शहाणे, "तो आपल्या अनुयायांना त्यांच्या सम्बन्धीच्या अगदी खासगी गोष्टी साङ्गून आश्चर्यचकित करी व त्यांच्यावर छाप पाडी. अर्थातच ही माहिती गुप्त रीतीनें पूर्वींच मिळविलेली असे" [आर. एफ्. डिवल् कृत मुहम्मद, पृ० ६८].
३८ "देवाचिया सख्यत्वासाठीं" इत्यादि [दासबोध ४।८।८].

["प्रसङ्ग पडतां प्राणहि द्यावा !"] ३८
पण वासूची न शमे तळमळ,
योग न गुरु शिकवीत तयाला
सन्ध्येचा नित देत हवाला;
श्रद्धेचा स्त्रीमनीं जिव्हाळा
म्हणुन करित सरलेचा कळकळ. ३९
एक गुरूच्या छायेखालीं
सहज भेटलीं वासू–सरला,
स्नेहभावही सहज स्फुरला,
चर्चांनाही पार न उरला,
म्हणुन गुरूंची आज्ञा झाली. ४०
"पडा न अगदीं वादविवादीं.
वादविवादें हो शक्तिक्षय,
करूं शकेना तर्कहि निश्चय,
जरी इच्छिशी व्हाया चिन्मय,
'मामेकं शरणं व्रज' आधीं. ४१
विलायतेमधिं पहा खरोखर
जो उकलाया निसर्गकोडीं
श्रमे सारखा, मधें न सोडी,
अध्यात्माची त्यासच गोडी,
तिथेंच कार्यक्षेत्र मनोहर. ४२
आलों परतुन, तशि गुर्वाज्ञा,
मैत्रिण तेथें ती मिस् एमी,
राधेपरि ती मग्न प्रेमीं !
बहुत या इथें करुं न शके मी,

४१ "सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः" (भगवद्गीता).

तथापि झटतों ध्येय साधण्या." ४३
वासु भिंई जंव साङ्गत त्याला,
"नीति असे सापेक्ष समाजीं
नीत्यतीतता धर्मामाजीं,
समजाया अधिकार हवा जी,
कोण बघे निर्मळ सत्याला ?" ४४
स्वतास सरला प्रतिनिवेदिता
समजे; ती जणुं भोळी राधा
गुरु तो माधवजी नच साधा.
करी मोहिनी तिज सुखबाधा,
योगमोह तो नये छेदितां. ४५
गुरुसहवास न कधि तो टाळा,
ब्रह्म सगुण तें जिवास ओढी,
संस्पर्शाची अतर्क्य गोडी,
अन्तीं ब्रह्मच करून सोडी—
["म्हणजे काहीतरि घोटाळा !"] ४६
म्हणे वासुला सरला हर्षें,
"गुरुवस्त्र कसा सुगन्ध देई !"
बोलत केव्हा गुरु ऐसेंही
"असतां ब्रह्मज्ञाता देहीं,
करि परिसापरि कार्य स्पर्शें." ४७
सङ्कट भावी वासू सादर,
दावी तिज तें न रुचे न पटे,
देइ तया ती उत्तर उलटें,
प्रगति श्रद्धेवांचुन खुरटे
जैशी श्रद्धा होय तसा नर. ४८

४५ "भोळी राधा" (वाग्वैजयन्ती ९९). ४८ "यो यच्छ्रद्धः स एव सः" (भगवद्गीता).

स्वामी जाणत पूरक, कुम्भक,
असून अङ्गीं अलोट शक्ती,
निर्विकार मन, पूर्ण विरक्ती,
अलिप्त आत्मा, ध्येयीं भक्ती,
[" बाळ गुणी वसुधैव कुटुम्बक ! " ] ४९
औषध भक्तीच्या रोगास न;
सद्भक्ति न जी शान्तविचारी,
भक्ति पाहिजे अव्यभिचारी;
सरला बाला मूढ बिचारी !
जाय शिकाया ती योगासन ५०
प्रतिवात्स्यायन करितां बोली !
बाकी, सम्यक् ज्ञान झालिया,
मुक्त सदा नर! विषयकालिया
मर्दुन, तो हो कृष्ण कालिं या
सिद्ध जयाला हो वज्रोली. ५१

---

४९ "भक्तिरव्यभिचारिणी" [भगवद्गीता] म्हणजे भक्तींत व्यभिचार सम्भवतच नाही काय? ५१ वात्स्यायन,—कामसूत्रांचा कर्ता. " सम्यग्ज्ञानान्मोक्षः" वज्रोली.— " बिन्दु ढळते वेळीं तो न पतन होऊं देतां स्त्रियांचें रेतरज आकर्षण करून स्वशरीरांत साठवितां येतें. याच वज्रोलीच्या साधनानें महायोगी भगवान् गोपाल कृष्णानें अनन्तगोपींचा उपभोग घेतला. 'असङ्ख्य नारी भोगुनी ब्रम्हचारी' असा योगी ऊर्ध्वरेता होय. कृष्णचरित्राला रूपक बनवून अध्यात्मांत ढकलून देणारेही भीतीनें गाङ्गरलेले काही मूर्ख लोक समाजांत निघतील. ऋषिवर्य नाथ मत्स्येन्द्र हे वज्रोली मुद्रेच्या आधारावर स्त्रीराज्यांत विषयोपभोग भोगीत असत. नाथ मत्स्येन्द्रानें यांत आणखी सहजोली, अमरोली वगैरे भेद पाडले " ही मुद्रा स्त्रियांनाही करितां येते, आणि ही साधल्यावर स्त्रियांशी परपुरुष रत होऊन सुद्धा गर्भधारणा करून घेणें न घेणें त्या स्त्रियांच्या मर्जीवर आहे. रम्भा, मेनकादिकांना हें येत असावें." (ज्ञानेश्वरीप्रवचन पृ. ६३–६४. लेखक ह. भ. प. नाथमहाराज पण्ढरपूरकर). आतां गर्भधारणा होऊं न देण्याच्या आधुनिक अधर्म्य कृत्रिम उपायांची जरूर नाही. योग सर्वसामान्य झाल्यास निदान भ्रूणहत्या व बाळहत्या या तरी टळतील.

(–“ छे ! हें तर हठयोगविडम्बन !
देवहीन देवळांत जाणा,
हा तर नङ्ग्यांचा धिङ्गाणा,” )
[ “ – म्हणेल ऐसें तोच दिवाणा,
न कुरु नितम्बिनि गमनविलम्बन ! ” ] ५२
सद्गुरुकरणी अतर्क्य लीला !
बघुन रूप तें सरला बुजली,
पावसांत कडकडली बिजली,
शाप मिळे, ‘ बुडशील भवजलीं,’
वासू ने तिज पैलथडीला. ५३
स्वामी झाले मग अन्तर्हित
आणिक कोठें तरी प्रगटले,
तिथे बरोबर होतें खटलें,
परि त्यावीण न अपुलें तटलें,
साधु नको साधाया स्वहित. ५४

---

धर्माच्या गूढ विद्येच्या नांवावर हिन्दुस्थानांत वाटेल तितकी अनीति खपते ! अजून धर्माची ग्लानि व्हावयाची राहिली आहे काय ? भगवन्ताच्या योग निद्रेचा भङ्ग कां होत नाहीं ?

## अध्याय ११ वा

# तरला

सरलेची ही बहीण तरला,
        लाडकीच कीं हें शेण्डेफळ,
        नव्या तऱ्हेची प्रतिमा केवळ,
        लहरी जितकी तितकी प्रेमळ,
कधींच न दिसे नूर उतरला. १
हुजूरपागेमाधिं शिकलेली,
        उभट चेहरा सुबक अगोदर,
        लाडिक हनु ती गोल मनोहर,
        खुली धिटाई नयनीं गोचर,
रुचे टेनिसन आणिक शेली. २
शेलीच्या चण्डोलासङ्गें
        कल्पनभीं वर उन्च उडावें,
        स्वातन्त्र्यप्रेमाला ध्यावें,
        प्रसादमय जीवनीं विरावें,
स्वप्नतरङ्गीं या ती रङ्गे. ३
‘ केवळ ध्येयासाठीं ’ वाचुन
        वहात अश्रू ते वेगानें,
        सहृदयतेनें गाई गाणें,
        ‘भासें जग हें बापुडवाणें,

१ शेण्डेफळ = वेलीवरील मूल. २ पेशवाईतील जुन्या हुजरात पागेच्या इमारतींत हल्लीं हिन्दी मुलींचें इङ्ग्रजी विद्यालय आहे, ३ कल्पनभ = कल्पनेचें आकाश.

सर्व सुनें तें प्रेमावांचुन. ' ४
नववय म्हणजे प्रेमकाळ तो.
    'व्यर्थी अधिकचि अर्थ दिसें' तंव,
    वा अत्युक्तींमधिं ऋतवैभव;
    गुलाब कण्टकहीन गमे भव;
बहिरङ्गावर जीव भाळतो. ५
बालकवींची जडे शिराणी,
    कोमल लाडिक साधी भाषा,
    मङ्गल सात्विक नादी आशा,
    सकरुण ती सौन्दर्यपिपासा,
कविता त्याची जणुं ' फुलराणी ' ६
किंव्वा भोळी बाळकुरङ्गी.
    तशीच तरला ! उडे बागडे,
    मैदानीं तिज खेळ आवडे,
    तसें लक्ष्यही पुस्तकाकडे.
चित्रपतङ्गासम बहुरङ्गी, ७
आज्ञाधारक तथापि बाला !
    येतां बाहेरून बहादुर
    कुरवाळाया तिजला आतुर ;
    कपडे नेउन ठेवी ती वर,
फराळ वाढी तीच पित्याला. ८
शैशवांतला मुखीं तजेला;

---

४. 'केवळ ध्येयासाठी.' सौ. इन्दिराबाई सहस्रबुद्धे यांनीं 'दि वुमन् व्हू डिड्' या इङ्ग्रजी कादम्बरीचें रुपान्तर वरील नांवानें केलें आहे. विवाहसंस्था अनेक सामाजिक अनर्थांचें मूळ म्हणून नकोच ती मुळीं, या तत्त्वानें चालणाऱ्या एका कर्त्या सुधारक स्त्रीची ही करुण कहाणी आहे. 'प्रेमावांचुन सर्व सुनें। जग भासें वापुडवाणें' (बालकवि ठोमरे). ५ शिराणी = आवड. 'फुलराणी' हें बालकवींच्या एका कवितेचें नांव.

नाजुक, बान्ध्यानें शेलाटी,
ललितकलेचें तेज ललाटीं,
स्वतन्त्रता ती डोङ्गरघाटी—
नजर कोण भिडविल नजरेला ? ९
प्रतिमा ही परि जणुं मकराणी,
पदर-टोक उजव्या करिं नाजुक
धरून जाय ऐटींत अधोमुख;
मुग्धपणें जणुं करी स्वकौतुक—
बुद्धिमती मी मोहक राणी. १०
तिचें इङ्ग्रजी वाचन जब्बर,
एकवार मॅट्रिकला बसली
परन्तु गणितावर्ती फसली,
वर्ष बुडालें, अडचण कसली ?
ती मुलगी, अन् वडील गब्बर ! ११
म्हणुन ठेविला गणिती शिक्षक;
सरला दे वासूस नोकरी,
विश्वासाचें काम तो करी,
जरूर नाही काम लोकरी
करित बसाया कुणी अवेक्षक. १२
वासु सुशिक्षित परी न अट्टल;
प्रसन्न, राजस, विनीत, सालस,
कामांत न कुचराई, आळस;
अजुन कोवळा पोर निखालस,
आणिक विमलाबाई वत्सल. १३
विलायतेमधिं अजित तयांचा
करीत होता विद्यासाधन

१० मकराणी म्हणजे राजपुतान्यांतील मकराण येथील सङ्गमरवराची.

("—का गौरींचें हृदयाराधन ?")
मृगनयनांचा छे ! तो व्याध न.
आणिक वासू त्याच वयाचा, १४
मात्र पोरका, तसाच दाणा !
की सुख त्याला पाहुन व्हावें,
मातृत्वच हृदयीं दाटावें,
इच्छा व्हावी जवळ करावें;
खेळाडू तितकाच शहाणा. १५
देखा कुन्तल काळे कुरळे;
डोळ्यामाजीं गहिरें पाणी,
प्रतिबिम्बित ती अनघ रहाणी,
भाषासरणी मधुर शहाणी,
जीव कसा पाहतांच हुरळे १६
माउलीस त्या वाटे कौतुक:

१४ गौरी-हृदयराधन.– १५ डिसेम्बर १९२७ या तारखेच्या सर्वण्ट्‌ ऑफ्‌ इण्डिया पत्रांतलि पृ० ५५६ वरील इङ्ग्लण्डांत अधिक विद्यार्थी जाणें अनिष्ट नाहीं हें सिद्ध करणारें ' इण्डियन ' या सहीचें एक पत्र आहे. त्यांतील पुढील मजकूर इङ्ग्लण्डला जाणें इष्टच आहे असें म्हणणाऱ्याचा आहे म्हणून विशेष महत्त्वाचा आहे. तो म्हणतो "वर्षाला साडेतीनशें पौण्ड ही [ रँ. डॉ. पराजन्पे यांनीं काढलेली ] सरासरी गणितानें बरोबर असली तर तिच्यावरून सर्वसाधारण आवश्यक खर्चाचें अनुमान होत नाहीं. दरवर्षीं दोनशें पौण्डांत मी एडिम्बरोला सुखांत रहात असे. मी नाटकगृहांतहीं बरेच वेळां जात असे; परन्तु तरुणींची बर्दास्त ठेवण्याची खर्चिक चैन मी कधीं केली नाहीं. हिन्दी तरुणांचा सारा पैका जातो तो या चैनींत जातो. ऑक्स्‌फर्ड्‌ विद्यापीठांतलि रहाणी तर अत्यन्त खर्चाची आहे तरी तेथें ते दरसाल दोनशें पौण्डापेक्षां फारसा अधिक पैका खर्च करीत नाहीत असें मीं तेथील ब्रिटिश विद्यार्थ्यांकडूनच ऐकिलें आहे. अशा स्थितींत परदेशीं शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस सर्कारी तिजोरींतून म्हणजे दरिद्री हिन्दुस्थानच्या मुक्या रयतेचे, वा लोकाश्रयादर चालणाऱ्या संस्थांतून म्हणजे कवडी-कवडीचा सुद्धा खर्च सुठायीं होत आहे अशा विश्वासानें धर्म करणाऱ्या सुशिक्षितांचे वर्षास शम्भर पौण्ड अधिक देणें म्हणजे दुष्ट उधळपट्टी होय ! १५. गहिरा<गम्भीर, गडत रङ्गाचा, तेजस्वी, सुन्दर.

("–का गौरींचें हृदयाराधन ?")
मृगनयनांचा छे ! तो व्याध न.
आणिक वासू त्याच वयाचा, १४
मात्र पोरका, तसाच दाणा !
की सुख त्याला पाहुन व्हावें,
मातृत्वच हृदयीं दाटावें,
इच्छा व्हावी जवळ करावें;
खेळाडू तितकाच शहाणा. १५
देखा कुन्तल काळे कुरळे;
डोळ्यामाजीं गहिरें पाणी,
प्रतिबिम्बित ती अनघ रहाणी,
भाषासरणी मधुर शहाणी,
जीव कसा पाहतांच हुरळे १६
माउलीस त्या वाटे कौतुक:

---

१४ गौरी-हृदयराधन.– १५ डिसेम्बर १९२७ या तारखेच्या सर्वण्ट् ऑफ् इण्डिया पत्रांतलि पृ० ५५६ वरील इङ्ग्लण्डांत अधिक विद्यार्थी जाणें अनिष्ट नाही हें सिद्ध करणारें ' इण्डियन ' या सहीचें एक पत्र आहे. त्यांतील पुढील मजकूर इङ्ग्लण्डला जाणें इष्टच आहे असें म्हणणाऱ्याचा आहे म्हणून विशेष महत्त्वाचा आहे. तो म्हणतो "वर्षाला साडेतीनशें पौण्ड ही [ रॅ. डॉ. परांजपे यांनीं काढलेली ] सरासरी गणितानें बरोबर असली तर तिच्यावरून सर्वसाधारण आवश्यक खर्चाचें अनुमान होत नाही. दरवर्षीं दोनशें पौण्डांत मी एडिम्बरोला सुखांत रहात असे. मी नाटकगृहांतही बरेच वेळां जात असे; परन्तु तरुणींची वर्दास्त ठेवण्याची खर्चिक चैन मी कधीं केली नाहीं. हिन्दी तरुणांचा सारा पैका जातो तो या चैनींत जातो. ऑक्स्फर्ड् विद्यापीठांतलि रहाणी तर अत्यन्त खर्चाची आहे तरी तेथें ते दरसाल दोनशें पौण्डापेक्षां फारसा अधिक पैका खर्च करीत नाहीत असें मी तेथील ब्रिटिश विद्यार्थ्यांकडूनच ऐकिलें आहे. अशा स्थितींत परदेशीं शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस सर्कारी तिजोरींतून म्हणजे दरिद्री हिन्दुस्थानच्या मुक्या रयतेचे, वा लोकाश्रयादर चालणाऱ्या संस्थांतून म्हणजे कवडी-कवडीचा सुद्धा खर्च सुठायीं होत आहे अशा विश्वासानें धर्म करणाऱ्या सुशिक्षितांचे वर्षास शम्भर पौण्ड अधिक देणें म्हणजे दुष्ट उधळपट्टी होय ! १५. गहिरा < गम्भीर, गडत रङ्गाचा, तेजस्वी, सुन्दर.

म्हणतच तिज 'ममतेचें गल्बत' !
चहा न घेई वासू अल्बत,
देत त्यास मग कोको, सर्बत,
अति अभिनव तें वासूला सुख. १७
शिष्येचीही झाली प्रगती;
गणित तो विषय जशुं रणभीषण,
रसाळ शिक्षक ओती जीवनें,
मन रमलें तर तें नन्दनवन,
सोबतिणी आश्चर्ये बघती–१८;
वाटुन काहीतरि कुणि बघती
यदा करी ती गुरुप्रशंव्सा,
जिववी तो जड अङ्कां, कंव्सां,
–तरुण परी जो काय भरंवसा ?
बालावृत्ती सरल अनघ ती, १९
("गारुड काही करावयाचा,
कटाक्ष आधीं, स्मित मग चञ्चळ,
जायाचा मग चाटुन अञ्चळ,
अर्धशब्दपुष्पांची ओञ्जळ,
पुढें ? प्रीतिला परीं न वाचा. २०
नच होईना निकुञ्जकूजन ?
खुळ्या जनांच्या खुळ्याच खाशा,
जुळ्या मनांची मुकीच भाषा;
परस्परांना न कळो आशा
तथापि चाले मानसपूजन. २१
तिला भेटला प्रथम युवा तो,
त्यास तशी ती कुमरी पहिली,

ग्रंथ संग्रहालय

२० 'दृष्टिक्षेपच आजला स्मित उद्या गालीं जरा चञ्चळ' (यशवन्त, किरण १२

नवल न जुळतां सङ्गति वहिली,
प्रीति गुणांनीं बत्तिस गुणिली,
जीवांचा जुळलाच दुवा तो. २२
जणूं परांची तरल तनू ती,
स्वतन्त्रताप्रिय भुरके कुन्तल,
तेज लोचनीं निर्भय उज्ज्वल,
हृदयाला न स्पर्शे कश्मल,
अजड जीवनज्योति जणूं ती! २३
जगताची तिज नच अनुभूती,
वाटू वाटे तिज पुरुषोत्तम,
असेच वल्लभ गुणाढ्य, अनुपमः
तुच्छ त्यापुढें अर्जुन, विक्रम;
अकिञ्चन जरी प्रेमविभूती! २४
पण अभ्यासावांचून दुर्जे
तो शिष्येशी न करी भाषण,
सामाजिक चर्चेत पहा पण,
सरलेशीं घटि जाय जणूं क्षण.
प्रेम अबोल्यामधें परि रुजे २५
("—मग टकळी का प्रेम-कवीची ?")
[" गर्जे त्याला काय बरसवें ?"]
("डोङ्गर उन्दिर शेखीं प्रसवे")
अघळ पघळ तें भाषण फसवे,
प्रीति न चञ्चल कौतुकवीची. २६
प्रेम रुजे हें अबोल्यामधीं,
सरलेला ये म्हणुनी संशय
एकाङ्गी तरी कळला आशय,
प्रीति कशावरुनी पण अक्षय,

म्हणे, जाउं द्या थोडी अवधी. २७
जणुं अच्छोदच सरलाहृत्सर !
—जणूं 'रागिणी' निराश आतुर,
ती का जाळिल होउन निष्ठुर,
काव्यात्म असा हा प्रेमाङ्कुर !
तिच्यांत नव्हता हेवा-मत्सर. २८
वाटे तिजला उलटें कौतुक :
जपावयाचें नसतां कारण,
जपे, करुं बघे विघ्ननिवारण,
तिचीच पांचावरती धारण,
मामलाच हा कारण नाजुक. २९
प्रगति तिची शिष्येला दावी,
म्हणे गुरु, 'अतां जरुरी नाही'
सुटका करूनी घे लवलाही,
अभ्यासीं तो बहु उत्साही,
प्रीतिहि न रुजे विरहाभावीं. ३०
विमलाबाई वदल्या, "या या !
जाच भेटुनी येतां जातां
अजितासम तुम्हि घरांत आतां."
न करि कायदेशीर विधाता,
यत्न मानवी बहुधा वाया. ३१
जातांना वासूस वाटलें,
समुद्रावरी जशीं लाकडें
जुळतीं, फुटती, कोण कुणिकडे ?
तसेंच मानव जीवितीं घडे,

३१ वासू अजिताप्रमाणें कायदेशीर पुत्र व्हावयाला तो जावई [सन्-इन्-लॉ] व्हावयास पाहिजे.

अन् तन्नेत्रीं अश्रु दाटले. ३२
होतें ऐसें जरी आंवतण
तरि जाण्याचा सम्भव न दिसे,
जावें कैसें खोट्याच मिषें ?
आणि असें हें मनांतिल पिसें,
व्हावें त्याचें कसें शान्तवन ? ३३
चारच वर्षें झालीं त्याला,
श्रमुन जनांच्या खस्ता खातां
सोडुन त्याला गेली माता;
कडू न तेव्हा जितका आतां
गमे कडू विरहाचा प्याला. ३४
अन् ती होती जननी साध्वी,
अन् ही बाला परकी अल्लड,
परन्तु उपवर लाडिक फक्कड,
प्रीति विवेकावर करि हुल्लड,
प्रीति मधुवर्यीं म्हणजे माध्वी. ३५
परी तिच्याविण संस्कृति बिघडे;
प्रीति वसे का उन्च गडावर ?
का स्थान तिचें दरीच सुन्दर?
लग्नग्रन्थींमधें निरन्तर
का ती तर बन्धनापलिकडे ? ३६
वास्तु टेकडीवर त्या रातीं
पडे जाउनी कातळावरी,
वृत्ति होउनी जाय बावरी,
त्यास शान्तवी तिथे विभावरी,

३६ 'प्रीति ना वसे कधींहि उन्च त्या गडावरी' (ताम्बे)

झोंपहि येई पण उशिरां ती. ३७
["जावें, देखावें, जिङ्कावें
दुष्यन्त पहा ऐसेंच करी !"]
तोंच गौतमी आड ये परी
("धीरोदात्त न, वासू उपरी,
नायक केवी त्यास म्हणावें ?" ) ३८

---

३८ मी गेलों, मी पाहिलें, मीं जिङ्किलें ही एका पाश्चात्य जेत्याची प्रसिद्ध दर्पोक्ति आहे.

## अध्याय १२ वा

# ध्येय का व्यवहार ?

नव्हता वासू रडवा आशक,
नव्हती निवृत्तीची दीक्षा
करित बसाया वृथा प्रतीक्षा,
होती आली जवळ परीक्षा
अभ्यास करी तो बेलाशक. १
झाला पहिल्या वर्गीं स्नातक,
करितां तरला यशसम्पादन,
ठरलें आनन्दाचें भोजन,
अर्थात् ये वासूस निमन्त्रण,
नकार देणें म्हणजे पातक. २
मारा झाला त्यावर तेथें,
"अभ्यास न का अजून सरला ?
येइन म्हणुनी कसें विसरला ?"
हळूच सुचवी मागुन सरला,
"बक्षिस नामी द्या शिष्येतें" ३
पण वासूसच ठोसर देती
अभिनन्दूनी शब्दें मन्थर,
इनाम नगदी रुपये शम्भर,
मॉलेकृत 'तडजोड' यशस्कर,

१ आशक् (< आशिक < इश्क) प्रेम करणारा.

तर्कशुद्ध हितनीति असे ती. ४
'समग्र कविता बालकवींची'
तरलेस मिळे, तयांत चित्रें,
वर लिहिलेलें 'दिधलें मित्रें',
अधिक वदाया मानस भित्रें,
जरि हेलावे जीवनवींची. ५
योग कसा परि ये आपैसा ?
प्रश्नाला 'हो' तयार ओठीं
तरी पुसाया धुग्धुग मोठी,
प्रीतिधृतिची कठिण कसोटी,
शब्द कुणी टाकावा कैसा ? ६
प्रेमयाचना वाटे कोणा
कौमार्याचा घोर अनादर !
आर्यसंस्कृती नाजुक कातर !
शान्त विचारी युवती नादर,
जी स्थिर राहुन म्हणेल 'हो, ना' ७
इलाज न करूं शके स्वतांला,
ती सरला यां सान्निध आणी,
पुढें अभिन्न प्रेमकहाणी,
कोण दूरची करी पहाणी ?
वाङ्निश्चय तत्क्षणींच झाला. ८
के, पण वासू निक्षुन बोले,
"मी निष्काञ्चन, मी अब्राह्मण,"–
"सुधारकाची मी तनया पण"–
"प्रेमाला अनुसरतों आपण,

६ आपैसा = आपोआप, आपसया. ७ नादर = विरळा. "गुलगुलीत अशी नादर –विरळा" (प्रभाकर ९३)

तरी पहावें उघडुन डोळे. ” ९
प्रेम आन्धळें तथापि लोकीं.
धरिति करीं कर योग्य वधूवर,
साक्षीला ध्रुव, शुक्र, विधू वर,
शपथेचा विधि नीरव सुन्दर,
मिस्कीलपणें देव विलोकी. १०
प्रणयिजनांस न व्हावी बन्दी,
सरला काढुन निमित्त काही
गच्चीवरुनी खालीं जाई,
दोघांमधिं मूकताच राही,
शब्द न उमटे मिळून सन्धी. ११
निरर्थ शब्दीं ओठ कम्पती
गुन्तुन मोहीं कार्य विसरुनी;
नेत्र कार्य तें टाकित करुनी,
नव तेजानें येती भरुनी
प्रथम बावरुन जाय दम्पती. १२
[–“परि दिसतें हें पहिलें चुम्बन’.
जरा रङ्गवा !”] छे राम हरे !
मनास रुचती सारे नखरे,
परि पड्यांतिल पड्यांत बरें,
पुनरुक्तीमधिं मौज तुडुम्ब न, १३
पहिल्याची दुसऱ्यांत न लज्जत !”
(“पहिल्याची पण जादू न्यारी
अनुभवायला या संव्सारीं
कोण मृत्युची करिल तयारी ?

१४ निशिदिनीं वाटतें मनीं नित्य जन्मुनी मरण सोसावें, परि पहिलें चुम्बन घ्यावें फिरुनही” (पहिलें चुम्बन–वाग्वैजयन्ती १२५),

काव्य काय मग ? शाब्दिक गम्मत ! १४
काय शिकवणी पण ही गुरुची ?
अङ्कविषय हा, त्याची सन्था
ने शिष्येला विवाहपन्था,
ज्ञान पवित्र न येई म्हणतां.")
" (भिन्न प्रकृति, भिन्न अभिरुची !)" १५
होतिल का पण वडील राजी ?
पत्र लिही मग त्यांना वासू.
"दोघे आह्मी प्रेमपिपासू,
असें प्रणयसुख नकाच नासूं !
—क्वचित् योग हा हिन्दुसमाजीं. १६
कां की प्रीतिस्वातन्त्र्याचे,
गौतमऋषिच्या धूर्तपणाचे,
शुक्रसुतेचे, दुष्यन्ताचे,
प्रेमासाठीं पराक्रमाचे,
दिवस सम्पले स्वयंव्वराचे. १७
इष्ट न होणें पुरातनानुग.
काव्यात्म अशी प्रीती न्यारी,
वर्ज्य कलियुगामधिं संव्सारीं;
अमृतही हो कधीं विषारी
ईश्वरेच्छया, तुरें जुनें युग. १८
कथा पहा पृथ्वीराजाची
हरुनी संय्योगितेस वरिलें,
जयचन्दानें वितुष्ट धरिलें,
घोरीनें आर्यभूस वरिलें.

---

१५ 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' (भगवद्गीता). १८ "विषमप्यमृत क्वचिद्भवेत् अमृतं वा विषमीश्वरेच्छया" (कालिदास).

प्रणयनीति ही ऐशी जाचां. १९
प्रणयोत्तर परिणय कवि मानी;
मीलन तुटल्या जुळ्या जिवांचें
परन्धाम तें सदाशिवाचें,
प्रीति कशी कैलासीं वाचे ?
परि विहरे ती स्वप्नविमानीं. २०
बाकी, वासू चलाख सुन्दर,
आणि बहादुर बडे सुधारक,
जातिभेद राष्ट्राला मारक,
सङ्कर एकच उपाय तारक,
आणि बहादुर कार्यधुरन्धर. २१
गुप्तपणें परि डाचे पोटीं
गरिब वराची विषमच जाती—
["वैषम्यीं या और मजा ती !
शुक्रसुतेला वरी ययाती— ]"
( "पण ती शापित कन्या होती." ) २२
["विचार हा परि आत्मघातकी !
जातिभेद हा स्वदेश होमीं,
नाविन्य बघा व्रात्यस्तोमीं,
आर्यतेज मग रोमीं रोमीं.
उन्नत व्हा, कुणि म्हणो पातकी ?"] २३
असेंहि म्हणती सुधारणाप्रिय,

१९ संय्योगितेची कथा विनायक कवीनें असल्या सावेश व अस्खलित वाणीनें गाइली आहे. २३ व्रात्यस्तोम या विधीनेंच चातुर्वर्ण्यसंरक्षकसभेचे अध्यक्ष ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं मिस् कोहेन् या युरोपियन स्त्रीला हिन्दू करून घेऊन पुढें तिच्याशी वैदिक रीतीनें विवाह केला. व्रात्यस्तोमांत प्रसिद्ध जहाल पाण्डुरङ्ग महादेव बापट हे एक उपाध्याय होते.

'सुधारणा तर अवश्य व्हावी
इतरांनीं ती परी करावी,
उघडणें मी महती गावी
सहानुभूती दावुन सक्रिय.' २४
ध्येय एक निर्विवाद अन्तीं;
पोटभेद हे आधीं मोडा,
अनुलोमाचें बन्धन तोडा,
प्रतिलोम परी जरि हा जोडा
गुणमेळानें नलदमयन्ती ! २५
प्रेम असेलहि ही घ्या कबुली !
प्रेमानें पण पोट भरें का ?
प्रेमें विषमज्वर उतरे का ?
ध्येयासाठीं अकाल हेका
धरितां जन्माचीच चुकभुली ! २६
प्रेम गहन गति ! केवळ कोडें !
लहर जिवाची म्हणजे प्रीती
सृष्टि मधुर वञ्चना करी ती,
अतिरेकें कर्तृत्व हरी ती ;
प्रेम असावें माफक थोडें. २७
पोर कोंवळी वय एकोणिस;
कसें कळावें हिला हिताहित ?
रीत जगाची नाही माहित.
[—"याच वयीं का माता नाहित
ज्यांस लटाम्बर करि कासाविस ?" ] २८
कबूल, त्याला असेल हिम्मत,
असुन हुशारी नाही आळस,
परन्तु हें कटु सत्य निखालस,

यत्नाचा उत्कर्ष न वारस.
प्रथम वर्ग ? किति त्याची किम्मत ? २९
धैर्याचा तर दुर्मिळ सद्गुण,
दिसे न पुढतीं सङ्कट भावी,
आणि म्हणे मज भीति न ठावी,
धृतिची त्याच्या महती गावी,
न भी जो पुढें सङ्कट पाहुन. ३०
कींवच या निजसुखमग्नांची !
मिश्रविवाहहि योग्य निरागस,
स्तुत्य खरें वैयक्तिक धाडस,
हवी काळजी परी निखालस,
पोराबाळांच्या लग्नांची ३१
सुधारणेचा लावा झेण्डा,
मिळविल्यावरी आर्थिक शक्ती,
न पुरे नुसती ध्येयासक्ती,
मरण ओढवे करितां सक्ती,
गेण्ड्याची कृति न करी मेण्ढा ३२
गरिब सुधारक वाया बुडती.
सुधारणा करितील महाजन
तेव्हा अनुसरतील पहा जन
बुडेल संस्कृतिचेंहि जहाज न,
सलील डोलत जाइल पुढती. ३३
गणी कोण पैक्यास तिरस्कृत ?
समर्थ जो नच धन कमवाया
तोच म्हणे श्री चञ्चल माया;
सत्य दुरत्यय परन्तु ' माया',

---

३३ महाजनो येन गतः स पन्थाः.

समाजांत जी करी सुसंस्कृत. ३४
[-" काय करावें मग गरिबांनीं ? ]
जनीं निन्द्य तें सोडुन द्यावें,
जनीं वन्द्य तें जिवें करावें,
धोपट मार्गें नीट चलावें,
स्तवी कीर्ति मग पांच जिभांनीं. ३५
बासु तरि बरें नव्हता शाहिर,
(" नटापरी कवि शङ्कार्ह स्थळ" )
काय पहाणें मुलास केवळ ?
प्रीति फोल ती ! सोन्याचा गळ,
काढी मीनाक्षीला बाहिर. ३६
बहादुरांनीं लिहिला कागद;
शान्तपणाची निश्चित भाषा,
भङ्गुन टाकी त्याची आशा;
होता तींतहि बोध-दिलासा,
करावयाला त्याला सावध. ३७
माय सुधारक मुलींच नव्हती,
पोर तिला तो बहु आवडला,
दुर्दैवें अब्राह्मण पडला,
स्वधर्म हा प्रेमाला नडला,
वृथाच होई मायकणव ती. ३८
पाहुन तरलेचें वरशोधन,
विचार होई घरांत मुष्कर,
स्थळ होऱ्यामधिं होतें सुन्दर,
रुकार द्यावा असून दुष्कर,

---

३५ पञ्चमुखी परमेश्वराला अर्थात् पांच जिभा असणारां. ३८ कणव=कींव.

सुन्दरीसवें कुणा नको धन ? ३९

परि तिथें कुणी केली चुगली
    आणि वाजली नकारघण्टा,
    घरांत फिरला, होउन तण्टा,
    तरलास्वातन्त्र्यीं वरवण्टा,
भय कीं प्रीति न राहिल उगली. ४०

[–"म्हणजे झाला पिता क्रुद्ध तर" ?]
    तथापि आशा, तरला हट्टी,
    ध्रुवासमक्षच जडली गट्टी,
    प्रीति, धगधगो मग भवभट्टी,
होय सुवर्णाहून शुद्धतर. ४१

ठोसर नव्हते लेचेपेचे,
    दूध वाघिणीचा जो प्याला
    लेचापेचा तो न निघाला;
    देती विष्णु कृष्ण हवाला,
चाले कुठवर बळ अबलेचें ? ४२

वात्सल्याचा झाला ओसर,
    होय सामभेदाचा मारा,
    जीव मुलीचा दीन बिचारा,
    बहादुरांसच अधिक बिचारा,
लेचेपेचे नव्हते ठोसर. ४३

[–"जुलूम कां, जरि गमे हितावह ?"]
    ("व्यक्तिस्वातन्त्र्यावर भर्त्ता
    असुन, शिक्षणीं युक्तच सत्ता;

---

४२ इङ्ग्रजी विद्या वाघिणीसारखी आहे आणि तिच्या दुधावर पोसलेला लेचा-पेचा निपजावयाचा नाहीं असा विश्वास विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या निबन्धमालेंत प्रगट केला आहे.

निजहित जाणे न सदा व्यक्ती,
जुलूम नच हा, हा सत्याग्रह !)" ४४
निकरावरती आलें प्रकरण !
तरला कळवी, "प्रेम टिकाऊ
तर या राहूं बहीण भाऊ."
वासु म्हणे, "तर मैत्री दाऊं,
अन् अविवाहित राहूं आपण." ४५
लग्नाची पण तिला जाचणी.
वासू सुचवी, 'होय असा छळ,
न्याय्यच होणें तर उच्छृङ्खल,
संन्सार वनीं शुभ थाटूं चल,
स्वतन्त्रतेची गोड नाचणी.' ४६
["जुलमी भेकड मत्त समाजा !
वरच्या लत्ता झेलित माथां
सर्वं झाडणें खालीं लाथा,
पराक्रमाचा हा तव गाथा,
कां ठेवावा तुझा मुलाजा ?'] ४७
छे छे ! तरला आर्यकुमारी !
हृदयाचें ती देइ उपायन
टिकती आतां जरी उपाय न,
प्रेमास्तव परि गुप्त पलायन,—
त्याची पाश्चात्यांस खुमारी ! ४८
स्वातन्त्र्याची ती शिर्जोरी
प्राच्यकिशोरींना नच साजे,

---

४६ आईबापांच्या आज्ञेनें वृद्धाशी विवाहित होण्यापेक्षां माझ्याबरोबर पळून चल असा प्रिय सन्देश रा. ताम्बे यांच्या 'ये पहाटचा वर तारा' या कवितेंत असून तींत 'चल वनीं थाडूं संन्सारा' ही ओळ आहे. ४७ वरच्या लत्ता (वाग्वैजयन्ती).

सविनय यांचें जगांत गाजें
सहिष्णुत्व, तनुवाङ्मनसा जें,—
अबलाच जरी शिकल्या पोरी. ४९
स्वार्थत्यागी हिन्दु युवती !
तयार हो परक्यास वराया,
हृदयेशाचा त्याग कराया;
आलेला हङ्गाम सराया,
अन् तरला हो सौभाग्यवती ५०
दाखविल्यावर नाना जागीं.
["रुचला कैसा तिला तमाशा ?"]
बण्ड कराया नव्हती आशा,
प्रयत्न करुनहि धूळधमासा,
नव्हती तितकी पोर बजागी. ५१
निरुपायें ती सम्मति देई,
दुर्भाग्याची झळम्बतां झळ
विटम्बनेहुनही मृति मङ्गल,
वृत्ति लैङ्ग तर नच उच्छृङ्खल,
दैववादही येई ओठीं. ५२
बहादुरांची हौस भागली,
मुल्की अम्मलदार गवसले,
नव्हतें दैवत जरी नवसलें;
सारस्वत ते,—काय बिनसलें ?
सुधारणा नेमस्त चाङ्गली. ५३
सुसंय्योग गौड-द्रविडांचा !

---

५१ बजागी = हट्टी, भाण्डखोर. ५४ 'सुसंय्योग' श्री. यमुनाबाई केळ्यक काला हरकिसनलाल यांचा विवाह झाला तेव्हां मनोरञ्जनांत 'महाराष्ट्रपञ्ज संयोग' या मथळ्याखालीं वधूवरांचें छायाचित्र दिलें होतें.

सुधारकी लागली कसाला,
सुधारणेचा पुकार झाला,
अभिनन्दन-वर्षाव मिळाला,
झाट-थाट मग उपायनांचा. ५४
दैवाचा किति अतर्क्य दण्डक !
प्रणयिजनांचे फुटले रस्ते;
प्रेमनिराशक आशक नुस्तें
देइ उपायन सरलाहस्तें,
—सोन्याचा सौभाग्यकरण्डक. ५५

---

५४ अहेराच्या देणग्या माण्डून ठेवल्यामुळें मोतीबाजारच दिसत होता. ५५ प्रेम-निराशक—प्रेमांत निराश झालेला.

## अध्याय १३ वा

# श्यामा वेङ्गुर्लेकर.

प्रेमावांचुन सर्व जग सुनें.
सरलेला तो भगिनी मानी,
घरीं पित्याच्या ती अभिमानी,
न हो अतुला तिचिया हानीं
वासू सोडी म्हणुन मग पुणें. १
भुतें झडपितीं परी भित्याला;
कण्डी बसली ही आ वासुन
कळे तिचा अवतार तपासुन,
विश्व हो कसें शून्यापासुन,
सत्य वा म्हणा मिथ्या त्याला. २
कुश्रद्धा, अन् दुष्ट कुतूहल,
कण्डी चण्डी यांवर पोसे,
समर्थांसही करी नकोसें,
उभा सामना तीस न सोसे,
सदैव दावी गनिमी कौशल. ३
जाई घेउन पति तरलेला,
आणि वासुनें पुणें सोडिलें
कण्डीजाल न परी हो ढिलें,
नातें सरलेशींच जोडिलें,
किञ्चित् लागे झळ सरलेला. ४
वर्षे लोटलें यावर एकच

एक केस दिसतां पिकलेला
हरपे सरलावदनतजेला,
जीवितांतला प्रसाद गेला,
खाशीं अगदीं हृदयानें कच, ५
नैराश्यानें हरिलें यौवन;
'नैराश्योद्भव आशावैभव'
पटवी भलतें परन्तु अनुभव,
नच सत्याच्या हृदयीं मार्दव,
लाभे काव्यांतच नन्दनवन,—– ६
कुणाकुणाला अन् मेल्यावर !
'क्षीणे पुण्ये' परन्तु तेही,
पहा परतती होउन देही,
सुखदुक्खान्वित मात्रागेहीं;
स्वर्ग शचीसच मिळे निरन्तर. ७
तोंच बातमी ये ऐकाया,
मेजर खेतीं लागुन गोळा,
झाले पञ्चप्राणहि गोळा,
संव्स्कार पुरे झाले सोळा.
बरी ठेविली मागें माया. ८
सरलेनें अन्थरूण धरिलें,
इलाज झाले अमोल ताजे,
शब्द वदे ती, "कोठें राजे ?"
अस्पष्ट पुढें—"अन् ते माझे"—
आणि यमानें तिजला वरिलें. ९

६ "नैराश्योद्भव आशावैभव" (टिळकांची कविता १।२१८.) ७ "क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति' (भगवद्गीता). शची.—हपीसर बदलतात पण जागा कायम रहाते त्याचप्रमाणें इन्द्र बदलतात पण इन्द्राणी बदलत नाहीं. ८ खेत=रणक्षेत्र.

केसरीमधें वासू वाची,
अन् पत्र लिही, बसवे स्वस्थ न
दुक्खकथन वा गतगुणवर्णन,
कसें कुणाचें करील सान्त्वन ?
तगमग त्याच्या होय जिवाची. १०

बहादुरांचें आलें उत्तर,
आभारांचें जरी प्रदर्शन
तथापि केवळ औपचारिक न,
इतर चौकशी प्रेमळ ती पण,
भाषाशैली सुबोध सुन्दर. ११

अर्थात् सुखवी तें वासूला;
मुम्बईंत तो पुढील शिक्षण,
करीत कण्ठी नीरस जीवन,
कुणी न त्याला, ज्याच्याशीं क्षण
बोलुन गाळिल निज आसूला. १२

सख्य कुणाशीं यावें जमुनी ?
वाची एकान्तांत निरन्तर,
वर्गांतहि नच बोले अक्षर,
वदे विनोदें वाचासुन्दर,
"रुदनर्षि पहा हा शुद्ध मुनी !" १३

ओसाड तया वाटे सृष्टी,
वर्गांत परी मध्यक्षामा,
युवती हरिणाक्षी अभिरामा,
नांव काव्यमय सुन्दर– श्यामा,
पण वासूची न वळे दृष्टी; १४

१३ रुदनर्षि = हेराक्लिटस्, ग्रीक रडवा तत्त्ववेत्ता. १४ श्यामा.—तन्वी श्यामा शिखरिदशना इत्यादि; पहा, मेघदूत.

आणि कशाचें मग आकर्षण ?
नार पहाया नाजुक नादर
किति विद्यार्थी रसिकबहाद्दर,
वर्ग बुडविती अपुले सादर,
परि वासूला खेद न, हर्ष न. १५
गर्भरेशमी चन्द्रकळेचा
हरित् चकाकित रुन्द पदर तो
उजव्या खान्द्यावरुन न सरतो,
विशाळ भाळावर सुन्दर तो
रुबाब सात्विक जणुं कमळेचा १६
तसें प्रौढपण गभीर किञ्चित्;
योग्य ठिकाणीं कुङ्कुम टिकली,
इथें रसिकता सुविनय शिकली,
ओठ सरस जणुं बिम्बें पिकलीं,
लुब्ध मुखावर लुब्धक अभिजित्; १७
द्युति अभिनव त्या टपोर डोळां.
जातां गोण्डस मूर्ति गजगती,
उभार पीवर गेन्द मलपती,
कामी पाहुन मनीं करपती,
प्राण लोचनीं होउन गोळा. १८
["जसें अनुभवी शिव शशिशेखर
बघुन मोहिनीनटचञ्चलता,
प्रतिभेची जणुं ललित तरलता; "]
गभीर ही परि लावण्यलता
श्यामकुमारी वेङ्गुर्लेकर. १९

१५ नादर = विरळा. "तनु नाजुक नादर कोम," (प्रभाकर) १७ लुब्धक अभिजत् हीं ताऱ्यांचीं नांवें आहेत.

भाङ्गहि नाकासमोर उन्नत;
सरल धवल किति बारिक रेषा !
जाय विभागुन या घनकेशा
काढी ज्यापरि ही मधुवेषा
खलाटवींतुन ध्येयाचा पथ. २०
लाग न लागे येथें यततां,
ती नच आतां मुग्धा होती,
हुरळाया तद्बुद्धि न कोती,
दयितती तिज मुळीं नको ती,
तिची दुरत्यय ती वाग्यतता. २१
आली तंव ती फार निराळी;
मधु नवतीची किति वानूं भर !
मौज-नव्हाळी वदनविधूवर,
अल्लड हौशी जणूं कबूतर,
वा मानसकासारमराळी ! २२
वय तेव्हां तें सोळा सतरा,
म्हणोत कोणी अजाण थिल्लर,
निष्पाप मुखीं प्रसाद निर्जर,
आणि कुतूहल जणुं गिरिनिर्झर,
धीटपणाची माशूक तऱ्हा. २३
नवप्रवेशाचें सुख पूर्वी;
उपासना तंव सौन्दर्याची,
जुळणी श्रेयांची प्रेयांची,
गर्दी आशांची ध्येयांची,
गमे स्वर्गवत् तेव्हां उर्वी. २४

२१ यतणें = यत्न करणें. दुरत्यय = दुस्तर, बे-लाग. २३ निर्जर = सदात

उन्च तशी कृश, सशक्त नाजुक
खेळे चपलेपरि मैदानीं,
मूर्ति गौर जणुं आरस्पानी;
मुखसुमनावर दंवतां पाणी
दृश्य उपजवी तें सुखकौतुक. २५
झांक त्यांत ती पाटल-प्याजी,
अस्निग्ध तिचे कुन्तल धूसर
सुस्निग्ध परी उदार अन्तर,
दे प्रश्नाला मञ्जुळ उत्तर,
मुग्ध मधुरता डोळ्यामाजीं, २६
छटा खोडकर अन् ओझरती.
जिवणी तर अर्धस्फुट कुड्मल,
घोटाळे स्मित भंवतीं निर्मल,
लाडिकपण परि नच उच्छृङ्खल,
करी बघुन जें कीं चोज रती. २७
पातळ नखरेदार मुलायम,
जम रङ्गाचा किति सुन्दर वा !
पुष्पगेन्द नित बुचड्यावर वा
तुरा सुगन्धी दवणा मरवा,
हिरे कुड्यांचे करिती चमचम. २८
("सर्व खरें, पण कोण कुणाची ! ")
होत्या त्याच्याविषयीं अवया–
("स्तुतिकाव्याच्या स्निग्ध अधम या
लावितां तिच्यापुढती समया ?

२५ आरस्पानी=रङ्गमरवरी <आरस–पान < आदर्श–पाषाण. २६ प्याज (<पियाझ) कन्दर्पगर्भांच्या रङ्गांचा. २७ 'पातळ नखरेदार मुलायम फूल चौकडीचें (प्रभाकर).

असेल बहुधा खाण गुणांची! २९
इवें कशाला तिज विद्याधन ?
शेंसविधी, कुलधर्म सुचेना,
स्वधर्मनिधनश्रेय रुचेना,
न ही रेवती वसन्तसेना !
पवित्रतेचें ज्ञान न साधन.” ३०
तिच्या अन्तरीं एकच इच्छा,
योग्य मिळो पति जीवाभावा,
अर्थचतुष्टयलाभ घडावा,
उच्च कारणीं देह झडावा,
तिचा दैव पण पुरवी पिच्छा, ३१
सुखकर दिन ते मठशाळेंतिल,
करिती भाषण गोड मिशनरी
लाडिक त्या हिमगौर सुन्दरी,
उपजविती पडसाद अन्तरीं,
अशा रहाणीनें हुरळे दिल. ३२
स्वकीयांत परि न टिके तोरा,
पुरुष कुतूहल जरी दाविती,
मुलीच तिजला दूर ठेविती,
जातकुळीचा मान राखिती,
आणि हो फिका तिचा फुलोरा. ३३
त्यांत एक करि मागें टीका
स्त्रीच स्त्रीवर–सुशिला साळी,
बाप जरि तिचा बाहिरख्याली,

१० शेंसविधि हा धार्मिक (?) संस्कार म्हणजे वेश्याव्रतानें बद्ध होऊं इच्छिणाऱ्या
[illegible]चा उप-नयन विधीच होय! ‘स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः’ (भगवद्गीता).
[illegible]वती ही संशयकल्लोळ नाटकांतील नायिका, व मघा नायकिणीची पोर होय.

[“पवित्रतेची मग ही झाली
जाहिरात–”] (“लग्नासाठीं का ?’) ३४
जनापवादें उठतां संव्शय
का कुणि सत्यासत्य पहावें ?
काय परीक्षेस्तव विष घ्यावें ?
एक पथ्यकर दूर रहावें,–
असहकार हें शस्त्र निरामय. ३५
विधिपूर्वक तें नसे जिला घर
समाजांत ती व्यक्ती उपरी,
कलावन्त ती असो बहुपरी,
–नर सामाजिक पहा पशु परी–
अन्तर्बाह्य न तीस सुखादर. ३६
विद्यार्थ्यांमधिं कितीक भुमका !
अमक्यास म्हणे दिधला ताम्बुल,
तमक्यासाठीं ही प्रणयाकुल,
शोक पहा ! हें सरळ न पाउल !
करो यांतुनी प्रभूच सुटका. ३७
छात्रनिवासीं चाले चर्चा,
कोणी निन्दक, कुणी अपेक्षक,
एकच लावी तिच्याकडे टक,
प्रेमाळ खुळा कवितालेखक,
करि कवितारतिपूजाअर्चा. ३८
प्रेमोक्ति कशा करिल उघड त्या ?
स्त्रीचा केवळ उपमर्दच तो.

---

३८ कवितासुन्दरीवर हृदयशारदेचा गर्भित आरोप करून तिची जाहीरपणें आराधना करण्याचा विद्वन्मान्य कवींचा सोईचा प्रघात पूर्वी होता अशी शङ्का कवितासुन्दरीवर लिहिलेल्या कवितांतील काही तांस लागू न पडणाऱ्या ओळी वाचूनच येते.

समाजास जर पडदा रुचतो,
द्याया घ्याया प्रेमळ वच तो,
इवा प्रतिष्ठित कोणी अडल्या, ३८
म्हणुन निनांवी प्रेमयाचना !
कागद छऱ्यांचें तें क्षेपण,
बाकावर वा कुत्सित लेखन,
गर्ह्यच ! या पुरुषास विवेक न,
किती जाच ! ("छे ! पहा जाच ना. ४०
हवें स्त्रियांना पुरुषी शिक्षण,
हक्क मागती बरोबरीचे,
वाद घालती परोपरीचे,
समत्व घ्या मग खरोखरींचें !
स्त्रिया न सुमनें जर, तर खा घण ?") ४१
बडे बापके बेटे कोणी,
विद्यापीठामधले साक्षर
निर्लज्जपणें फेकुन दक्शर
बघती पेरायाला साखर
पांखरुं नवलांचें देखोनी. ४२
चतुर बायका असती जाल्या;
नजरेवरुनी करिती पारख,
परि कुणि भुलती बघून नाटक,
करिती आत्मार्पण बेलाशक
विवशा थोड्या परि असल्या त्या. ४३
["अतिशालीनहि असती किंवा;
तरुण कुणी ये जर भेटाया

४१ 'कसें मी मारूं माझें नवलाचें पाखरूं.'

निश्चय करिती मनिं त्या ठायां,
जणूं हृदय तो ये मागाया,
प्रेमशब्द जरि न वदे जिव्हा. ४४
इर्कल लुगडें आणि पोलकें,
टापटीप,–ही संस्कृतिकक्षा !
वहिम तो करी लज्जारक्षा,
उतरवीत तरुणांचा नक्षा,
आल्यास कुणि राघु बोलके. " ] ४५
परी काळजी घ्यावी लागे.
["घेणें दृग्वाङ्मधुचा घुटका
शुद्धिपासुनी म्हणजे च्युत का?
म्हणजे 'गोशा'वीण न सुटका.
गोन्धळ हो नच मग अनुरागें."] ४६
("असे असाही कुणी बहाद्दर,
स्वतन्त्रतेची स्त्रीला सन्धि न,
परपत्नीशी हा परि दक्षिण;
वा बुरखा परक्यांत न अनुदिन,
स्वकीयांत तो राखी आदर.") ४७
श्यामेलाही होता अनुभव,
तिरस्कार ये तिज पुरुषांचा

४७ बुरखा=गोशा पाळणें ही श्रीमन्त खान्दानीची खूण आहे किंवा गोशाबाहेर स्त्रीपावित्र्य असणेंच शक्य नाही अशा मताचे कित्येक आधुनिक लोक आपल्या संस्थानाबाहेर सोयीसाठीं किंवा युरोपांत वा इकडे युरोपीय समाजांत शिष्टाचार म्हणून गोशा झुगारून देतांना आढळतात. त्यामुळें आदरयुक्त भावानें पहाणाऱ्यांना सतींचें नखही पहायला मिळालें नाही तरी परकीय गोऱ्यांना युवतींचें मुखही पहायला मिळतें. व तें पहाण्यासाठीं विलक्षण उत्सुकता दिसत होती अशा अर्थाचे उल्लेख छायाचित्राखालीं 'स्फिअर', 'इलस्ट्रेटेड लण्डन् न्यूझ' 'ग्रॅफिक' वगैरे चित्रपत्रांतून येतात.

ध्यास मनीं जरि दिव्याशांचा,
आहे प्रत्यय बहु वरुषांचा,
मत्त घातकी की नरपुङ्गव ! ४८
सहिष्णु ती परि, ठेवी आशा;
अपमानाचे घटके घटके
बसत जिव्हारीं तिचिया चटके;
नैराश्याचे येतां झटके,
भगवद्गीता देइ दिलासा. ४९
चरितार्थाचें तीस न सङ्कट,
वाळकेश्वरीं सुन्दर आश्रम,
पेढीवरती बरीच रक्कम,
वाचा हौसेनें हृदयङ्गम,
जगन्नाथपण्डित अन् मम्मट. ५०
ती वासूवर होई वेडी,
वर्गरासिकता तिजला जाची,
उदासीनता या एकाची
तिला मोहनी घाली साची,
अशी प्रीतिची करणी तेढी. ५१
अनुकम्पा का प्रीति म्हणूं ती?
दुर्बोध स्थळ त्यास पुसावें.–
वाटे काही द्यावें घ्यावें,
क्षणभर सास्मित त्यास करावें–
प्रीतीची अनुकम्पा दूती. ५२
यश इच्छाशक्तीच्या पोटीं;–

---

५० वाळकेश्वर=मुम्बईतील मलबार टेकडीवरील शिवालय; या टेकडीवर मुम्बईचे वैभवसम्पन्न व्यापाऱ्यांचीं भव्य निवासस्थानें आहेत. काव्यप्रकाशाचा कर्ता मम्मट रसगङ्गाधराचा कर्ता जगन्नाथपण्डित.

तिला पाहिजे काही टांचण,
मागुन घेतां काही भाषण,
शङ्केवर कधिं काही विवरण,
मदत तिला तर हवीच होती. ५३
कुठें कुठें ती गांठ मग पडे,
अभ्यासाच्या अर्थात् गोष्टी;
परी भावना नाजुक मोठी,
खोल दडूनच राही पोटीं;–
हृदय करिल का अबला उघडें? ५४

---

## अध्याय १४ वा

# पुंस्त्रीमैत्री

झालीं दोघेंही पारङ्गत,
इळुहळु होई ओळख ज्यादा,
दोघांचाही स्वभाव साधा,
आणि न उपचाराची बाधा,
परस्परांना प्रिय ही सङ्गत. १
उभय पोरकीं, उभय बहिष्कृत;
गजबजलेल्या या वैराणीं
एकाकीची करुण कहाणी;
सहवासप्रिय मनुजप्राणी,
मैत्री म्हणजे जीवन, अमृत. २
वासूस तिनें, वासूनें तिज
साङ्गितली पूर्वील कहाणी,
होय तिच्या हृदयाचें पाणी,
ती पण आतां चतुर शहाणी,
अनर्घ्य अनुभव करी तिला द्विज. ३
“ कशास पहिल्या प्रेमाची सर ?
शून्यहृदय मी ! ” वदतां वासू
टचूकन ये तन्नेत्रीं आसू ,
ती न दे परी काही भासू ,
म्हणे गोमटें करील ईश्वर. ४
समान शीलें सख्य अशक्य न;

स्वतांस म्हणवित बहीण भाऊ.
("म्हणणेंच पडे शब्द दिखाऊ;
कीं मैत्रीचा वाटे बाऊ;
पुंस्त्रीमैत्री चित्र पवित्र न.") ५
मैत्री यांची स्पष्ट टिकाऊ !
(—"होय त्यांतही सोयच सारी;
स्खलनशील कीं नर संव्सारीं;
वितळे घृत अग्नीशेजारीं;
भले मोहना—छेलबटाऊ !") ६
खूप बोलतां दोन्हींकडुनी !
(" प्रणय बौद्धिकहि फार भयङ्कर,
ठिणगीवरही मारा फुङ्कर.
नाहीतर मग वणवा—सङ्कर.)"
आणि जरी तो आला घडुनी ७
वासू त्याला इष्टच मानी;
त्यास नावडे कृती दुरङ्गी,
सुविचाराला नच उल्लङ्घी;
मग काहीही घडो प्रसङ्गीं,
जननिन्दास्तुति समान मानी. ८
हवा जनांना फक्त तमाशा !
वरात काढा; बान्धा ताटी,
करीत जा स्तुति वा हाकाटी,

६ फार्शी-अरबी वाङ्मयांत ज्याप्रमाणें लैला—मज्नून, वामिक्-अझ्रा, शिरीन्—फर्हाद् त्याप्रमाणें मराठी लावणी वाङ्मयांत मोहना—छेलबटाऊ हे प्रणयी जोडपें आहे. मोहना ही सावकारपत्नी छेलबटाऊ नांवाच्या मुशाफरावर फिदा झाली. व्यभिचारास शिक्षा म्हणून तिच्या पतीनें छेलबटाऊस ठार मारविलें परन्तु रात्रीं गुप्तपणें मोहना ही सती गेली ! परशुरामाची 'अजब शहर गुल्जार' ही लावणी पहा.

जमावयाची अचूक दाटी,
यायच्याच घोङ्गावत माशा. ९
लोकमताला कां भ्यावें ?
समाजभीरू गरीब कोणी
सङ्कटांमध्यें पडतां कोनीं
काय लोकमत ये धावोनी ?
नशीब त्यांचें प्रभुला ठावें ! १०
कीर्ती म्हणजे वाफ मुखाची ?
लोकमताचा हा पञ्चानन;
जरि न हिताचें होई साधन,
अनहित करणें त्यास अगाध न,
भिऊन चाला वाट सुखाची; ११
वाफ मुखाची म्हणजे कीर्ती.
ज्यास म्हणे कुणि इकडे 'रे वा !'
मरत म्हणे तो तिकडे 'देवा !'
स्वर्गहि लाभे, परन्तु केव्हां ?—
पडल्यावरतीं धारातीर्थीं ! १२
धनावीण भव हा दुस्तर कीं !
वाट शिक्षणाची जी मळली
त्या वाटेनें जातीं सगळीं,
—अखेर वकिली—जर ती तगली,—
खर्डेघाशी वा मास्तरकी. १३
विद्वत्तेची तीच निशाणी !
हिन्दुसभेची नवीन शाळा,
वासू अध्यापक तिथ झाला,
त्यांत मोद तर विशेष त्याला,

११ पञ्चानन = पांचामुखीं असलेला परमेश्वर, जनतारूपी जनार्दन.

हिन्दुत्वाचा तो अभिमानी ! १४
अर्थात् झाला वासू श्रीयुत
क्वचित् व्हायचा जरि धनसञ्चय,
शिष्यप्रियतेचा परि आश्रय,
बालमनाशी सकुतुक परिचय,
तेंच एक इहलोकीं अमृत. १५
(—"काय चढवितां वर हा धन्दा ?
इतर कुठें बस्तान बसेना,
कर्तृत्वहि अङ्गांत असेना,
असे जमुन हो शिक्षक-सेना,
आडोत्री हा पोपट वन्दा. १६
वकील, डाक्तर अन् प्रोफेसर
हेच खरोखर पाण्ढरपेशे,
नटलेले सम्भावित वेषें;
म्लान न, मिळवूनही अपेशें
पहा सभांमधिं, हे अग्रेसर !) १७
असे वासु पण हौशी तल्लख,
शिकविण्यामधें शान्त करामत,
नम्र, करीच न कधीं खुशामत,
स्पष्ट वदे तो, न पत्करा मत,—
अशा गुणांनीं पुढें कफल्लक ! १८
टेकडीवरी मेथास्मारक,
जलाशयाच्या आगाशीवर
हौशी बागेमधिं नारीनर,

१५ श्रीयुत श्रीमती हीं बिरुदें मासिक मनोरञ्जनकारांनीं बङ्गाल्यांतून महाराष्ट्रांत आणिलीं. १९ मेथास्मारक = फिरोझशाहमेथास्मारक. बाग मलबार टेकडीवर आहे. आगाशी = चु-गच्ची धाबें. मर्गजी = मर्गजाचें = पाचूचें.

घेती कारञ्जाचे शींकर,
स्थान मर्गजी तें सुखकारक. १९
तेथें एका विशिष्ट कोनीं
गौर बाळसेदार मुलें तीं
घेउन काळ्या 'आया' येती,
शिशु झोल्यावर झोंके घेती,
बागडती कर करीं धरोनीं. २०
तेथें नेमें वासूश्यामा
सायङ्काळीं असावयाचीं,
दोघेंही अनुरूप वयाची,
रागमौज सन्ध्यासमयाची,
घेतां फिरण्याच्या व्यायामा. २१
पोचट पोरें, तशाच पोरी
केवळ नखरेदार दक्पथीं
येतां, वा पोटाळ लखपती
करति चर्चा कधीं कडक तीं,
स्वरूपचर्चेला नच चोरी. २२
केव्हा वासूच्या खोलीवर,
केव्हा श्यामासदनीं सुन्दर
असावयाचीं सुटींत दिनभर,
तिची निराभय भक्ति निरन्तर,
मुखाजवळ जशि सरिता मन्थर. २३
भोजनालयें सदा सारखीं.
निर्वाह प्रतिपन्नवस्तुवर;
परि श्यामा स्त्री, स्वभावसुन्दर,

२४ महत्त्वाकाङ्क्षेचा अभाव आणि 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु' ही वृत्ति यांमुळेंच अवनतीची जाणीव होत नाही व प्रगतीची इच्छा होत नाही.

बनवी काही खमङ्ग रुचकर;
रुचिफेरांमधिं सुगर फार कीं ! २४
क्वचित् तिचें सारङ्गी-वादन,
बहुधा वाचित अङ्ककोष्टकें,
समाजशास्त्रावरिल पुस्तकें,
रुचिफेरास्तव कविताचुटके,
व्हायाचा परि वाद-विवाद न. २५
जात उभयतां मिळून हाटीं.
खरेदींत मत नसें वासुचें
कीं स्त्रीवेषीं लव न त्या सुचे,
स्वदेशीच तें जरि तया रुचे
निवड ती करी परि त्यासाठीं. २६
साह्य करी ती शिवाय केवी ?
घरीं वह्यांची पडतां पुडकीं,
ती करुं लागे ओझीं हलकीं,
काम होय मग तडकाफडकी,
प्रश्नावलि कधिं काढुन ठेवी. २७
जाई रुग्णालयीं एरव्ही,
आजाऱ्यांना भेटी देई,
त्यांच्यासाठीं पुष्पें नेई,
लिहून त्यांची दे पत्रें ही,
कधिं काही वाचून दाखवी. २८
रविवारीं प्रार्थनासमाजीं

२९ प्रार्थनासमाजांत हिन्दुधर्माची सुधारलेली आवृत्ति काढण्याचा आणि एकीच्या भावनेस पोषक अशी साङ्घिक उपासना करण्याचा अत्यन्त महनीय व स्तुत्य उपक्रम झाला यांत शङ्का नाही. बाकी कोणत्याही धर्मपन्थांतच काय तर राजकीय पक्षांतही परमार्थासाठी व तत्त्वनिष्ठमुळें नव्हे, तर ऐहिक स्वार्थासाठी व सुखसोयीसाठी शिरणारे लोक असतातच. हा मनुष्यस्वभावच आहे.

उपासनेला दोघे हाजर—
(–"प्रभुपूजेला तिथेंच कां बरं ?")
["सौन्दर्य-तन्हांविषयीं आदर,
मिळे बव्यांचा तिथ वशिला जी. २९
परीक्षकगिरी ती उपटाया,
वा गेलेलें सम्भावितपण,
सदस्य होती तेथ कितीजण."]
वासूश्यामा नच दाम्भिक पण,
विनीत नित तीं प्रभुच्या पायां. ३०
न सुटे, न सुटो जीवित कोडें,
प्रभुप्रार्थना करित रहाती,
न सोडिती नीतिची रहा ती,
करिती काही उदार हातीं,
आस कीं पुढें दिसेल थोडें. ३१
बसे मुम्बई स्वस्थ हो कशी ?
अफाट बहुविध वस्ति बकाली,
खुराडियांची दाटी झाली,
जो तो कप्पा निज साम्भाळी,
वेळ न करण्या फुकट चौकशी; ३२
उद्योगी अन् स्वतन्त्र जो तो.
वनिता चाळींतिल शेजारीं,
करीत कुजबुज अल्प दुपारीं,
परचर्चेची बहार न्यारी,
वेळ न डोईजड मग होतो. ३३
श्यामास पुसे वासु एकदा,
"कधींच का हो तुम्हां विवाहीं

३१ रहा = रस्ता.

पढावयाची इच्छा नाही ?"
सस्मित उत्तर ये लवलाही,
"अतिकाङ्क्षा ती न होय सुखदा. ३४
आहे त्यांतच मी मानी सुख,
अमुक करावें तमूक व्हावें,
हें न माझिया जिवास ठावें,
प्रत्यक्षाला गमे वरावें,
मिथ्या आशा नको अगान्तुक. ३५
आणिक येई काय विवाहें
घडुन जीवितीं मोठी क्रान्ती ?
क्षणैक वाटे सुखद भ्रान्ती,
न सुटे जर भवकूट न शान्ती;
कौतुक वाटे जरी जिवा हें." ३६
प्रश्नच हा अति अवघड बाकी !
अन्तरांतली नाजुक खळवळ,
कळवाया मन होई हतबल,
पुसणाऱ्याला असते कळकळ,
किंवा नसते हेंहि पहा कीं. ३७
चरितार्थाची न तिला चिन्ता,
वासू पुरुषार्थांचा सागर,
स्नेही लाभे जणुं वैरागर,
तीहि सुशिक्षित विनीत नागर,
असन्तोष परि तिचिया चित्ता ३८
मारी मधुनी मधुनी नाङ्गी.
वासु एकदा हो आजारी,
तर शुश्रूषा तिचीच सारी,
वाटे वासूसहि संव्सारा,

करावेंच का इज अर्धाङ्गी ? ३९
समजा जरि ती झाली राजी,
सहजसम्भव प्रीति कुठें ती,
जिला वर्णितां म्हणिजे, 'नेति' ?
स्वर्गाला मनुजाला ने ती;
लग्न तिच्याविण तर ठकबाजी. ४०
ध्येयाशीं तडजोड नको ती !
भ्रान्ति पुढें ती कालिक फिटते,
पहिली प्रीति न कदापि विटते
यद्यपि हृत्पुण्डरीक मिटतें,
स्मृति तरलेची त्यांतच होती. ४१
वासू चिन्ती, 'काय करी ती ?
होतो का तिज माझा आठव,
का तें अम्मल्दारी वैभव
भाव उपजवी मनांत अभिनव ?
मरे का जुनी प्रीति खरी ती ? ४२
होइल का कधिं भेट पुन्हा पण ?
खऱ्या प्रीतिच्या सङ्गें देवा,
क्षणहि न ठरती मत्सर हेवा;
करावयाला मैत्री सेवा-"
("छे छे ? भलतें ! हाहि गुन्हा पण. ४३
परदारेचें सुन्दर चिन्तन,
अशरीर तरी व्यभिचारच हा !
काव्यविषय तर अधम नीच हा
या कवितेची होय परि चहा,
लिहिती बाडें कवी अकिञ्चन !") ४४

---

## अध्याय १५ वा

### सगुणा

टेकडीवरी जलाशयाच्या
आगाशीवर हरित् सपाटी,
समुद्रकाठीं अन् चौपाटी,
काय जनांची परन्तु दाटी
तनुजलधारा फुटावयाच्या. १

आणि चहुंकडे बघून नखरा
इच्छा होई गरिबालाही
विलसत जावें जनप्रवाहीं
क्वचित् कुणी जरि कुतुकें पाही;
वेषभक्ति हा दोषच न खरा. २

विद्युत्क्रीडा आणि मन्दिरें,
श्रीमन्तांच्या अफाट चैना,
दारिद्र्याची अथाङ्ग दैना,
यान्त्रिक संस्कृतिचा हा ऐना,
भरें पाहतां शोक–काविरें. ३

चला उठा तर बालाघाटीं,
रङ्गराव ते जिथें पुढारी,
थण्ड हवा दे तिथें हुश्शारी,
कलावन्त जो त्याला प्यारी,

---

३ काविरें=हतबुद्ध होण्याइतका (भावनेचा) उद्रेक; "आलें अहन्तेचें काविरें। भूत बाधा" आणि "भरलें क्रोधाचें काविरें। पिशाचा परी वावरे" (दासबोध). ४ बाला-घाट वा बालेघाट=घाटावरील प्रदेश; पाईन–घाट=घाटाखालील प्रदेश.

अशी फुलांची बहुविध दाटी. ४
आज इथेंहि न शान्ति हाय ती !
जिकडे तिकडे कुजबुजती जन,
विशेष काही जरी नवीन न,
परी खळबळे नागर जीवन;
खळबळ पाहूं असे काय ती. ५
न्यायमान्दिरीं चला उठा तर.
काय बलात्काराचा खटला ?
छे ! तर इतका जमाव कुठला ?
कुतूहलें किति दिसतो नटला !
—अपत्यहत्या अब्रूखातर ? ६
मायमनाची काय भलाई !
भीतीनें होऊन बावरी
शेजाऱ्याच्या उम्बऱ्यावरी
मूल ठेवुनी पळे धावरी;
सर्कार करी पण चपळाई. ७
मूल ठार हो न लावितां नख;
लौकर जरि तें मूल गवसलें,
आईवांचुन जगतें कसलें ?
दिव्य सुमन तें क्षणभर हसलें.
पुढें गवसली माय अचानक. ८
अटकर बान्धा खुजा मनोहर,
कलङ्क अर्थात् वदनशशीवर,

४ हें कोणतें शहर असावें बरें कीं जिथें फुलांची लयलूट आहे ? ६ इङ्ग्लण्डांतील कायदा सुधारलेला आहे तरी तिथें गेल्या वर्षी अब्रूखातर बालहत्या साठ झाल्या असें सर्कारी रिपोर्टावरून कळतें ! ९ अटकर. "हेत धरुन मनिं अलों पहाया अटकर बान्धा खुजा" (परशुराम २०७).

टपोर डोळे जणुं इन्दीवर,
आणि मलपते उरोज पीवर,
उत्फुल्ल जणूं वसन्तमोहर ! ९
परि वर्णानें काळी होती.
वृत्ति लैङ्ग परि नच चोखन्दळ,
यौवनशोभा ती शुभमङ्गल,
त्यांत मनाला करि उच्छृङ्खल
नवीनतेची इच्छा मोठी. १०
गुणीच ही सगुणा कुळकर्णी !
भाळुन कां अनुरागें जावें?
भुलथापांवर पातेजावें?
कां दैवावर रागेजावें ?
हिनें बुडविलें कुळ–ही करणी ! ११
(–"सहगमन हवें पतिव्रतेला.
संन्यास नको, वपन नको तें,
म्हणतां अमुचें धोरण खोटें,
खा व्यभिचारीं आतां गोते !
पात्र नसे स्त्री स्वतन्त्रतेला.") १२
स्वतन्त्रता स्त्रीलाच कां नको?
(–"सोडुन नवरा निपट बावळा
पडेल ती कुणि दुजाच्या गळां,
बघुन धाटिङ्गण शूर आगळा,
–आणि यास मग कुठुन बायको? ") १३
मायबाप अन् भगिनी बन्धू,
स्वाभाविक ती त्यांची माया,

११ पातेजणें = विश्वास टाकणें. "कसा पातेजू? बाळबुद्धि तूझी" (रघुनाथपण्डित).
१३ निपट = अगदीं.

न शकले परि तिज टाकाया
फलभारानें लवतां काया,
परन्तु केवी त्यांस निखन्दूं ? १४
आत्मरक्षणीं धडपड त्यांची.
नसतां अङ्गीं आर्थिक शक्ती
कोण सखा हो अवघड वक्तीं ?
सदैव गरिबांची कम्बक्ती,
अब्रू काचेपरि पडत्याची. १५
विवाह केला तो काढुन ऋण,
वैधव्याचें न तयें मार्जन,
अल्प करविलें तरि विद्यार्जन,
जागेसाठीं पुरतो अर्ज न,
वशिल्याचमुळें होय मास्तरिण. १६
तिथेंच भलता प्रकार घडला,
झालें भलतें, नव्हती आगा,
आणि मागुनी गेली जागा,
म्हणुन साङ्गती जपून वागा,
हिला वरिष्ठप्रसाद नडला. १७
नोकरींत नहि अबलेला सुख !
कायद्यांतही पहाच अथवा,
निचारशी धन म्हणजे, विधवा,-
नहि ऐयतपत,- सतवा मथवा;
वरिष्ठ म्हणजे अरिष्ट नाजुक. १८
असतां सत्ता किंव्वा पैका,
त्यांचा कामाकडे अपव्यय

---

१४ निखन्दणें=दोष देणें. १५ कम्बक्ती=दुर्दैव. १७ आगा=माहिती. "वाघ पाठीवर येईल ही आगा नव्हती" (ऐतिहासिक स्फुट लेखसङ्ग्रह १२।६६३५).

करि गरिबांच्या शीलाचा क्षय,
उपासमारी कधिं न करी गय,
अधःपात तो व्यसनीं ऐका. १९
["क्षम्यच जर जगताच्या हाटीं
कीं श्रीसाठीं स्वत्व विकावें,
कुटिल करावे कावे दावे,
अक्षम्य कसें त्यास वदावें
तनुविक्रय जर पोटासाठीं ? २०
क्वचित् दूर हो पुन्हा हलाखी
पाप काय ? परहक्क तुडवुनी
सोन्याचा संव्सार बुडवुनी
सुखांत घेणें रङ्ग उडवुनी"]
("पुरे! पुरे ही तर्क चलाखी.") २१
["मोहीं पडण्यापेक्षां ऐसें
म्हणाल, रिचवा पोटीं कांटे,
पोट-तिडीक न दुज्यास वाटे,
काळिज पुरुषाचें उफराटें;
म्हणे फार तर 'जा; घे पैसे." ] २२
प्रणयामध्यें करार कसला ?
गोड पुनर्लग्नाच्या थापा,
टिचकी हनुवर, साखरपापा,
करी हपापा माल गपापा,
सगुणेचा जिव असाच फसला. २३
शिक्षणमण्डळवरिष्ठ सोज्वळ,
कर्मफले न स्पृहा जयाला,
कर्माणि न लिम्पन्ति तयाला,

२४ "न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा। इति मां योभिजानाति कर्म-

काय शिकवितो गोकुळकाला ?
योग कोणता ? कर्मसु कौशल. २४
अन् केवळ शारीर कर्म तें,
स्पर्शेल कसें तेणें किल्बिष ?
पीयूष कुठें आणि कुठें विष ?
उगाच वदती थोर अहर्निश,
सम्यक् जाणा कर्ममर्म तें. २५
तारुण्यीं जनहारिणिमृगया,
मुक्ति पुढें मग मृगनयनांना,
आणि भोगुनीं विलास नाना,
जीवितयात्रा सम्पवितांना
प्रयाग काशी अन् बुद्धगया ! २६
भागवति इश्काच्या गरजा,
मजा करी दिल्भर त्याकाळीं,
अपुला दर्जा, पत साम्भाळी,
सक्त सजा ती हिच्या कपाळीं,
दैवाच्या तर अतर्क्य गमजा. २७
रुपये शम्भर रोख दक्षिणा
देऊं केली तिज रावांनीं,
परत झुगारी ती अभिमानी;
उदार दानी राव निदानीं,
तीच अभागी द्रव्य लक्षि ना. २८
डाव कसा मग नरपशु साधी ?
नांव तयाचें ती नच घेई,
घेउनीहि कुणि लक्ष्य न देई,

---

मिर्न स बध्यते";"योगः कर्मसु कौशलम्"; "शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्विषम्" (भगवद्गीता).

विश्वासाला पात्र नसे ही,
बोलून चालून ही अपराधी. २९
सत्ताधारी सदा शहाणा !
स्थिर प्रतिष्ठा हवीच त्याची,
चाड कशाला मग सत्याची ?
चाड न ये नाहक हत्यांची,
दुबळेपण हा गुन्हाच जाणा. ३०
न्यायमूर्तिवर सङ्कट अवघड,
अनाथ अबला हें नच विसरा,
ह्यातींत अपराध न दुसरा,
भूतदयेचा न चले नखरा,
कायद्यापुढें बेडर बेरड. ३१
सर्व हकीगत वाच्च वाची,
पुसे मनाला, " किती विलक्षण,
गोष्टी घडती पहा क्षणोक्षण !
धर्म करीना समाजरक्षण."–
तगमग त्याच्या होय जिवाची. ३२
जागोजागीं होतां दङ्गे !
धारराव जे घरिं जळफळती,
हिन्दुनाच जे हिणवुन छळती,
मुस्लिमांपुढें ते सूं पळती,
भ्रष्ट देउळ, मूर्ती भङ्गे. ३३
धर्म बुडाला ग्रन्थामाजीं,
अन् धर्माच्या झेण्ड्याखालीं
स्वार्थ-पिशाचें जमा जहालीं,

३१ जें कायदेशीर तें न्याय्य, नीतिदृष्ट्या ग्राह्य असतेंच असें नाही. ३३ धारराव= शूर वीर, उपरोधानें 'राण्ड्याराघोजी'.

जनताशोणित पिऊन धालीं,
चेतना नुरे हिन्दुसमाजीं. ३४
धर्म-थोरवी ती ग्रन्थांत न.
ज्यांत विभूती नित्य उपजती,
तत्त्वास्तव मरण्याला धजती,
धर्म सचेतन तो या जगतीं,
नसो अपौरुष, नसो सनातन. ३५.
वासू वाची पुन्हा हकीगत,
आणि माहिती, ' कुणी विवाहीं
वरील तर इज बन्दी नाही;'
करुणाविव्हल होउन जाई,
वासु म्हणे मनिं, " काय हिची गत ? ३६
तुरुङ्गांतुनी ही सुटल्यावर–
अस्पृश्यच ही !–काय करावें ?
कसें श्रमूनी पोट भरावें ?
कूपतळीं प्रभुचरण धरावे ?
वेश्या व्हावें ? नच गत्यन्तर ! ३७

३६ कुणी वरील तर हिज बन्दी नाही. अपत्यहत्येच्या गुन्ह्याबद्दल हिन्दु विधवांना झालेली शिक्षा दोन वर्षांपर्यन्त कमी करण्याचें मुम्बई सर्कारचें अलीकडील निश्चित धोरण आहे. गेल्या एकदोन वर्षांत तुरुङ्गवासाऐवजीं त्यांना पण्ढरपूरच्या अनाथ बालकाश्रमांत काम करण्याची मुभा देण्याची रूढि पडली आहे. तिथें त्यांना शिशुसङ्गोपनाचें स्त्रियांस अनुरून असें काम देण्यांत येतें. आम्हांला असेंही समजतें कीं मध्यन्तरीच्या काळांत ज्या विधवेचें लग्न होण्याची निश्चिती असते तिची उरलेली शिक्षा लग्न झाल्यावरोबर माफ करण्यांत येते' (इण्डियन् सोशल रिफॉर्मर् ता. ४ जुलै १९२५). ३७ तुरुङ्गांतुनी सुटल्यावर.—"मला माहीत आहे की माझ्या मुक्ततेच्या दिवशीं मी फक्त एका तुरुङ्गांतून दुसऱ्या तुरुङ्गांत जाईन; आणि अशाही वेळा येतात की तेव्हा मला हें सारें जग कोठडीहून मोठें दिसत नाही, व मला तर तितकेंच भयङ्कर वाटतें' (ऑस्कार वाइल्डचें आपला मित्र रॉस यास पत्र-डी प्रोफण्डीसची प्रस्तावना).

मुसलमान वा व्हावें खिस्ती,
मग बसवावी घडी विघडली,
सुधारणा परधर्मी पडली,
धर्म-नीति ही अशि कुणिकडली ?
क्रूर अधर्म्य स्वधर्मशिस्ती ! ३८
जी चुकली ती पुरती चुकली !
दोषासाठीं भोगुन शासन
गतपापाचें व्हावें क्षालन;
मिळे सन्धि या हतभाग्यांस न,
उन्नतिची मग आसच हुकली. ३९
देवांनीं वा साधुवरांनीं
पूर्वी गणिकांना उद्धरिलें,
पाप्यांना पोटाशीं धरिलें,
पावन करुनी अघास हरिलें
उचित काय तें फक्त पुराणीं ? " ४०
वासू बान्धी अचाट हिम्मत
अन् श्यामाला येउन साङ्गे,
"लवहि न बघतां आगेमागें
धक्का देउन करुं का जागें
समाजास या निद्रित अवनत ? ४१
व्यक्तिस्वातन्त्र्याची भेरी
ठोकुन करितों बण्ड खरोखर;
रूढीच्या जुलमाचे नोकर
असतिल त्यांना मारुन ठोकर,
उडवुन देतों क्षण भम्बेरी; ४२
किंव्वा जातों होउन गारद !
सदैव क्रिया प्रतिक्रिया ही

चालल्याविना शक्यच नाहीं,
समाजचैतन्योन्नति काहीं
असें साङ्गती शास्त्रविशारद. ३८
ध्येयशून्य मम नीरस जीवित,
जिणें वाटतें मेल्यावाणी,
जीवन त्यापेक्षां निर्वाणीं,
पुढें ठेपली आणीबाणी."
ती "होय" म्हणे; कां, तिज माहित. ३९
म्हणे "हेतु हा उच्च निरागस;
परी न पडती प्रेमासाठीं
जन्माच्या या तुमच्या गांठी,
जीव दुजा ये तुमच्या हातीं.
असो, यामधें मिळो तुम्हां यश". ४०
पर्वाना सर्कारी घेउन
वासू जाई थेट तुरुङ्गीं,
ये भेटाया दीन कुरङ्गी,
भेट काय ही, कशा प्रसङ्गीं ?
आधींच तिला पत्रें वाचुन ४१
योजना पहा कळली होती.
चकित करी तिज हें वेडेपण,
येत कुतर्कहि ते तेढे पण;
वासुमनाची पाहू ठेवण,
स्वतन्त्रता कोणास नको ती ? ४२
होती दुक्खी तरि जिज्ञासू !
म्हणे "सुखानें मला मरूं द्या;
अग्निदिव्य कां करितां बुद्ध्या ?
व्हायाचा अनुताप तो उद्यां.

ध्येयजीवि पण वेडा वासू ४३
म्हणे, " असे मी शाळाशिक्षक,
पुरुषच बुडवी तुम्हां सफाई,
करितों पुरुषच मी भरपाई !"
विनवी नन्तर पडून पाईं
" मुक्त व्हा तुम्हीं; होइन रक्षक. " ४४
दिसे तो जणूं ईशप्रेषित;
शब्द खुण्टले, जमे नयन-जळ,
चमकुन सुचवी आंतिल खळबळ,
स्पष्टच त्याची उदात्त कळकळ,
उच्च दयेचा कोण न अङ्कित ? ४५
वासूच्या मनिं होती धुगधुग,
पण महिन्यानें रुकार आला,
अन् दोघांचा विवाह झाला;
ध्वनि गजबजुनी जनीं निघाला,
" अब्रह्मण्यम् ! शिव शिव ! कलियुग !" ४६

---

४६ „ झाला ध्वनी गजबजूनि जनीं निघाला ” (चन्द्रशेखर).

## अध्याय १६ वा

# हलकल्लोळ

अन्धेरीला बङ्गल्यामधें
बडे हर्पीसर, वय तें सव्विस,
सारस्वत ते शम्भू सबिनस,
पत्नीसङ्गें खेळुन टेनिस,
हुजऱ्या लिम्बू-पेय त्यांस दे. १
दैनिक झाल्यावरी नोकरी
डाव व्हायचा असा प्रमोदक,
अङ्गामध्यें सुन्दर मोहक
तङ्ग पैरणें स्वेदोच्छोषक
विणीव जाळीदार लोंकरी. २
पारशिणीची ही वेषतऱ्हा,
तरला पण ही सलील युवती,
आतां तारा सौभाग्यवती,
मञ्जु हास्य ही वितरी सुदती,
ऐश्वर्याचा उम्दा नखरा. ३
शिष्टाचारीं लव न चुके ही,
आणि तरलधी ही गुणखाणी
वदे इङ्ग्रजी मडमेवाणी
धीट नर्मवच मञ्जुळवाणी.
आङ्ग्लसंस्कृती विलसे गेहीं. ४

घरांत तो खान्सामा डिकुन्हा;
जेवण मेजावरच सदा कीं,
चिनि पात्रांची और चकाकी,
दास खडे पाण्ढरपोशाखी,
मत्स्यच्छेदनकुशल ही पुन्हा ! ५
पाहुणचारीं तशी निपुण ही;
**शम्भुराव** शशि नक्षत्रगणीं,
**तारा** तर ही शुक्रचान्दणी;
अभिमानास्पद शिष्ट वागणी,
भूदेवांच्या विलसे निवहीं. ६
धुरचाकी होतां दिमतीला,
हीच चालवी, काय शिताफी !
नागिणीपरी अन्तर कापी,
न चुकायाची पहा कदापी
हपिसांतुन आणण्या पतीला. ७
वाची ती गाल्स्वर्दी वा शॉ;
अतां मराठी तीस नावडे,
काव्य त्यांत तर दीन बापडें;
नवत्व रञ्जक कुठें सांपडें ?
फ्रेञ्च रुचे तिज विशेष भाषा. ८
निरभ्रसुख हें पहा उदेलें !

५ डिकुन्हा हें आडनांव ख्रिस्ती गोवेंकरांत असतें. इङ्ग्रजीपद्धतीप्रमाणें मांसाच मोठा थोरला भाग शिजवून मेजावर ठेवतात. त्याच्यातून विशिष्ट पद्धतीप्रमा ज्यानें त्यानें स्वतःपुरता भाग कापून घ्यावयाचा असतो. मत्स्यच्छेदनांत विशेष कौशल्य लागतें. ६ पूर्वी ब्राह्मण, भटभिक्षुक, हे भूदेव असत. आतां नोकरशाहींतील वरिष्ठ दर्जाच्या लठ्ठपगारी नोकरांसच भूदेव म्हणणें अधिक योग्य आहे. ७ धुरचाकी= धुरचाकी-गाडी, मोटारगाडी. ८ गाल्स्वर्दी, शॉ हे दोन आधुनिक सुप्रसिद्ध इङ्ग्रजी लेखक आहेत.

चमके जणुं बिनबादल बिजली,
रसिकता न लग्नोत्तर थिजली,
नवसंव्सारीं तारा रिझली,
प्रेम कुठें मग पहिलें गेलें ? ९

काव्यामधले हृदयभङ्ग ते
बहुधा केवळ काव्याखातर,
क्वचित् निराशा भङ्गी अन्तर,
आस, हौस ही जिवट निरन्तर,
म्हणुन जीवनीं चित्त रङ्गतें. १०

संव्साराचा देखा मोहर.
शुभ्रवस्त्र हा, काळी आया
आहे 'बेबी' ला पाजाया,
–यौवन नलगे का राखाया ?
प्रियतम भार्या,–युवती तोंवर ! ११

झेलित त्याला हलक्या हातीं
नाचत चाले हलक्या पायीं,
किति कुतुकानें पाही आई !
बोल बोबडे मधून गाई !
वात्सल्याची मौज पहा ती. १२

साञ्जपत्रिका तों तेथें ये,
दृष्टीस पडे चित्र वासुचें,
खालीं मञ्कुर, तो कां न रुचे ?
क्षणभर तिजला काही न सुचे.
मागिल डोकावतिं का ध्येयें ? १३

---

जिवट=जीव, टिकाव धरून रहाणारी; चिवट. ११ मुलाला 'बेबी,' मुलानें 'ममा' वा 'ममी' आणि बापास 'पपा', पत्नीनें यजमानांना 'मिस्टर अमूक' व पत्नीस 'वाइफू' अशी भाषा वापरण्यांत लाज तर वाटत नाहीच, उलट नव्या [illegible]ी खुमारी वाटते !

शम्भु म्हणे, “ हा खरा सुधारक!
सुधारणा तर अशी असावी. ”
आणि चित्र तो पुनश्च दावी,
गोष्ट मागली न त्यास ठावी,
अज्ञानहि हो कधिं उपकारक. १४
अणिक तिकडे रम्योद्यानीं,
वासू, श्यामा, सगुणा जमती,
फिरती बोलत काही गमती,
सूर्यास्ताची शोभा बघती,
वादळ भावी न मुळीं ध्यानीं. १५
परी सुरू हो गोलन्दाजी.
कुटाळकीवरचे पोटभरू,
सार्वजनिक ते लेखक गब्रू,
कुणाचीहि नच लक्षित अब्रू
चालविती नेटें धन्दा जी. १६
अभिनन्दन कुणि करित विनोदें,
“ केलीं पापें, अर्थात् भरतीं,
अखेर धैर्यें परि निस्तरिती,
वेळींच न मग कां सांवरितीं ? ”
लिहित यापरी अस्सल सोदे. १७
ठोसर करिती पण अभिनन्दन,
न तें कोरडें, लिहून विनयें,
पाठविले हुण्डीनें रुपये
सरळ पाचशें उदार हृदयें,

१७ एका भिन्नधर्मीय विवाहानन्तर निषेधप्रदर्शनाच्या सभेंत केसरीचे सहसम्पादक यांनीं 'होतें पोटीं, मग आलें ओठीं' अशा अर्थाचे प्रलाप काढले व ज्ञानप्रकाशानें पुढें त्यांचा समाचार घेतला ही हकीगत वाचकांस माहीत असेलच.

चिन्तुन त्यांचें अभीष्ट-चिन्तन. १८
देखुन वासू जरि हो हर्षित,
ते अबलोन्नति-निधीस देई.
पोंचहि सरलानांवें घेई,
बहादुरांना धाडुन देई,
कृतज्ञता वर करी प्रदर्शित. १९
परन्तु शाळा सार्वजनिक ती!
जर जनतेचा हवाच पैसा
तीव्र सुधारक तर मग ऐसा,
बहुजनसङ्घा रुचेल कैसा?
(–"व्यभिचारी मग कैसे टिकती?") २०
अधिकाऱ्यांवर लोंचट निष्ठा
ठेवुन करितां नित्य खुशामत,
म्हणजे 'होना' ला 'होना' मत,
वाढे पेढीवरी अनामत,
धनासवें मग जमे प्रतिष्ठा. २१
परी सुधारक सुधरो रस्ता.
बरें बोलुनी त्यानें जावें,
खरें न कारण परि साङ्गावें,
जळीं न मत्स्याशी झुन्जावें,
कुठें व्यक्ति अन् कोठें संस्था? २२
वरिष्ठ होते फार चहाते,
भक्त तुकारामाचे खन्दे,
रहात परि हुकुमाचे बन्दे,
म्हणत 'दुर्जनं प्रथमं वन्दे,'
रदबदलीला फळ न पहा तें. २३
देवाविती तरि ते आगाऊ

दों महिन्यांचा पगार नगदीं
सङ्कट नव्हतें भेसुर अगदीं,
अजून होता पुष्कळ अवधी,
म्हणे वासु तो, कुठेंहि जाऊं ! २४
पायांच्या झिजवूनी टांचा,
शाळेशाळीं घालून खेटे,
नन्नाचे खाऊन चपेटे,
प्रयत्न करुनी पाही नेटें.
धीर न सोडी तो चित्ताचा. २५
अन्तीं पावे ख्रिस्ती शाळा.
"गरीब याहो, पतितहि याहो !
हृदयविदारी तुमचा टाहो,
तुम्हांस देतों घ्या सुखलाहो,"
प्रभुसुत साङ्गे हें जगताला. २६
हिन्दु हिन्दुला करीं बहिष्कृत;
कार्य मिशनरी परी चालतें
निवारीत अज्ञानहाल ते,
आणि वागणें मृदु मवाळ तें
शिकून वासू होय सुसंस्कृत. २७
आणि तो म्हणे, "हे आद्य ऋषे !
हिन्दुत्वाचा प्रभाव मङ्गल,
परन्तु जमलीं दिसे भुतावळ,
स्मशानांत ही करिते चङ्गळ,
चालावी स्थिति ही किति वरुषें?" २८

२६ गरीब याहो. "अहो कष्टी व भाराक्रान्त जन हो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हांला विश्रान्ति देईन" (पवित्रशास्त्र, मत्तय ११।२८).

## अध्याय १७ वा

## संव्सार

करो कुणी वा न करो कौतुक,
सुधारणा पण जहाल जुलमी,
विक्षिप्तपणाची ही ऊर्मी,
स्वानींची बेगुमान गुर्मी,
असो, जाहलें का त्यांना सुख ? १

सुख तर अवलम्बून मनावर,
नरकींही कृमिसुखास थारा,
सुमशयनीं कुणि कण्हे बिचारा,
उन्नति झाली काय विचारा;
कारण मानव नसे जनावर. २

न जरी पत्नी विशेष सुन्दर,
स्वभावहि तिचा नाही माहित,
धनहि न करिं, जें करि बहुधा हित
किंवेमुळें हो वासु विवाहित,
काढी पङ्कातून गाय वर. ३

जरि पुरुषाचें व्यापक जीवन,
गृहजीवन तर अंव्श तयाचा,
गृहमर्यादित पत्नीवाञ्छा,
विजोड होता संव्साराचा,
हो थरपार्कर मग नन्दनवन. ४

---

४ पुरुषाचें प्रेम हें पुरुषाच्या जीवनातील एक भाग आहे, पण प्रेम हें स्त्रीचें सर्वस्व होय, असें बायरन् एके ठिकाणीं म्हणतो. थर-पार्कर=मारवाडच्या पश्चिमेस असलेलें रण.

मना विचारीं शोधुन पाहें.
      प्रत्यक्षांत न होशी राजी,
      स्मरत बैसशी जें गत-माजी,
      भुलशी भावी स्वप्नामाजीं,–
कोण सर्वसुखि जगतीं आहे ? ५
वासू पण कर्तव्य-प्रतिमा,
      जैशी होती त्याची माता.
      सगुणेचा तो होई त्राता,
      जबाबदारी जाणुन आतां
शिकवी ए. बी. सी. स्त्रीप्रति मा. ६
नव पत्नीला द्याया शिक्षण,
      पुष्कळ करिती सुरवात पुढें
      लौकर होती दीन बापुडे,
      संव्सारांचें वाढे लफडें.
(–म्हणुन का हवें सन्ततिनियमन ? ) ७
साङ्गे वासू निज संव्सारीं,
      "जीव कुणास्तव जरि आतुरला
      कोण कुणा जन्माला पुरला ?
      परावलम्बनकाल न उरला,
सदा स्वतांची हवी तयारी." ८
अखेर जो तो ज्या त्या साठीं;
      कैचा पति अन् कैची जाया ?
      प्रीति सङ्कटीं लागे जाया,
      बिलगे अक्षय आणि जिवा या

---

५ "आपण पुढें व मागें पाहतों आणि जें नाही त्याच्यासाठी झुरतों" (शेली–चण्डोलास); "जगीं सर्वसूखी असा कोण आहे। विचारी मना तूंच शोधून पाहें" (रामदास).

छाया जीवाची उफराटी. ९
परी वाटलें वासूलाही
आहे अपुल्यावर अवलम्बुन
कोणी माणुस ऐसें पाहुन,
काही अभिनव सुखकर सकरुण
'कुणीतरीपण' तें लवलाही. १०
अशीच जडते ममता वेडी.
बाह्य जगीं कुणि करो कशी गत,–
कुणि न कुणाचें काही लागत,–
सदा गृहीं पण हसुनी स्वागत;
पत्नी म्हणुनी सुखकर बेडी. ११
शस्त्रवैद्य, रुग्दासी यांची
कठोरता ती अन् कोमलता,
योग अशांचा अलभ्य जुळतां,
सुधारणा हो त्वरें न कळतां,
असा मित्र जगिं कोण न वाञ्छी ? १२
सदा तिच्या मनिं काही टोंचे,
उच्चपदाला सत्पति तो ने,
परिस करी लोहाचें सोनें,
पदरीं पडणें पवित्र होणें,
वागण्यांत ती परि सङ्कोचे. १३
भीत भीत चरणाची दासी,
पतीस वाहुन अपुलें तनमन
करीत राही आज्ञापालन,
तिच्या मनांतील छाया जाय न

---

९ छाया जीवाची उफराटी (वाग्वैजयन्ती १४). १० कुणीतरी-पण=आपण कुणी तरी आहों ही जाणीव.

जरि रक्षी गृहिणीव्रीदासी. १४
भार तिला ये नीट उचलिता,
टापटिपीनें संव्सार करी,
सैंपाक तसा बाजार करी,
कष्टे, परि नच तक्रार करी,
हो प्रिय शिष्या, न परी ललिता. १५
स्वतन्त्रतेच्या वातावरणीं,
सौजन्याच्या सहकारतळीं
सगुणा काही विद्या शिकली.
अङ्गावर तरि नव्हती पुतळी,
नटेल कैशी हेमाभरणीं ? १६
मौक्तिक माळा सुढाळ सुन्दर,
तिज श्यामेनें दिधली बाकी,
कुठून दुसरी करील झाकी ?
कुठून आणिल तोडे वाकी ?
पगार ये घरिं रुपये शम्भर. १७
तिला पतीचें चित्त नाकळे,
स्त्रीपुरुषांचें पटे कुणातें
समतामैत्रीचें तें नातें ?
स्त्रीमन अस्थिर संव्शयवातें,
कुसुमासम तें खचित आगळें. १८
काय वासूला झालें कारण ?
करावयाला ऐसें धाडस,
जरी अलौकिक दिव्य निरागस,
न कळे त्याचें तिजला मानस;
वासू व्यक्ति न ही साधारण. १९
अकृत्रिम ती कृतज्ञतेनें,

सद्गदुनी नित म्हणे स्वताशीं
"उपकाराच्या उभल्या राशी
काहींहि न या दुबळीपाशीं,
चुकतें कैसें होइल देणें ? २०
उठतां कित्येकदा निशीथीं
सगुणा जागी पाहुन वासू
पुशित तिचे ते अनर्घ्य आसू,
म्हणे, 'खुळी तूं ! नको निसासूं !
प्रभु म्हणजे तर शुद्ध प्रीती. २१
पातिव्रत्य न असे त्वचेचें;
क्षणोक्षणीं बदलते त्वचाही,
जीवन्तपणीं क्रान्ति सदा ही,
कान्ति तनूला म्हणून पाही,
पतिता का तूं आतां ? छे छे ! २२
भ्रष्ट अहल्या झाली पावन;
मनोहेम हें पश्चात्तापें,
होय शुद्धतर जळुनी पापें
चलन नसो जनपेढीछापें,
ग्राह्य असे तें प्रभुस दयाघन." २३
कधीं उषेचा प्रसाद पाटल
वासूच्या नच दिसला वदनीं,
शान्ति विस्तरे परि तो सदनीं,
जैशी त्रिपुरी शारद रजनी,
भिजवि सुधा मधु जंव वसुधातल. २४

२२ त्वचेचें पातिव्रत्य या नांवाच्या, रा. जोगळेकर यांनीं काहीं वर्षांपूर्व मनोरञ्जनांत लिहिलेल्या गोष्टीमुळें तेव्हा बरीच खळबळ उडाली होती
२४ त्रिपुरी = कार्तिक शुद्ध पौर्णिमा.

परी मुम्बई आणि गरीबी,
हिंवतापानें सगुणा हो कृश,
कोयनेलचा नफा न तादृश,
टन्चाईचा हृदयीं अङ्कुश,
होइल जें होणार नशीबीं. २५
श्यामा जरि मैत्रीण इमानी,
वासू मागायचा न काही,
चिन्तेनें तो खङ्गुन जाई,
दिवाळखोर स्वभाव नाही,
परि हट्टी, निस्पृह, अभिमानी. २६
सगुणेचीही थोर तितिक्षा !
खिन्नपणानें हासे सगुणा,
न करायाची तक्रार कुणा,
मनांत भाकी प्रभुची करुणा,
"धरा उरीं मज सरतां शिक्षा." २७
अखेर पाहुन ठीक न लक्षण,
तशी गृहस्थिति विशेष दुःसह,
श्यामा अवलम्बी सत्याग्रह,
म्हणे "उपेक्षा ही शोकावह,
भगिनीचें मी करीन रक्षण". २८
घेउन जाई पांचगणीला,
हवा तेथली थण्ड मुलायम,
शुश्रूषेला श्यामा कायम,
परी पेटला हट्टाला यम,
दुखणें लागे वर चढणीला. २९
प्रभुकरुणेपरि श्यामा सुन्दर

२९ मुलायम = योग्य, माफक, मृदु, सुन्दर.

पाहुन सगुणा ती विरघळली,
दुखण्यानें ती अगदीं गळली,
म्हणे, जोंवरी वेळ न टळली,
तोंवर उघडें करून अन्तर, ३०
करून घेइन मी दिल्साफी.
श्यामेला सन्निध बोलावी,
सबाष्प बोले, "क्षमा करावी,
थोरीव न मज अपुली ठावी,
म्हणा एकदां 'केली माफी'. ३१
मला असूया शिवली साची;
पापिणीस या कळलें ना तें.
श्रेष्ठ इकडलें अपुलें नातें,
मन माझें मज सन्तत खातें,
सोबतीण मी दों दिवसांची." ३२
तिचें घेउनी श्यामा चुम्बन
कुरवाळित तिज साङ्ग हृद्गत,
किति वासूचा स्वभाव उन्नत,
तत्प्रेमाचें स्वरूप अक्षत,
अन् हृदयाची विचित्र गुम्फण, ३३
अन् त्याची पूर्वील कथा ती.
ऐकुन सगुणा होई स्तम्भित,
आणि तिचें हो हृदय विकम्पित,
म्हणे, "नको तें अतां विलम्बित,
नाहींतर मग होइल माती." ३४

---

३३ विधवाविवाह धर्म्य आहे की नाही याविषयीं मागें झालेल्या वादविवादांत 'अक्षत' शब्दाला फार महत्त्व आलें होतें; आणि क्षताक्षततेवरून निघणारें अनुमान हटकून खरें असतें असें नाहीं असें डाक्तर म्हणतात !

आरुण सन्ध्या बाहिर पसरे;
म्हणे पतीला, "बैसा सन्निध,
अतां नको मज कांही औषध,
ऐका माझी विनन्ति सावध,
अखेरची ही,–आयुष्य सरे. ३५
कळली अपुली कथा सविस्तर,
प्रेमाचा तर कुठला सम्भव ?
परन्तु दावुन आन्तर वैभव
दिलेंत मजला भवसुख अभिनव,
आणि पतित मी मूढ हीनतर; ३६
आणि सुधारक आपण गाढे,
भूतदयाघन, आत्मत्यागी,
झालां सुखदुक्खीं समभागी.
झाला स्नेही असुन विरागी,
स्नेहहि जर सहवासें वाढे, ३७
उपकार करा एकच मजवर—
श्यामा माझी भगिनी प्रेमळ,
सुरगङ्गेपरि पावन निर्मळ,
मूर्तिमती गृहलक्ष्मी मङ्गल,–
स्त्रीलाच कळे स्त्रीचें अन्तर,– ३८
आणि मोजितें मी घटकापळ–
सौभाग्याविण दीन बिचारी
विवाहसुख द्या इज संव्सारीं,
आपण पुरुषोत्तम अवतारी,
मला उठवुनी बसवा अम्मळ.– ३९
–पाणी–! पडली घशास कोरड,
चहाच ठेवा, आज तिघेजण

सुखें घालवूं अन्तींचे क्षण,
प्रभुघरचें हें शुभसम्मेलन,
माझें सोनें होय, नको रड. ४०
तुम्हास ताई, मला भेटूं द्या.
केलीत तुम्ही माझी सेवा,
अभागिनीचा या किति केवा ?
पतितेचा या आठव ठेवा,
बहुतेक न मी पाहीन उद्या. ४१
अभङ्ग गा ! ते अश्रु पुसा ! गा !—"
"काय बोलुं मी न पुरे वाणी,
ठेवितसें हें मस्तक चरणीं,"
तों देवाची अतर्क्य करणी,—
आयुष्याचा तुटला धागा. ४२

---

४२ "काय बोलूं आतां न पुरे ही वाणी । मस्तक चरणीं ठेवितसें" (तुकाराम).

## अध्याय १८ वा

# पुढें ?

गेला यावर बहुत काळ जी,
        कालौघावर सारे तरती;
        कोणी ठरती, कुणी न ठरती,
        निश्चिन्त कुणी पहा विहरती;
कुणास झुरवी पुढिल काळजी, १
असती सारे परी सुरक्षित.
        आठवती का दिलीप-सोनी,
        ळळा लावितिल ऐशी दोन्ही ?
        विलायतेमधिं तीं राहोनी,
आहेत पहा होत सुशिक्षित. २
दिलीप तो व्हाया सेनानी
        कसून घेई ज्ञान लष्करी;
        परन्तु सोनी भावसुन्दरी,
        ज्ञान वैद्यकाचेंच पत्करी,
सुखवाया जगवाया प्राणी.. ३
कुटुम्बासवें शम्भू सन्निस
        करिति युरोपामधें पर्यटण,
        काही श्रीमन्तीस दुर्घट न.
        रङ्गराव तर हिन्दुसङ्घटन,
धरीत हातीं. प्रगति दिसन्दिस. ३
("काव्यांतहि का न्याय नसावा ?")
        घट्ट मनानें पचवीं पापें

दग्ध न तो हो पश्चात्तापें.
व्याघ्र मरे का कधिं गोशापें ?
सत्य पहा हें, रडा, हसा वा ! ५
जुनें घराणें देशमुखाचें,
चतुर्थ सम्बन्धाला धजले,
म्हणुन मुलांनीं घर गजबजलें,
चढले मजल्यावरतीं मजले;
वरमजल्यावर 'सार' सुखाचें ! ६
कुणीहि तेथें येवो गुणिजन,
बजवय्या वा कत्थक, गवई,
कुणी कञ्चनी जणुं नव हवई,
परामर्श व्हायचाच समयीं !
व्हायचेंच तें रङ्गनिमज्जन. ७
वलीबुवांस्तव सुन्दरसा मठ
बान्धुन दिधला मग रावांनीं,
द्रव्याची बहु करुनी हानी,
गुरुकृपा परि काञ्चनखाणी,
राव तसे श्रद्धाळू कर्मठ. ८
क्वचित् लेखणी असती उचलित,
अङ्कासाठी खास जर कधीं,
हो आग्रह तर राव तरलधी
लिखाण धाडित, लावुन अवधी,
राजकारणावरती प्रचलित ! ९
आणि बहादुर अपुले ते मग ?
कान्ति गुलाबी अजून वदनीं,
कृत्रिमता जरि आली रदनीं,

५ काव्यांतील न्याय=पोएटिक् जस्टिस्. ६ तिसरा विवाह एरंडशी करावा लागतो.

नेमस्तपणा सुखमय सदनीं.
विरहाची तर माहीत न धग. १०
विमलाबाई गृहिणी आणिक?
नांव चहुंकडे 'दिव्य माउली',
सुखद सदा सर्वांस साउली,
सायङ्काळीं जाय देउळीं,
आलेला कुणि थोर पुराणिक. ११
दुक्ख तयांना एकच झालें,
अजित मिळवुनी धन्देशिक्षण,
धन्दा काढी करुन निरीक्षण,
स्वतन्त्र राहुन बहु मिळवी धन,
तसे शिकन्दर त्याचे ताले. १२
कैशी कृति परि पुढील वानूं?
अवमानूनी निजधर्महिता
पर्णी श्रीमन्ताची दुहिता,
तिचाहि नव्हता अनकूल पिता,
नांव तियेचें तें गुल्बानू; १३
जुनीच ओळख विलायतींची.
वसन्त हा, तर चैत्रपुनव ती!
व्यापाऱ्याची सुता गुणवती;
ज्ञाति करी बहु भवति न भवती,
मति नच चळली परी सतीची. १४
वदले ठोसर अतां मुखानें,
"जबाबदारी ठेवुन पोटीं,
करोत काही पेरें मोठीं,
स्वतन्त्रतेची हौस न खोटी,

१२ गुल्बानू = पारशिणीचें नांव; अर्थ गुलाब-बाई वा कुसुम-बाई.

द्यावा आशीर्वाद सुखानें." १५
काय करी हो वासू राजे ?
श्यामकान्त तो, न म्हणा वासू.
नांव बदललें, येई हासूं,
समतेचा विक्षिप्त पिपासू,
त्याचें सारें त्यासच साजे. १६
नगराला काढून दयाश्रम,
करीत राही धार्मिक काजा,
बव्यांत न कुठें गाजावाजा;
पहावयाला जरूर जा जा !
जाण्याचे मग घेतां का श्रम ? १७
पतित बहिष्कृत अनाथ सारीं,
येथें त्यांना आश्रय मोफत,
प्रेमळ शिक्षण, पवित्र सोबत,
सुधारणेची झडनी नौबत,
होई नवहिन्दुत्वतयारी. १८
धर्मचमू ही नव्या दमाची !
देशधर्मभाषेचा ताठा;
मिरवी येथें हिन्दु मराठा;
उपटुन काढिल दुश्मनकांटा,
बिनी परि न ही क्रूर यमाची. १९
तुटला वर्णाश्रमधर्मभ्रम,
उपनयनानें प्रत्येकाला
द्विज होण्याचा मान मिळाला,
पुरुष असो तो किंवा बाला.
असो कुणीही, देहपरिश्रम २०

२० राजारामशास्त्री भागवत यांनीं मुलींचीं उपनयनें केलीं होती.

तयास सुटती नच या ठायीं.
ज्ञान न येथें सुलभ शिकाऊ,
संव्स्कृति ऐदी आणि दिखाऊ;
'गुरुदेव' शिवी बूट टिकाऊ !—
बघा वासुची ही मोठाई. २१

पोपटपञ्चीपेक्षां धन्दा
चाम्भाराचा श्रेष्ठ, न शङ्का !
बघा कमळ कां बघतां पङ्का ?
परिश्रमाचा ठोकुन डङ्का,
प्रामाणिक कष्टाला वन्दा. २२

वासूच इथें बने पुरोहित,
नीटपणें विधिनिषेध जाणें,
धार्मिकबुद्धी हृदयीं बाणे,
दक्षिणेकडे लव न पहाणें,
असाच नेता जगीं करी हित ! २३

काय करी अन् श्यामा अधुना ?
पत्नी गृहिणी पतीस सेवी,
कुटुम्बांत ती शोभे देवी,
तीन मुलांची नांवें केवी ?
वासुदेव अन् सरला, सगुणा. २४

सौभाग्य मिळे तिज समयोचित.
("नलगे रम्भा जातां यौवन,
प्रीति हवी तीं वैराग्यास न,
वा द्रोणागिरी भरतां लक्ष्मण !
अकालमङ्गल म्हणजे दुश्चित.") २५

२२ कमल-पङ्क. "कां कमळकन्दा आणि दर्दुरीं । नान्दणूक एकोचि घरीं । परी परागु सेविजे भ्रमरीं । येरां चिखलुचि उरे" (ज्ञानेश्वरी).

["विलम्ब 'नन्ना'हून असो पण !"]
("काय सुशिक्षित सौभाग्यवती
करी घरीं ही नागर युवती ?")
—आर्या परि ती कृत्रिम नव्हती—
गृहव्यवस्था, शिशुसङ्गोपन. २६
आले असती आज पाहुणे—
कार्य पहाया रावबहादुर,
ग्राह्य कराया मनांत आतुर,
त्यांच्या बर्दास्तीमधिं सुचतुर,
श्यामा काही पडुं न दे उणें. २७
जमले या हरिमन्दिरांत जन,
विमलाबाईच्या माण्डीवर
चिमणा वासू शोभे सुन्दर,
अन् शेजारीं गभीर ठोसर,
गुरुदेवाचें चाले प्रवचन. २८
घेई गीतेमधला वेंचा,
'कल्याण करी दुर्गति त्याला
अशक्य,' दे भगवन्त हवाला,
म्हणे "भजा हृदयीं सत्याला,
करा पवाडा भूतदयेचा. २९
म्याड अहिंसा परी न बघवे,
तत्त्वास्तव झुन्जून मरावें,
आणि मरूनहि पुन्हा उरावें,
उत्साहानें कार्य करावें,
निशाण अपुलें जाणा भगवें." ३०

उपसंव्हार

## सम्भावना

'मजाच केलित राव खरोखर !
काव्याची ही न्यारीच तऱ्हा.
कडबोळें धान्यांचें अठरा,
खमङ्ग, न पचे समाजजठरा,
चाल धावती, मारी ठोकर; १
भाषेचाही कठिण तडाखा !
कृत्रिम बाग न, हें तर जङ्गल !
कसत कुठली ? हें तर दङ्गल !
रणकर्कश हें, जरि शुभमङ्गल,
मतामतांचा काय कडाखा ! २
असेंच ना हें ? द्या मत आपण."
"मी काव्याचा टीकाकार न,
पाठक मी, शिक्षण साधारण,
वयांत कोमल मत निष्कारण."—
"हर्कत कुठली मत द्याया पण ? ३
मत मिसुड, जर टीका दाढी;
मिया मूठभर, हीच हातभर,
विद्वत्तेची पेण्ढी धूसर,
बाण्डगुळापरि चमके सुन्दर,
ऊर्ध्वमूल; रस आंतुन काढी." ४
"छे छे ! टीका म्हणजे गारुड !

पाही कवि तें, जें न बघे रवि,
द्रष्टा होउन जें न बघे कवि,
तें कवितेंतुन काढुन दाखवि,
रहस्यमय हो भाकड भारुड". ५
" तव, यज्ञेश्वर, हवेंच तें मत,
प्रासादिक हें धीट पाठ वा,
सुधा चुनवणी, ताक वा खवा,
एकदा तरी म्हणच वाहवा,
नव काव्याची ओळख किम्मत". ६
" मज रुचि याची लागे गोड न,
शिळ्या कल्पना, वाक्यें उसनीं,
छचोर आणिक हसणीं रुसणीं,
बघे नभाला घालुं गवसणी,
वेडाला या चटोर, तोड न. ७
अभिनव चर्पटपञ्जरिका ही,
गद्यीं लिहिली कथा तर कुणी
पाहिल कष्टानेंच ढुङ्कुनी,
काव्यच तें पद्यांत हटकुनी,
शास्त्रोक्त करा टीका काही. ८
खडबडीत किति नीरस बेचव
असती ओळींमागुन ओळी,
जैसे तन्तू काढी कोळी,
गवसेना माशी मासोळी,
कवितेंत हवें उदात्त वैभव. ९
शब्दोशब्दीं काव्य दिसावें,
वसे ब्रह्महीं एक अक्षरीं—

१ प्रासादिक धीट पाठ.—काव्याच्या व्याख्यांसाठी प्रस्तावनेतील **तळटिपा पहा.**

[“प्रणयब्रह्मच जसें टक्शरीं !”]
सत्य साङ्गतों, न ही मस्करी,
मात्रांतुनिही काव्य असावें. १०
यांत जरि कुठें आहे गोडी,
अलिपवनाला स्वहृदय उकलित
हसे मृदुल जी कलिका मुकुलित
तशी सुसंस्कृत, सूचक, सुललित,
सुश्लिष्ट अशी रचना थोडी. ११
फाजिल अभिनव यमकतृष्णा !
परी जुळविणें सांथी–साठीं,
योग्य न ही लेखनकामाठी–”
“ शास्त्रशुद्ध पण यमकासाठीं
लागे व्हावें शिनळ कृष्णा.” १२
“ सुधारणेची कविता ही का ?
कुत्सित सगळीकडे कुचाळी,
पवित्र शब्दांचीहि टवाळी”–
“ यांतच परि लावण्य, नव्हाळी !
कविता म्हणजे संस्कृतिटीका.” १३
“ व्याख्या पण ही त्याज्य विदेशी !
भव्य चमत्कृतिमय ताराङ्गण,
असें असावें काव्य सुलक्षण,
ज्यामधिं नवता दिसे क्षणोक्षण,
सुनीतितत्त्वें जें उपदेशी. १४
ते मुक्तेश्वर, ते ज्ञानेश्वर !
अथाङ्ग त्यांचा कवितासागर,

१२ “राधाप्राप्त्यर्थ जसा तो स्वकरगतामला यशा शिनळ ” (मोरोपन्त). १३ कविता ही संस्कृतीची टीका होय– (मॅथ्यू आर्नोल्ड).

न भरायाची येथें घागर,
कुठुन थिल्लरामधिं वैरागर ?
कुठें तृणाङ्कुर, कोठें केशर ? १५
जीव बुडेना ब्रह्मानन्दीं–"
"तूं तर दिसशी दण्डी, भामह;
नव्हे, आधुनिक शास्त्रपितामह !
काव्य नसे का साङ्ग सुखावह;
काव्यलिङ्ग बघ, विद्यानन्दी ! १६
नवभारत वा ही नवगीता !
पठण करावें काव्य नव्य हें
नैमिष जगतीं हव्यकव्य हें,
तीर्थसाजीं पञ्चगव्य हें,
कोण परन्तू गुणग्रहीता ? १७
सफल झालिया हा नव वाङ्मख
तिमिर दुरीं दुरिताचें जाइल,
विश्व स्वधर्मसूर्यें पाहिल,
जो जें वाञ्छिल तो तें राहिल,
पसाय देइल हरि काव्यात्मक. १८
आणि असा कवि गुणरत्नाकर
मिळेल त्याला खास यशोधन–"
–" दुष्ट दैव जर करिल विरोध न,
उपदेशी जें प्रशून्यशोधन

---

१५ "बैसून थिल्लरीं। बेडूक सागरा धिक्कारी" (तुकाराम). थिल्लर = डबकें, पल्वल. १६ काव्यलिङ्ग=काव्याचा कोणता प्रकार आहे हा? १७ नैमिष=क्षणैक टिकणारें, चञ्चल. १८ वाङ्मय. " आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥१८।१७९४॥ जे खळांची व्यङ्कटी साण्डो। तया सत्कर्मीं रति वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें ॥१७९५॥ दुरिताचें तिमिर जावो। विश्व-स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वाञ्छिल तो तें लाहो। प्राणिजात ॥१७९६॥ (ज्ञानेश्वरी).

असो प्रभाकर ! न मिळे भाकर ! १९
आगळीक ही स्तुतिची नलगे.
        शेक्स्पिअर म्हणे कुणि हा अमका,
        ब्राउनिङ्ग् शेली कुणि हा तमका,
        लोभ पदविचा हा दुर्दम कां ?
अतिस्तुतीला निन्दा बिलगे. २०
शिवाय यांतिल कुणा जिव्हारीं
        लागेल असें असेल काही
        क्षमा याचितों तर लवलाही.
        घाला औदार्यें भिक्षा ही,
लाज न मज, मी काव्यभिकारी" २१
'परि कविचें कां कथितां नांव न ?"
        "कवि कवितेला विटला आतां,
        अर्धा ख्रिस्ती नांव पाहतां,
        परि हृदयानें हिन्दु मराठा,
जन्मानें जरि तो चित्पावन." २२
'कूटच हेंही ! बाकी काही
        बहुत घेतले तुम्ही परिश्रम,
        वृथा न दावी कविता विभ्रम;
        गान्धीसाठी घ्या ही रकम,
आपण सारे गरीब आहों." २३
"चहा नको मज, पाणी आणा"
        "छे छे पडतां घशास कोरड
        गरम दूध हें निदान औषध

१९ ज्यानें सवाई माधवरावांच्या वैभवसम्पन्न दर्बारांत पोवाडे गाऊन बक्षिसें मिळविलीं त्याच प्रभाकरावर अखेरच्या दिवसांत रोजच्या भाकरीसाठी मुम्बईच्या पारशी शेटांची स्तुति करण्याची पाळी आली हा काय दैवयोग !

# प्रि. वै. का. राजवाडे यांचें पत्र व त्यांस उत्तर

पुणें, ता. २८–२–१९

रा. रा. माधवराव ह्यांसी,

सा. न. वि. वि. तुम्हीं जेव्हां तुमचें काव्य वाचून दाखविलें तेव्हां तें म वारंवार वाहवा म्हणण्याइतकें आवडलें. परंतु आतां सावकाश वाचतांना क दोष आढळून येतात. तुमचें काव्य निर्दोष असावें अशी माझी उत्कट इच्छा अ म्हणून ते दोष दाखवितों. यतिभंग हा शेकडों वेळां झाला आहे. बोलण्यासा वाचतांना हा दोष ध्यानांत येत नाहीं, मात्रावृत्तांत यतिभंग मानीत नाहींत व इं जींतही यतिभंग होत नसतो; तथापि आठ मात्रांनंतर थांबलेंच पाहिजे अशी म समजूत झाली आहे. 'पौरन्ध्रिक सौन्दर्य डंवरलें' यासारख्या ओळी सदोष हे बाकी, 'सुवासिनीविण गेह न मण्डित', 'सरलेची हृत्कलिका उकले', 'न पशु हा, शिशुपाल खरा' अशा सुंदर मधुर ओळीही हजारों सांपडतील.

ह्यांतील वृत्त इंग्रजी धर्तीवर धावतें आहे. 'चाल धावती' [पृ १७१] असें श्रोता म्हणतो तें बरोबर आहे. काव्य गोष्टीवजा असल्यामुळें वृत्त अगदीं य योग्य आहे. स्कॉट्चें मार्मियन् वाचतांना वाचक जसा, न थांबतां, न अडखळ जणूं काय एक प्रकारचें गद्यच वाचीत आहे असा सारखा वाचीत जातो त मनाची स्थिति 'सुधारक' काव्य वाचतांना होते. चाल कांहींशी कटावासारखी अ

व्यक्तिस्वभावही इंग्रजी धर्तीवरच वर्णिले आहेत. कोठें विनोद तर कोठें रपणा ह्या स्वभाववर्णनांत दिसून येतो. मनुष्य हा एक व्यक्ति नसून अनेक व्य डोल्हारा आहे असें म्हणतात ह्याचें रावबहादुर ठोसर हें ठळक उदाहरण विनोदाचें दुसरें उदाहरण डॉक्तर ओंकारस्वामी. विनोदांत रावबहादुरवर्णन कीं ओंकारजींचें वर्णन सरस हें सांगणें कठिण; तथापि रावबहादुरवर्णन ज्यास्त पसंत वाटतें. सरला इतकी सुस्वभावी व सहिष्णु, तथापि नीच नव आयुष्य काढण्यापेक्षा माहेरीं येऊन राहण्यापुरतें तरी धार्ष्ट्य तिच्यांत आहे.

बलकर, रुचिकर हें, सन्तोषद,
शिवाय याचा सफेद बाणा." २४
दूध पिऊनी उठे तरुण तो;
नमस्कारुनी परस्परांला
जाती आपापुल्या घराला,
कुणि काव्यांतिल सुवचनमाला
जातां रस्त्यानें गुणगुणतो. २५
आला तिमिरांतून अनामिक,
गेला तिमिरीं पुन्हा अचानक
मधेंच घडिभर दावुन नाटक,
नव कवितेचा प्रेमळ पाठक,
जुन्या कवींचा कृतज्ञ पाइक. २६
घड्याळकांटा बारा दावी,
शान्त दिवाळी नभांत सारी,
दीप चमकती स्थिर कासारीं,
भूदीपांच्या कृत्रिम हारी
खण्डित होती स्नेहाभावीं. २७

# प्रि. वै. का. राजवाडे यांचें पत्र व त्यांस उत्तर

पुणें, ता. २८-२-१९२

**रा. रा. माधवराव ह्यांसी,**

सा. न. वि. वि. तुम्हीं जेव्हां तुमचें काव्य वाचून दाखविलें तेव्हां तें मल वारंवार वाहवा म्हणण्याइतकें आवडलें. परंतु आतां सावकाश वाचतांना कां दोष आढळून येतात. तुमचें काव्य निर्दोष असावें अशी माझी उत्कट इच्छा आ म्हणून ते दोष दाखवितों. यतिभंग हा शेकडों वेळां झाला आहे. बोलण्यासार वाचतांना हा दोष ध्यानांत येत नाहीं, मात्रावृत्तांत यतिभंग मानीत नाहींत व इंग्र जींतही यतिभंग होत नसतो; तथापि आठ मात्रांनंतर थांबलेंच पाहिजे अशी माझ समजूत झाली आहे. 'पौरन्ध्रिक सौन्दर्य ढंवरलें' यासारख्या ओळी सदोष होत बाकी, 'सुवासिनीविण गेह न मण्डित', 'सरलेची हृत्कलिका उकलें', 'न पशुपाल हा, शिशुपाल खरा' अशा सुंदर मधुर ओळीही हजारों सांपडतील.

ह्यांतील वृत्त इंग्रजी धर्तीवर धावतें आहे. 'चाल धावती' [पृ १७१] असें ए श्रोता म्हणतो तें बरोबर आहे. काव्य गोष्टीवजा असल्यामुळें वृत्त अगदीं यथा योग्य आहे. स्कॉट्चें मार्मियन् वाचतांना वाचक जसा, न थांबतां, न अडखळतां जणूं काय एक प्रकारचें गद्यच वाचीत आहे असा सारखा वाचीत जातो तशीच मनाची स्थिति 'सुधारक' काव्य वाचतांना होते. चाल कांहींशी कटावासारखी आहे.

व्यक्तिस्वभावही इंग्रजी धर्तीवरच वर्णिले आहेत. कोठें विनोद तर कोठें गंभीरपणा ह्या स्वभाववर्णनांत दिसून येतो. मनुष्य हा एक व्यक्ति नसून अनेक व्यक्तींचा डोल्हारा आहे असें म्हणतात ह्याचें रावबहादुर ठोसर हें ठळक उदाहरण होय. विनोदाचें दुसरें उदाहरण डॉक्तर ओंकारस्वामी. विनोदांत रावबहादुरवर्णन सरस कीं ओंकारजींचें वर्णन सरस हें सांगणें कठिण; तथापि रावबहादुरवर्णन मला ज्यास्त पसंत वाटतें. सरला इतकी सुस्वभावी व सहिष्णु, तथापि नीच नवऱ्याशीं आयुष्य काढण्यापेक्षा माहेरीं येऊन राहण्यापुरतें तरी धाष्टर्य तिच्यांत आहे. तिच्या

ञा इहलोकीं वात्र कोठेंच मिळत नाहीं. हें चित्र विशेष करुणसुंदर आहे.
ा खरोखरच फार प्रेमळ व गंभीर. ती जें कांहीं करिते तें निरपेक्ष मैत्रीनें व
नें करिते. वासू हा खरा सुधारक, अनाथांचा खरा वाली; ह्यालाच खरा धर्म
ाता तो कळतो. "भूतदयाघन आत्मत्यागी, झाला सुखदुःखीं समभागी, झाला
ही असुन विरागी" हे सगुणेचे शब्द अक्षरशः खरे आहेत. पोर टाकल्याबद्दल
गांत असलेल्या विधवेशी–केवळ तिच्या मुक्ततेसाठीं, तिच्या रक्षणासाठीं आणि
ारिहार्य भावी आचरणापासून तिला दूर ठेवण्यासाठीं–लग्न करणें हें केवढें धाडस !
ुजिकच ह्याच्यापुढें श्यामा वेङ्गुर्लेकर इच्याशीं लग्न करण्याचें धाडस बरेंच फिकें
तें. वासू राजे ह्याच्यांत गंभीरपणा खरोखर पूर्णतेला गेला आहे.

अशीं स्त्रीपुरुषपात्रें निर्माण करण्यांत तुह्मी चांगलें कौशल दाखविलें
हे. दांभिक वा कुटिल आचारविचारांचा तुम्ही केलेला उपहास मर्मभेदी
सला तरी न्याय्य आहे. ह्या काव्यांत तुह्मी दाखविलेला बंडखोरपणा, जुन्या
कांना पसंत पडणार नाहीं; तथापि त्यांना खडबडून जागें करून विचार करा-
ला हा बंडखोरपणा खास लावील. तरुण मंडळींना मात्र ह्यांतील बहुतेक
चार पटतील. व त्यांना हें काव्य आवडेल यांत शंका नाहीं.

४९ व्या पानांवरील निर्झराचें काव्ययोग्य वर्णन कोणाच्याही भूतदयेला
तोतंत लागू पडणार नाहीं. तथापि वासूची भूतदया झऱ्यासारखी जिवंत व
नोहर होती असा अर्थ या वर्णनांतून निघतो. विस्तृतोपमानाचें ( Homeric
imile चें) हें योग्य उदाहरण होईल. ४६ व्या पानावरील छात्रालयाचें
्यरात्रीचें वर्णन फार सुरेख साधलें आहे. पण अशीं स्थळें फारच थोडीं
ाढळतात. कारण उच्च वातावरणांत भराऱ्या मारणारें हें काव्य नाहीं. ह्याचा
चार या भूतलावरच आहे. ह्यामुळें पुष्कळ ठिकाणीं गद्ययोग्य विचार व भाषा
ापरली गेली आहे. "हिंवतापानें सगुणा हो कृश। कोयनेलचा नफा न तादृश'
शा ओळी खरी वस्तुस्थिति दाखविण्याकरितां घालाव्या लागतात असें तुह्मी
हणतां; पण मी या म्हणण्याच्या विरुद्ध आहें. कवीनें इतकें खालीं उतरूं नये.
ावितेचा दर्जा फार वरचा आहे व तो कायम ठेवणें कवीचें कर्तव्य आहे.

गद्य भाषा वापरणें हा जसा दोष तसे विनाकारण 'पौरन्ध्रिक, नीत्यर्ततता,
ापदिग्ध' वगैरे संस्कृत शब्द, 'किंवा प्रेमळ आग्रह, स्निग्ध अभय, दीन शान्ति,

मोहक खळबळ' अशीं इंग्रजी तऱ्हेचीं विशेषण-विशेष्यजोडपीं वापरणें हा दोष होय.

एवढें विस्तृत काव्य असून ह्यांत क्वचितच भाषा व विचार दुर्बोध वाट- कांहीं प्रसंग व ओळी अनपेक्षित अशा आल्या आहेत. पुष्कळांना हे दोष आ असें वाटणार नाहीं हें मला कबूल आहे. मला जीं दोष स्थळें वाटतात त्यां विस्तृत याद मी सोबत पाठवीत आहें.

तुमचें वाचन मोठें आहे. तुम्ही बहुश्रुत आहांत तुमचें निरीक्षण वाहवा करण जोगें आहे. तुम्ही ज्ञानसंपत्ति व शब्दसंपत्ति बरीच मोठी पैदा केली आहे. तुम्ही के समाजसुधारक नसून भाषासुधारकही आहांत. भाषा सर्वार्थव्यापक करण्याकरितां ज्ञ श्वर,रामदासांच्या लोकमान्य ग्रंथांतील शब्दांचें पुनरुज्जीवन करण्याचा तुमचा प्रय सुरू आहे. पूर्वाश्रमींचे फार्शी शब्द व इंग्रजी तऱ्हेचे वाक्प्रचार यांचा उपय किती यशस्वी होईल हें काळानें ठरणार आहे. हा प्रयत्न व हें काव्य तरुणांना आव ह्यांत संशय नाहीं. पण तुम्ही आपल्या संपत्तीचा उधळेपणानें व्यय करीत आ काव्यांत मितपणा पाहिजेच पाहिजे. 'सोनेंच बावनकशी न कसें म्हणावें ?' अ- स्तुतीला आपला लेख पात्र करण्यासाठीं तुम्हीं तो पांचपंचवीस लोकांना मुद्रण पूर्वी दाखवावा. स्वतःला व स्वतःसारख्या तरुणांना लेख पसंत पडतो एवढ्या समाधान मानूं नये. ह्या लिहिण्यानें तुमचा हिरमोड होण्याचा संभव आहे. म तुमच्या अंतःकरणावर आघात करीत आहेसें मला वाटतें. तथापि तुम्ही तरु आहांत, होतकरू आहांत. माझ्या उत्तीनें खचले जाणार नाही अशी मला खात्र आहे. दोष दाखविल्याबद्दल क्षमेची याचना करितों. क्षमा असावी हे विनंति.

वै. का. राजवाडे.

वा. क्र. ३६८८

पुणे ता. २९-२-१९२८.

ती. रा. रा. नानासाहेब यांसी,—कृतानेक साष्टाङ्ग नमस्कार वि. वि.
लें कृपापत्र व सोबत पाठविलेलीं टांचणें पावलीं. वाचून काय काय वाटलें
ब्दीं व्यक्त करितां येत नाही. गुणदोषदिग्दर्शन करण्यासाठीं काव्य समग्र वाचून
श्रमपूर्वक टांचणें करून आपण तीं पाठवावींत यांतच माझ्या कृतीचें चीज
क झालें असें मी समजतों. समवयस्क तरुण या काव्याचें कौतुक, कदाचित्
तील, कदाचित् करणार नाहीत; पण आपल्या सारख्या ज्ञानानुभवसम्पन्न मनु-
नें तें करावें यांतच मी कृतार्थ आहे. असें असून, दोष दाखविल्याबद्दल आपण
ा मागतां याला मी काय म्हणावें? आपणां सारख्यांच्या उत्तेजक आशीर्वादानें
ही वाढतों व उपदेशाच्या बाळकडूनेंच सुदृढ व निर्दोष होतों. क्षमा माग-
त आपला अभिजात विनय दिसला तरी आमची स्थिति चमत्कारिक व अनु-
मनीय होते. उलटपक्षीं, आपण दाखविलेल्या दोषांचा कसोशीनें विचार करूनही
कमानाप्रमाणें व प्रकृतिभेदामुळें कदाचित् मतभेद होण्याचा सम्भव आहे असें
त करण्याबद्दल मीच क्षमेची याचना करायला हवी. काव्य आतां समाजापुढें
च आहे. तथापि आपल्या पत्रांतील कळकळीची विनन्ति मला व माझ्यासार-
ांना मान्य झालीच पाहिजे. बहुत काय लिहावें? आपला लोभ, मी पात्र नसलों
ी आहेच, तो उत्तरोत्तर वृद्धिङ्गत व्हावा हीच विनन्ति.

आपला

माधवराव

REFBK-0003689

REFBK-0003689

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३६८९